साहामाही " २ " ०८
साल अखेर " ७ " १०१८
किरकोळ अंकास ....................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस........०१

Per annum in advance 5 Postages 13 as.
Per annum in arrears 7 ,, 1R. 8 as.
Six monthly ........... 3 ,, 8 as.
Single copy ........................... 4 as.

Advertisements.
Below 10 lines... 2s
Per line over 10...4a
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXI. AKOLA MONDAY 3 OCTOBER 1887. NO. 39
वर्ष २१ अकोला सोमवार तारीख ३ माहे अक्टोंबर सन १८८७ इ० अंक ३९

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मनकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समनूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्रकर्ते यांस.:—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस आपल्या पत्रांत जागा मिळून त्या सरकारच्या कानांवर जातील या आशेनें पाठवीत आहे या करितां त्या प्रसिद्ध करण्याची मेहेरबानगी व्हावी. आपल्यास माहीतच आहे कीं या गांवाला दुधाचा पुरवठा गवळी लोकांकडून होत असतो. हे गवळी लोक अलीकडे आपल्या धंद्यासंबंधानें इतके लबाड झालेले आहेत कीं तें पुसूंच नका. बाजार भावाप्रमाणें दुधाची किंमत घेऊन त्यांत ते भारोभार पाणी घालून गिऱ्हाइकांस विकीत असतात. ही लबाडी प्रत्येक गवळ्याच्या घरीं होत असल्या कारणानें दूध घेणाऱ्या लोकांचें फार नुकसान होत असतें. एक गवळी दूध वाईट देतो ह्मणून दुसऱ्याकडे जावें तर तेथें ही हाच गत असते. या लोकांस कितीही सांगितलें, किती धमक्या दिल्या व किती जरी सावधगिरी ठेविली तरी ते आपलें कसब करण्यास सोडीत नाहींत. या प्रमाणें मिसळ केलेल्या दुधाचा उपयोग केल्यानें पैशापरी पैशाचें नुकसान होऊन शरीराला अपाय होण्याचा ही संभव आहे. मी ह्मणतों आहे ही गोष्ट मी आपल्या स्वतः विषयीं सांगत नाहीं; पुष्कळांच्या अनुभवाला ही गोष्ट आली असेल. एडिटर साहेब, आपण ही गोष्ट आपल्या पत्रांत प्रसिद्ध करून अधिकाऱ्यांच्या कानांवर घालाल व याचा चांगला बंदोबस्त करवाल तर आमच्या साऱ्यांवर आपले फार उपकार होतील. गुदस्तां कलकत्यास कांहीं लबाड व्यापाऱ्यांनीं तुपांत घाणेरड्या पदार्थांची मिसळ करून विकण्याचा उद्योग मांडला होता त्यावेळीं शहरांत जिकडे तिकडे गवगवा होऊन ती गोष्ट सरकारच्या कानांवर गेली व शेवटीं सरकारला त्या संबंधाचा कायदा करावा लागला. त्याच प्रमाणें मुंबईस ही अशी कांहीं गडबड झाली होती. आमच्या इकडील अधिकारी इकडे लक्ष देऊन हा त्रास दूर करितील तर आह्मी लोक त्यांचे फार आभारी होऊं.

काय हो एडिटर साहेब परवा कै. रा० रा० गंगाधरपंत निमोणकरांच्या वेळीं मंडळी स्मशानांत गेली होती त्या वेळीं कांहीं प्रमुख मंडळीनें त्याठिकाणीं नकाशा वगैरे आणवून धर्मशाळा बांधण्याचे संबंधानें बरीच उचल दाखविली होती ह्मणून ऐकतों. मी असेंही ऐकिलें आहे कीं या साठीं जागा वगैरे देखील रोखून ठेवून दसऱ्याच्याच मुहूर्तानें पायाचें काम सुरू व्हावयाचें होतें. दसरा तर निघून गेला पण अद्याप कुठें कांहींच बाहेर आलें नाहीं. मला वाटतें त्या वेळच्या सर्व गोष्टी खरोखरच स्मशान वैराग्याच्याच नसतील ना. कळावें लोभ असावा ही विनंति.

अकोलें ता.२९—९—१८८७. } आपला एक अकोलेकर.

---

उमरावती तारीख २८ सप्टेंबर १८८७.

रा. रा. वऱ्हाड समाचार पत्राचे कर्ते यांस.

वि० वि० खालील मजकुरास जागा द्याल अशी आशा आहे.

वऱ्हाडांतील वर्तमानपत्रांतून चालू सालचे वऱ्हाड वक्तृत्व समारंभास जे विषय नेमावयाचे त्यासंबंधानें कोणास सूचना करावयाच्या असतील तर त्यांनीं त्या कराव्या अशा मतलबाची जाहिरात सभेचे चिटणिसांकडून प्रसिद्ध करण्यांत आली आहे. त्या जाहिरातीला अनुसरून मीं [illegible]ढील सूचना करितों. त्या येणें प्रमा[illegible]

१ उमेदवाराचें वय [illegible] वर्षांचे खालीं असूं नये.

२ आयत्या वेळीं विषय नेमण्याची चाल आहे ती [illegible]बर नाहीं.

३ भाषणास पद्यरूप विषय असूं नये.

४ वर्तमानपत्रांत ज्या विषयांचा उहापोह चालला आहे त्यांतील विषय नेमूं नयेत.

५ एकेका विषयास एकेक बक्षीस न नेमितां, अमुक बक्षीस मिळविणारे उमेदवारांनीं अमुक विषयांपैकीं पाहिजे त्या एका विषयावर बोलावें.

ह्या सूचना करण्यास जीं कारणें आहेत त्या पैकीं हीं कांहीं होत:—

प्रौढ वय झालें असलें म्हणजे विषय ग्रहण करण्याची शक्ति अंगीं येते, विषयाचें वाङ्मय कळतें, व तो सुबोध करण्याकडे उमेदवाराचें मन लागतें.

कालेज मध्यें राहून ज्यांनीं अभ्यास पुरा केला त्यांस देखील कालेज सोडल्यावर चार पांच वर्षें अभ्यास केल्यावांचून कांहीं विषयांवर बोलतां येत नाहीं तेव्हां ज्यांना विद्येचा केवळ गंध लागला आहे त्यांचे हातून बरें संभाषण होणें दुरापास्त आहे.

त्याप्रमाणेंच एकाद्या पद्याचें निरूपण करणें कठीण आहे. हरि[illegible] कीर्तनाचे प्रारंभीं एकादा चरण घेऊन त्यावर जें मोठें गारुड रचतात तें त्यांच्या पदरचें नव्हे तर एकाद्या विद्वानानें कांहीं दिवस मेहनत करून तें बसविलेलें असतें: व असें सांगतात कीं हीं कीर्तनें तयार झाल्या दिवसापासून हरिदास लोक आजपर्यंत अक्षरशः तशीच करीत आले आहेत तेव्हां उमेदवारानें बोलावें तरी काय आणि बोलला तरी त्यापासून ऐकणारांस फायदा तो कोणता?

वर्तमानपत्रांतून जे विषय चालू असतात ते यथासांग फार थोडा वेळ वर्णिलेले असतात; या करितां उमेदवारांनीं ते विषय वाचून जरी तयार केले तरी ते चांगले तयार होत नाहींत. करितां पचनक्रिया, भूगर्भशास्त्र, शारीर व प्राणि शास्त्र, कर वगैरे बसविण्याचीं मूलतत्वें, लोकनियुक्त सभा, हे व असले दुसरे विषय नेमावे. एका बक्षिसास एक विषय नसावा आणि एका बक्षिसास अमूक विषय असावे असें सुचविण्याचें कारण इतकेंच कीं दोन च्यार दिवसांत बऱ्याच विषयांचीं मूलतत्वें सभाजनांस विदित होतील.

वरील सूचनांचा सभेचे चिटणीस योग्य विचार होईल अशी तजवीज करतील अशी आशा आहे. कळावें ही विनंति.

वि. का. का.

---

## हायस्कुलांत शास्त्रीय शिक्षणाची अवश्यकता.

(लिहून आलेला मजकूर.)

मागील अंकावरून पुढें चालू.

कित्येक लोक अशी शंका घेतील कीं या सर्व गोष्टी शाळांतील मुलांस शिकविण्याची काय जरूर आहे. शाळेचा सर्व अभ्यास संपला म्हणजे नंतर याचा अभ्यास करितां येईल. परंतु हा समज चुकीचा आहे. एकदां संसाराचें ओझें आंगावर पडून आपल्या आयुष्य क्रमाचीं दररोजची निरनिराळीं कामें करण्यांत गुंतून गेल्यावर ज्यांनीं ज्यांनीं फुरसत सावून अशा रीतीचा अभ्यास करण्याचें मनावर घेतलें असेल त्यांस तसें करणें कितीसें सोपें आहे याचा अनुभव आलाच असेल. आतां ही गोष्ट सर्वांसच लागूं पडते असें माझें बिलकूल ह्मणणें नाहीं. या जगांत विलक्षण बुद्धीचे व प्रचंड उद्योगाचे असे कांहीं लोक आढळतात कीं त्यांच्या सर्व मानसिक व शारिरिक शक्ति अखेरपर्यंत कायम राहून त्यांचे सर्व उद्योग व परिश्रम एखाद्या नव्या तरण्या बांडा प्रमाणें अव्याहत चाललेले असतात. पण असे लोक फारच विरळा. यांना साधारण नियमास अपवादक म्हटलें तरी चालेल. एकदां शाळा सोडून देऊन आपण पोटाच्या उद्योगाला लागलों— मग तो नोकरीचा ह्मणा अगर इतर कोणत्याही व्यापार धंद्याचा म्हणा— म्हणजे मग एक पळाची देखील फुरसत सांपडणें कठीण पडतें. सर्व दिवसभर पोटाचा उद्योग करून संध्याकाळीं थकून घरीं आल्यावर विश्रांतीसाठीं केव्हां पडूं असें होउन जातें. सर्व शक्ती त्याच उ[illegible]गाकडे आकर्षिलेल्या जातात. आपल्या नेहमींच्या उद्योगा शिवाय दुसरें एखादें वरसंबंधी अगर अन्य कांहींतरी काम करणें म्हटलें म्हणजे त्याला आपला नेहमींचा उद्योग कांहीं दिवस बंद ठेवून त्यापासून रजा घेऊन घरीं बसावें लागतें. अशा अवस्थेंत शास्त्रीय विषया सारख्या कठीण व गहन विषयाचा व्यासंग केव्हां करावा. यासाठीं असल्या विषयाच्या अभ्यासास आरंभ शाळेंतच झाला पाहिजे व शा[illegible]ळेंत असतांच यामध्यें थोडी बहुत गती झाली म्हणजे पुढें ठीक पडतें. लहानपणीं मुलांच्या शक्ति मोठ्या तरतरीत असतात व त्यांचा उपयोग जिकडे करावा तिकडे त्या सहज वळण्या जोग्या असतात. मुलें जों पर्यंत शाळेंत असतात तोंपर्यंत अभ्यास क्रमांत ज्या अडचणी येतात त्यांना न जुमानतां आपला क्रम सुरू ठेवण्या शिवाय त्यांना गत्यंतर नसतें व या मुळें अडचणी आल्यातरी त्यांचें त्यांस कांहीं वाटत नाहीं. मोठ्या वयांत हा अभ्यास करूं म्हटलें म्हणजे एखादी क्षुल्लक अडचण जरी आली तरी तिच्या योगानें खचून जाऊन आपला उद्देश सोडून देण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. कारण आपण जो उद्देश मनांत धरलेला असतो तो अगदीं आआवश्यक आहे, तेव्हां सिद्धीस नेलाच पाहिजे असें नसतें. "नाउद्यां बेटे, कोण कटकट करीत बसतो. त्यावांचून कांहीं आज अडून राहिलें नाहीं." असें सहज आपल्यास वाटूं लागतें. शिवाय असले विषय शाळांमधूनच शिकवीत गेल्यानें दुसरा मोठा फायदा आहे. हल्लीं युनिव्हरसिटीच्या वरिष्ट प्रतीच्या शिक्षणांत शास्त्रीय विषयांचें शिक्षण देत असतात. परंतु हें शिक्षण फारच घाईनें मिळाल्या कारणानें त्या पासून व्हावा तसा उपयोग होत नाहीं. पदार्थविज्ञान शास्त्र, रसायन शास्त्र, प्राणि शास्त्र, वनस्पति शास्त्र, इत्यादि शास्त्रांचें अध्ययन करून आजपर्यंत पुष्कळ लोक बी. ए., बी. एस सी., किंवा एम. ए. झाले आहेत. परंतु या शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग जगांत कोणच्यातरी रीतीनें करून दाखविण्या जोगें त्यांत किती निघतील? हें या लोकांचें अध्ययन फक्त परिक्षा पास होण्या करितां असतें. आपण शिकलेल्या विषयांच्या मूलतत्वांचा उपयोग व्यवहारिक गोष्टींत करणारा एखादा विरळाच निघेल. याचें कारण मला वाटतें त्यांची घाई होय. बीएच्या परीक्षेला पदार्थविज्ञान व रसायन या किंवा वनस्पति शास्त्र व प्राणी शास्त्र अशा दोनदोन शास्त्रांचा अभ्यास एकावर्षांत करावा लागतो. याच प्रमाणें दुसऱ्या परिक्षांची गोष्ट आहे. आतां एका वर्षांत विद्यार्थ्यानें काय करावें. या पुस्तकां शिवाय भाषेची दोन कठीण पुस्तकें त्यांस वाचावीं लागतात तीं निराळींच. तेव्हां अर्थांत या अभ्यासाला घाईच होणार. करितां जर शाळेंत असतांना या विषयांत थोडी बहुत गती झालेली असली ह्मणजे पुढें वरिष्ट प्रतीचें शिक्षण घेतांना इतकें जड जाणार नाहीं असें मला वाटतें. शास्त्रीय विषयांच्या अध्ययनानें मनुष्याची विचार शक्ति वाढते ही गोष्ट प्रसिद्धच आहे. मुलांचीं मनें लहानपणीं कोंवळीं असतात. त्यांना जर हें अध्ययन करण्याची सवय लागली तर त्या बरोबर विचार करण्याची ही त्यांना सवय लागेल व त्या पासून पुढें त्यांचें फार हित होईल. प्रसिद्ध इंग्रजी ग्रंथकार व तत्वज्ञानी कार्लाइल यानें शाळेंत असतां

सृष्टिशास्त्राचें ज्ञान त्यावेळीं आपणांस मिळालें नाहीं याबद्दल मोठा खेद दाखविला आंहे. आपल्या मुलांना लहानपणा पासूनच सोप्या सोप्या शास्त्रीय गोष्टींचा विचार करण्याची संवय लागली तर पुढें त्याच विषयांतील मोठाल्या कठीण गोष्टींचा विचार करण्याची गोडी लागेल; व त्या पासून निरनिराळ्या शास्त्रांत परिश्रम करून नवीन शोध करण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति होऊन देशाचें अनंत कल्याण होईल.

वऱ्हाडसमाचार.

मिती आश्वीन वद्य २ शके १८०९

## शाळाखात्याचा वार्षिक रिपोर्ट. सन १८८६-८७.

सदर रिपोर्टाची एक प्रत अलिशान रेसिडेंट साहेब बहादूर यांजकडून आम्हाकडे आली आहे तिजबद्दल आम्ही त्यांचे फार आभार मानतों. वऱ्हाडांत शाळाखात्याची स्थापना झाल्यापासून व त्यांत ही विशेषें करून त्याची सर्व व्यवस्था एतद्देशीय कामगारांच्या हाताखालीं आल्यापासून त्याची प्रतिवर्षीं अधिकाधिक सुधारणा होत आहे हें पाहून कोणास ही आनंद वाटल्या वांचून राहणार नाहीं. आमचे हल्लींचे लोकप्रिय डायरेक्टर साहेब रा. रा. श्रीराम भिकाजी जठार यांच्या कारकिर्दीचें हें चवथें वर्ष आहे. या चार ही वर्षांत यांनीं आपल्या बुद्धीनें मेहनतीनें व चातुर्यानें आपल्या खात्याची व्यवस्था उत्तम रीतीनें ठेवून प्रत्येक वेळीं वरिष्ट अंमलदारांकडून शाबासकीच मिळविली आहे. कोणच्या ही खात्याच्या मुख्याचें काम करणें हें कांहीं हलकें सलकें काम नाहीं. खात्याचीं सर्व सूत्रें आपल्या हातांत ठेवून त्यांतील सर्व लोकांच्या योग्य हिताहिताकडे लक्ष देऊन त्या सूत्रांचीं चालना करणें या कामाला खरोखरच मनुष्य मोठा दूरदृष्टि, बुद्धिवान व वाकबगार पाहिजे आहे. साधारण प्रतीच्या मनुष्या कडून हें काम कधीं ही होऊं शकणार नाहीं. असें असतां रा. रा. जठार यांनीं हें कामें अगदीं बिनचुक रीतीनें व सुरळीतपणें यथास्थित करून आपल्या वरिष्ट अंमलदारांची त्याबद्दल दर वर्षीं शाबासकी मिळविली आहे तेव्हां त्यांच्या योग्यतेबद्दल स्तुति करावी ती थोडीच आहे. यंदा तर आमच्या रावसाहेबांनां अलिशान रेसिडेंट साहेबांनीं जी शाबासकी दिली आहे व त्यांची जी स्तुति गाईली आहे ती पाहून इतर खात्यांनीं लाजून खरोखर मानव खालीं घातली पाहिजे. असो आतां राव साहेबांनीं आपल्या रिपोर्टांत खात्या संबंधानें जी माहिती दिली आहे तिकडे वळूं.

शाळाखात्याचेंकाम नीट सुरळीतपणें चालण्यास मुख्य अडचणी लग्न मुंजी वगैरेचे समारंभ, महामारी वगैरे भयंकर रोगांचा उद्भव व अति पर्जन्य ह्या आहेत. परंतु गतसालीं या अडचणीं पैकीं कोणत्याही फारशा न आल्या कारणानें हें काम चांगलें चाललें हें, प्रांतांतील शाळा व त्या शाळांत शिकणारीं मुलें यांची संख्या १८८५ साला पेक्षां वाढली आहे या वरून उघड आहे— ८५ सालांत सर्व प्रकारच्या शाळांची एकंदर संख्या ९५१ होती ती या सालीं ९८८ झाली आहे व विद्यार्थी ४१०१८ होते ते ४३६६१ झाले आहेत. म्हणजे शाळांची संख्या या सालीं ३७ अधिक झाली व मुलें २६४३ वाढलीं. या ३७ शाळांपैकीं १२ सरकारी शाळा आहेत, १८ एंडेड ( ज्यांना सरकारांतून मदत मिळते अशा ) आहेत व ५ मुनसिपाल शाळा आहेत. ८५ सालापेक्षां वाढलेल्या शाळांची संख्या यासालीं जरी कमी आहे तरी एडेड शाळांची संख्या प्रमाणानें अधीक वाढली आहे. या शाळांची एकंदर संख्या हल्लीं २४४ आहे. प्रांतांत केवळ स्वतंत्र व खासगी शाळा असाव्यात अशी जरी आमची मनापासून इच्छा आहे तथापि असल्या शाळा हल्लीं आपल्या प्रांतांत ज्या आहेत त्यांत शिक्षण एखाद दुसऱ्याच विषयावर मिळत असतें व तें देखील फार निष्काळजी पणानें मिळत असतें; या करितां असल्या शाळा नाहींशा होउन त्यांच्या जागीं हल्लींची सरकारी शाळांत सुरू असलेली शिक्षण पद्धति चालून त्या एडेड शाळा होतील तितक्या चांगल्याच आहेत. वास्तविक या तात्या पंतोजीच्या शाळांपासून हित कांहीं होत नाहीं.

( पुढें चालूं )

## निजाम सरकारचें औदार्य.

मुंबईच्या इंग्रजी पत्रांत तारीख २७ रोजची एक लंडनची तार प्रसिद्ध झाली आहे तीवरून असें कळतें कीं हिंदुस्थान सरकार सध्यां पैशा संबंधानें फार अडचणींत आहे, उत्पन्न वाढत नाहीं व खर्च तर दिवसें दिवस अधीक अधीक होत चालला आहे; शिवाय रशीया आ करून संधी साधण्यास टपून बसला आहे, इ० कारणां मुळें निजाम सरकारास वाईट वाटून त्यांनीं आपण होऊन केवळ हिंदुस्थान सरकारास अडचणीच्या प्रसगीं मदत करण्याच्या बुद्धीनें सरहद्दीची मजबुती करण्या करितां दरसालें २० लाख रुपये या प्रमाणें दोनवर्षे ( आमचे बंधु वैदर्भिकार तीनवर्षांचे ६० लक्ष रुपये धरीत आहेत ही कदाचित नजरचूक असावी ) पैसा देण्याचें कबूल करून आपले व्हाईसराय साहेब यांस एक खाजगी पत्र पाठविलें आहे. शिवाय निजाम सरकारनीं या पत्रांत असें ही लिहिलें आहे कीं प्रसंग आलाच तर मी आपली समशेर घेउन आपल्या बरोबर शत्रूशीं सामना करण्या करितां तयार होईन हें सरकारनें खात्रीनें समजावें. ही बातमी प्रथम लंडन मधील टाइम्स पत्रास लागली आहे व तिकडे सर्व वर्तमानपत्रें आनंदानें निजामसाहेबांच्या औदार्याचे पोवाडे गात आहेत. आमच्या निजाम सरकारच्या कीर्तीचा डंका या प्रमाणें जगभर झालेला पाहून आम्हांस फार आनंद होत आहे ज्यांचे आपण अंकित ह्मणवितों त्या इंग्रज सरकारांस प्रसंगीं मदत करणें हें प्रत्येक संस्थानिकाचें काम आहे. परंतु अशा रीतीनें वारिष्ट सरकारच्या उपयोगीं पडणें हें ज्यांचें त्यांनें आपल्या शक्तीप्रमाणें केलें पाहिजे. निजाम सरकारच्या खजिन्याची स्थिति इंग्रज सरकारच्या स्थितीपेक्षां फारशी चांगली असेल असें आह्मांस वाटत नाहीं. त्यांच्या मागें ही खर्चासंबंधानें हजार लफडीं लागलींच आहेत. नुकतीच जुबिली प्रीत्यर्थ अमीर उमराव यांची इंग्लंदास यात्रा झाली; नबाब सर साल रजंग यांच्या कर्जाचें ओझें शिरावर आहेच. शिवाय कांहीं दिवसां मागें खुद्द सरकारी खजिन्यांतही बरीच गडबड झाली होती. अशा वेळीं निजामसरकारनीं प्रतिवर्षीं येवढी मोठी रक्कम देण्यास तयार होणें म्हणजे फारच आश्चर्य कारक दिसत आहे. इंग्रज सरकारला स्वतः आपल्या खजीन्याची स्थिती सुधारण्यास पुष्कळ मार्ग आहेत. खजान्यांत जी तूट आलेली आहे ती त्यांनीं आपण होउन आणिलेली आहे. मोठ मोठ्या कामगारांस मिळत असलेले अवाढव्य पगार, लष्करी खात्याचा खर्च, ब्रम्ही प्रकरणा प्रमाणें एक एक प्रकरणें नविन उपस्थित करून त्या पासून झालेला खर्च या सर्व बाबी, लक्ष पूर्वक पाहिलें असतां खर्च मनस्वी वाढण्यास कारण झालेल्या आहेत. यांमध्यें काटकसर केली असता इंग्रजसरकारलाच आपल्या खजीन्याची स्थिती सुधारतां येणार आहे. असें असून निजाम सरकार सारख्यांनीं केवळ आपली राजनिष्ठा दाखविण्या साठीं येवढी मोठी रक्कम घेउन पुढें येणें म्हणजे हास्यास्पद आहे. स्वराज्यांतच निजाम सरकारानां पैशाचा सद्व्य करण्यास कांहीं राहिलें नाहीं काय! निजाम सरकारच्या राज्याची अम्हाला जी कांहीं माहिती आहे तीवरून आम्हांस पक्कें ठाउक आहे कीं त्यांच्या राज्यांतच अशा मोठ मोठाल्या रकमा खर्च करण्याजोग्या पुष्कळ गोष्टी आहेत. त्यांकडे निजाम सरकारानीं अगोदर लक्ष दिलें पाहिजे. ज्या प्रसंगाच्या भीतीस्तव निजाम सरकारनीं आपलें हें औदार्य दाखविलें आहे तो प्रसंग आजच एऊन ठेपला नाहीं, व अंकित संस्थानीकांच्या साह्यानेंच आज त्याबद्दल सावधगिरी करून ठेविली पाहिजे असाही प्रसंग आमच्या सरकारवर आला नाहीं. परचक्र आलें असतां सरकाला मदत करण्या साठीं आपल्या लोकांसहं सिद्ध होणें हें एतद्देशीय राजेरजवाड्यांचें कर्तव्य कर्म आहे व तें आम्ही बजावण्यास चुकणार नाहीं याप्रमाणें सरकारास पुनः पुनः अश्वासन व धीर दिला असतां त्यास कोणी ही नांव ठेवणार नाहीं.

इंग्रज सरकारला द्रव्यद्वारा मदत करून आपली राजनिष्ठा प्रदर्शित करण्याची अलीकडे ही नवीनच टूम निघाली आहे. गुदस्त सालीं शिंदे सरकारच्या कारभाऱ्यांनीं कोट्यावधी रुपये सरकारास व्याजी दिले. यंदा निजाम साहेबांनीं ही दक्षणा कबूल केली आहे. निजाम साहेबांचें हें उदाहरण पाहून इतर राजेरजवाड्यांना निदान लाजेकाजेनें तरी आपापल्या शक्ती प्रमाणें आतां कांहीं तरी द्यावेंसें वाटणार आहे. आमच्या सरकारला आपल्या मांडलीक राजां कडून द्रव्याद्वारा मदत मागण्याची व ती स्वीकारण्याचा प्रसंग यावा याचें आम्हाला फार वाईट वाटतें.

---

दादाजीच्या लेखास उत्तरा दाखल प्रसिद्ध केलेल्या पत्रांत रखमाबाई व तिचा आजा हरिश्चंद्र यादवजी यानीं बेआब्रुची कांहीं मजकूर प्रसिद्ध केल्याबद्दल तिचा चुलत सासरा नारायण धर्माजी यानें फिर्याद केली होती. हा खटला मुंबईचे प्रेसिडेन्सी माजीस्ट्रेट मि. क्रालीबोव्ही या समोर चालला होता त्याचा निकाल वरील माजीस्ट्रेट साहेबांनीं ता० २४ सप्टंबर रोजीं करून दोन्ही आरोपींस दोषमुक्त करून सोडून दिलें व रखमाबाईनें आपल्या उत्तरांत नारायण धर्माजी संबंधानें लिहिलेल्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत असें ठरविलें. रखमाबाईवर हें मध्येंच आलेलें लचांड दूर झालें व त्यांतून ती सुरक्षित सुटली हें पाहून आम्हास आनंद होतो आहे. या निकालानें या बाईच्या पक्षास आतां बरीच बळकटी आली आहे. परंतु दोनही पक्षाच्या लोकांनीं आतां यापुढें कांहीं चळवळ न करितां हें प्रकरण असेंच एथवर थांबवावें अशी आमची मनापासून इच्छा आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER 3
1887.

## NECESSITY OF A DRAINAGE FOR AMRAOTI

A system of drainage is a very great desideratum for a city like Amraoti. The population of the city is well nigh upon 30,000; and the water from the private drains of a thickly populated town like Amraoti cannot be inconsiderable. The city walls of an Indian town always enclose a goodly collection of houses;but a place like Amraoti which was once the emporium of Berar trade, is even more than ordinarily full of houses. These houses have been built in times when principles of sanitation were but ill understood. The troublesome nature of those times compelled the people to build their houses in a particular fashion. Strong walls with hardly a window or two high above in the wall scarcely admitting a dubions light, were the fashion of the day; there was no outlet for mori water and it was not an uncommon sight to see Mori water oozing out on the roadside. There were also close privies close by the houses which contained the refuse of years past. There was consequent damp and the constitutions of most people visibly affected by all these unclean practices. Since the introduction of the Municipality, much no doubt has been done. Every day cartloads of refuse and mori water are removed from the city and deposited at considerable distance. After all, however, it is a miserable expedient to remove the mori water of such a large city by means of carts. It is a makeshift kind of thing that will not do for a town like Amraoti. It is found impracticable to remove all mori water. Moris are only half cleaned every day; and cesspools full of the dirtiest water give out the most noxious smells all day long. A large amount of public money is devoted to this purpose every year and yet the work *can* only be done very wretchedly. It need hardly be said what the results are of mori water being allowed to flow about the lanes or to

collect in uncovered cesspools. There cannot be the least doubt that the stench of the noxious gases from the unremoved mori water perceptibly affects the public health. Damp soils are very common even now; and deposits of salt and dirty water are invariably mixed up with the well-water in the town. All well-water in town is brackish and more or less full of salt. This is as much on account of old deposits as the new ones that are daily added on account of the mori water. It may not be unreasonable to connect the recent cholera epidemic with the great amount of filth in the town of which Mori-water forms not an inconsiderable item. The prevailing rate of mortality at Bombay was something like 20 deaths a week with a population of near 8 lacs; and that was considered a heavy death-rate from cholera; but the number of deaths from the epidemic here in Berar can bear no comparison to that in Bambay. The Bombay climate is toned by the humid influence of the ever flowing sea-breaze; while here there is not only an absence of a good breeze, but there glows a tropical sun in all its fierceness to make matters worse. Bombay climate and Bombay sanitation quite apart, there is yet an ample scope for improvement in a city like Amraoti, so far at any rate as the Sanitation of the town is concerned. A system of drainage is a most dire necessity and the most mischievous results will and must follow if the present state of affairs is allowed to exist for some time to come.

Years before the necessity of some sort of drainage must have been perceived; and the initiation of an item of expenditure in the yearly local municipal budget for construction of drains was undoubtedly an attempt towards attaining the desired end. It was apparent that the money spent on carts to carry away mori-water was quite uselessly thrown away, as the work done was very poor indeed and was as good as not done at all. The evil no doubt was perceived but the necessity has not deeply impressed itself on the local body in charge of the town. When the Municipality felt the evil as one that could not safely be ignored they should have met the difficulty with a bold face. It was no use spending three or four thousand rupees a year on city drains; it was no use doing things only piecemeal. In vain did the secretary use his influence from time to time to induce the people to construct the drains by mories out of their own pockets, so far as their houses were concerned; in vain did the President suggest the expediency of throwing out the ordinary mori water on the road so as to be dried up or washed off by rain. All these expedients have been found useless, and the only practical solution of the difficulty is by adopting a system of drainage for the whole town. As matters stand at present, however, there is a worse state of affairs than what it was when there were no drains along side the roads at all. Public Gatters have been constructed in some places over say a couple of hundred yards; people allow their Mori water to get into the gatters, and there is no outlet at the nethermost end; there is a stoppage of all the nasty water, and the whole drain is one long dirty cesspool of unclean water giving out a very bad smell. The level of the gatters is eminently bad in some places; the natural inclinations of the places have been systematically ignored; in fact the portions built are not in keeping with *one* vast plan made beforehand. Portions of drains are built up year by year, and as there is no *one* system the whole thing is an entire failure. The evil of more water remaining in its filthy condition has been increased to a degree which cries for notice and amendment. A copious supply of water lately introduced in the town has made it necessary to have a copious drainage system. People get more water than they used to before and naturally therefore, use more; and thus mori water accumulates in abundance in the gatters to the great annoyance of the passers by and to the great injury of the public health.

May it not be asked who is responsible for this state of affairs? Is it not a fact proven that unclean water remaining in gatters without outlets, must be a perpetual source of affecting the public health. If the evil is an admitted one, is it nobody's business to see that proper steps are taken to remedy the evil? We should certainly think the Municipality is really responsible for all this dirt and filth and the evil consequences thereof. There cannot be a member of the local Municipality, from the President downwards, but is not aware of the disgraceful state of public gutters. The preservation of public health and taking such measures as are essential for preserving it are undoubtedly amongst the first duties of a local Municipality. If the committee are not doing this one of their important functions they are discharging their trust badly. The people cry that they are taxed for Mori cleaning and their moris are full of dirty water; they are taxed with a Police putty and yet they get miserable roads. The people have a perfect right to demand that some return ought to be given them for the monies that are taken from them. But is it not also the business of the sanitary Commissioner for Berar and still higher authorities to impress the local Municipality with the necessity of a drainage system for the town? This is a matter seriously acting or one likely to affect the public health. If the Municipality knows not its duty or cannot see its way to do it can it not be pointed out to them and can they not be shown the way to do it?

(To be continued)

The proposed examination of the Munsarims and classers comes out today. A camplete veil yet hangs over the subjects of the examination; and we hear the examinees themselves are not yet aware of the subjects in which they are to be examined. If survey is to be one of the subjects, as is anticipated from Mr. Hobbson being the reported originator of the scheme, we cannot but be surprised at the precipitation with which the examination is brought about. A sufficient time should necessarily have been given to the candidates to enable them to prepare themselves in the new subject with which, we are told, their duties have little or no connection. We say this of Munsarims. If they are expected to know surveying then what need is there of the Classers. Both the duties may be exacted from the same official with benefit to himself and saving to Government.

We have read with disgust a distasteful and tedionsly lengthy tirade published by the Vaidarbha in its issue of the 24th ultimo under the head "Corruption of Public Servants.' The publication is simply mischievous and spiteful and we feel ashamed of the criticism contained therein. The writer will do well to abstain from such subjects and make right use of the columns that are at his disposal. We also advise the ShuddhaVarhadi who has followed the writer of the Vaidarbha in the train, not to soar so high as he has done in his last issue.

We hear from a good source that there is no truth whatever in the wild rumours spread regarding the appointment of Mr. Bapuji Yadava of the Sanitary Commissioner's office, to the place of Inspector of Registration. The appointment, it is said, is to go in the department.

We congratulate our worthy Director of P. Instruction on the splendid and unqualified success with which he has worked his department, and the highly gratifying praise he has received in return for it. The Resident, in concluding his review of the last year's report on P. Instruction says "there are few departments in Berar better administered or more carefully watched over than this, which is presided over by Mr. Shriram B. Jatar" A more deserved and gratifying complement was scarcely ever bestowed upon a native Public officer. What more can Mr. Jatar expect?

## CORRESPONDENCE

To,

The Editor of Berar Samachar

Sir,

Your contemporary of the Vaidarbha has, of late, begun to write upon anything and everything without judgment. What effect such publications produce on the public mind I leave entirely with the public to judge. For myself I see in them nothing but a rhapsody of conflicting statements and arguments artistically put together so as to create an impression of their literary excellence alone, if there is any at all. Take for instance the English leader in its last issue headed "Pay of Hospital Assistants" I spent two hours this morning to understand the leader and to reconcile the heading with what is written under it, but could not make a head or tail out of it. Will any of your readers make it intelligible to me?

Akola
2-10 87.

Querry

Says a home correspondent of the Bombay Gazette:—

His Highness the Nizam observing that the revenues of India are not increasing, while the expenses are growing, owing solely to the cost of an improved defence of the frontier, declares in a letter to his Excellency the Viceroy that the whole of India benefits by the measures taken to obtain security against external attack.

As the oldest ally of the English in India his Highness offers a free gift of twenty lakhs of Rupues each year for the next two years, to be devoted to the purpose of promoting the military defence of the frontier.

The Nizam's letter is written in very cordial terms. His Highness explains that the present offer is only intended for facilitating the preparations necessary to secure peace. He adds, "When the hour arrives to do battle with the invader. England can count upon my sword."

The *Times* asserts that the Nizam acted entirely upon his own impulse. The Viceroy was surprised and delighted at this new manifestation of royalty and attachment on the part of the Nizam. Probably, it says. the Resident is not aware at this moment of the fact of the offer having been made.

The *Times* considers that the letter containing this splendid offer outweighs all plausible theories about the insecurity of the English Position in India or the unpopularity of the British Policy.

It is futile, it adds, to talk of making the Nizam an adequate return for his princeely offer. There is no repaying such generosity and cordiality.

## वऱ्हाड

हवामानः— हवा स्वच्छ आहे. हवेंत अद्याप उष्णता आहेच. तापाचा आजार हा चहूंकडे आहे.

यावर्षीं मोहोरमाचा सण येथें सुखानें शेवटास गेला.

मे. डेव्हीस सा० अ० क० हे बाळापुरास मोहोरमाचे वेळीं तंटे होऊं नयेत म्हणून बंदोबस्ता करितां गेले होतें व मि. हशमत अली अस्चाचीहे पातुरास त्याच कामाकरितां गेले होते.

प्रांतांतील सारे मुनसरीम व क्लासर परीक्षे करितां येथें आले आहेत. परीक्षेस आजरोजीं ११ वाजतां आरंभ होईल.

मौलवी महमद निजामुद्दीन अ० क० यां नीं येथील स्मालकाज कोर्टाचा चार्ज गेले आठवड्यांत घेतला.

येथील जेलरचे जागीं मि. सिंक्लेर उमरावती जेलांतील क्लार्क यांस नेमले असें समजतें. जेलरचें काम बरेंच जबाबदारीचें असतें व तेथें पैशाचा बराच संबंध असतो तेव्हां मे. कर्नल लेन साहेब अशाजागीं योग्य मनुष्याचीच योजना करितील.

रा. रा. बापुजी यादव देवी खात्यांतील सुपरिंटेंडट यांस रजिस्ट्रेशन खात्यांत इन्स्पेक्टर नेमणार म्हणून समजल्याचें आम्ही कळविलें होतें. पण हल्लीं असें कळतें कीं तो जागा त्यांनां न मिळतां रजिस्ट्रेशन खात्यांतच भरली जाणार. ती बहुतकरून रा. रा. व्यंकटराव तामगांवचे सब रेजिस्ट्रार यांस मिळेल असें म्हणतात.

## वर्तमानसार.

मि. अर्डले नार्टन— हे मद्रासच्या वकिलामध्यें सिंव्हाप्रमाणें गर्जत आहेत. सांप्रत हे ३०००० रुपये फीवर हैद्राबाद येथें एका दिवाणी दाव्या संबधानें गेले आहेत. असा फीचा आंकडा आलीकडे ऐकिवात नव्हता. प्रसिद्ध वकील मेसर्स ब्रूस जान नार्टन आणि जान डासनमन यांचीच बरोबरी मांडली आहे.

काबुलाकडील खबर— इंग्रज सरकारचे हेर आहेत व ते गुप्त बातमी काढण्यास आले आहेत असें शंशाया वरून बदकशानच गव्हरनरानें दोन इसम पकडले आहेत.

हैद्राबादचे सरदार खिलारजंग बहादूर यांणीं मुंबईस बरेंच वाडे वगैरे खरीदी करण्याचा सपाटा चालविला आहे. आतां त्यांणीं ५॥ लाखांस एस्प्लेनेड हाटेल नांवाची मोठी थोरली इमारत विकत घेतली आहे. हल्लीं त्यांचा मुक्काम मुंबईस आहे.

केरो— ता० १५—९ यावर्षीं नाईल नदीचें पाणी अतिशय वाढून चोहींकडे महा पूर आले आहेत.

मद्रास हाय कोर्टचे लीगल रिबेमेन्सर पि. रॉस यांजवर बदकर्माबद्दल खटला झाल्यामुळें त्यांस खटल्याचा नीकाल होईपर्यंत सस्पिंड केलें आहे असें समजतें.

युनायटेडस्टेटसमध्यें अतिशय उंच असा एक मनुष्य आहे त्याची उंची ८ फूट २ इंच आहे व शरीराचें एकंदर वजन, ३९० रत्तल आहे.

अबिसिनियाला एक रशियन मिशन जाणार आहे असें समजतें.

जानब्राइट व त्यांचे सात आठ भाऊ मिळून त्यांनीं एक कंपनी काढीली आहे. हे आपल्या कारखान्यांत कापूस पिंजणार व रेशमी कापड काढणार. त्यांचें एकंदर भांडवल रु. २५,००,००० आहे.

येत्या नवंबर महिन्यांत इंग्लंडच्या प्रधान मंडळांत पुष्कळ फेरफार होऊन लार्ड हार्टिंगटन हे मुख्यप्रधान होतील असें वर्ल्डचें ह्मणणें आहे. मि. ओब्रायन यांस सक्तमजुरीची शिक्षा झाल्यास आपण बुरंगांत काम करणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें.

श्रीनगर येथें रोगानें घोडे फार मरतात असें म्हणतात. घोड्यांना तो रोग झाल्यापासून सहा तासांत ते मरतात.

न्यूयार्कमध्यें एकंदर १६० नायका वैद्याचा धंदा करतात. त्यांचें प्रतिवर्षी १५;००० डालर्सचें उत्पन्न आहे.

औंध येथील तालुकदार मंडळीनें सर आल्फ्रेड लायल हे लवकर बरे व्हावे यासाठीं त्यांनीं ५०० रुपये गरीब लोकांस वाटल्याचें म्हणतात. वास्तविक लोकांस त्यांच्या अंमलापासून उपयोग किती झाला याचा व याच लोकांस संशय आहे.

पुढच्या वर्षी ब्रम्हदेशांत उत्पन्नावरचा कर वसूल केला जाईल असा रंग दिसतो.

कुचबिहारचे महाराज हिवाळ्यांत विलायतेस रहाणार असें ह्मणतात.

जर्मनसरकार आस्ट्रोहंगेरी येथील फौजेंत १२००००० लक्ष फौज वाढविणार आहे असें ह्मणतात.

जर्मनीचे प्रधान प्रिन्स बिस्मीक यांचे वजन २०७ पौंड आहे.

हिंदुस्थानचे कमांडर इन् चिफ ड्युक आफ्क्यानाट हे १८८९ च्या पावसाळ्यापर्यंत हिंदुस्थानांत रहातील.

कर्की येथें आपल्या सैन्याकरितां रशियानें दगडी बराखी बांधल्या.

ऐलंडची राष्ट्रीयसभा बंदकरणें कायदेशीर नाहीं अशाबद्दल मि. ग्लाडस्टन साहेब पार्लमेंट सभेंत बोलत असतांनां निजामचे माजी प्रधान सरसालरजंग यांस अतीशय आनंद लोटला आणि तो आनंद एक तास पर्यंत तसाच कायम होता असें म्हणतात.

इंग्रजी पोलिटिकल कामदारांचा अधिकार कितीतरी भारी हा ; या इतक्या मोठ्या अधिकाराखाली बिचाऱ्या दुर्दैवी नेटीव संस्थानिकांचा निभाव तरी कसा लागावा ? भोपाळच्या बेगमने आपल्या नवऱ्यास हद्दपार करून टाकावें असा पोलिटिकल कामदारांनीं हुकूम केला. व या हुकमाप्रमाणें न वागाल तर नवऱ्यास अगदीं एकीकडे तरी ठेवावें म्हणजे तुम्ही नवऱ्याचें दर्शनही घेतां कामा नये, घेतल्यास इंग्रजसरकारची तुमच्यावर नाखुषी होईल, असेंही त्या बड्या अधिकाऱ्यांनीं त्या बिचाऱ्या बेगमेस फर्माविलें, व ह्याचा अंमलही झाला असें सांगतात. हा इतका अंमल बजावणारे पोलिटिकल अंमलदार सर लेपेल ग्रिफीन हे वरील अधिकारी आहेत असें सांगतात. पण एवढ्यानें या अधिकाऱ्यांचा बडा अधिकार संपत नाहीं; भोपाळच्या राजघराण्याच्या संबंधानें त्यांचें जें वर्तन झालें आहे, त्यांतील जी एक गोष्ट या आठवड्यांत बाहेर आली आहे ती याहूनही भयंकर नव्हे, कारण भयंकर म्हणण्याचा आम्हास अधिकार नाहीं; पण गमतीची आहे यांत कांहीं शंका नाहीं. भोपाळच्या बेगमेंचा जांवाई अहमंद अलीखान हा लहान असतां त्यांची सर्व सुश्रूषा भोपाळ संस्थानांतून चालत होती, व दैवयोगानें तोच बेगमेचा जावई झाला. पुढें तो मोठा झाल्यावर आपण भोपाळच्या राज्याचे मुख्य प्रधान व्हावें व आपल्या सासूस हरी हरी म्हणून स्वस्थ बसवून राज्याधिकार आपल्या पत्नीकडे यावा अशी त्याच्या मनांत इच्छा झाली. पण त्याची ती इच्छा बेगम साहेबांना नाकारली. त्यावरून त्या उभयतांस घुस्सा येऊन तीं दोघे बेगमसाहेबांशीं उद्दाम पणानें वागूं लागलीं व आपला हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यांणी अनेक प्रकारच्या खटपटी सुरू केल्या; व बेगम आणि त्यांची मुलगी व जावई हे जोडपे यीं उभयतांत कित्येक पत्रव्यवहारही झाला, व तो भोपाळ दरबारात दाखल आहे. हा प्रकार चालू असतां सर लेपलें ग्रिफीन हे इंदोरचे रेसिडेंट झाले, व त्यावेळीं या जोडप्यानें सर ग्रिफीन यांच्याशीं बोलणें करण्याकरितां आपले एजंट इंदुरास पाठविले, व सर ग्रिफीन याणीं बेगमसाहेबांची भेट घेण्यापूर्वी यीं जोडप्याची खाजगी रीतीनें भेटही घेतली. नंतर सर लेपेल ग्रिफीन हे इंदोरचे रेसिडेंट झाले, व त्यावेळीं या जोडप्यानें सर ग्रिफीन यांच्याशीं बोलणें करण्याकरितां आपले एजंट इंदुरास पाठविले, व सर ग्रिफीन याणी बेगमसाहेबाचा भेट घेण्यापूर्वी या जोडप्याची खाजगी रीतीनें भेटही घेतलीं. नंतर सर लेपेल ग्रिफीन हे ज्या ज्या वेळीं भोपाळ येथें आले, त्या त्यां वेळीं त्याणीं बेगमची मुलगी लतमजाहान यांस आपल्याकडे बोलवून तिच्या भेटी इतक्या एकांतांत घेतल्या कीं, त्या संस्थानच्या नेहमीच्या चालूं वहिवाटी प्रमाणें तिच्या भेटीच्या वेळीं वकिलासही आंत येण्याची परवानगी नस इतकेच नव्हे तर कित्येक भेटीच्या वेळीं तिच्या नवऱ्यासही तिच्या बरोबर आंत जाण्याची परवानगी नव्हती, हा प्रकार पोलिटिकल कामदारांच्या अधिकाराला आड्डें असें जर न्यायी म्हणविणाऱ्या इंग्रजांच्या एखाद्या कायद्यांत लिहिलेलें असेल तर तें एकवेळ प्रसिद्ध तरी करावें हें चांगलें दिसतें. हा गुप्तभेटीचा प्रकार नुसता शुष्क होता असेंहा म्हणवत नाहीं; कारण, असल्या भेटी झाल्यावर सर लेपेल याणी फेब्रुवारी १८८९ रोजीं बेगम यांस एक पत्र लिहून तुम्ही आपल्या जावयास मुख्य प्रधानकीचो जागा द्या असें फर्माविलें तर दिवाणाच्या नेमणुकीच्या कामांत रेसिडेंटास हात घालण्याच्यार्चें कांहीं कारण नाहीं. असें असतां त्यांणी हें पत्र लिहिलें. भोपाळची बेगम जरी बायको आहे तरी चांगली शाहणी, विचारी व कारस्थानी अशी असल्यामुळें तिणें सर लेपेल ग्रिफीन यांस जो जबाब पाठविला त्यांत जावयास दिवाण करणे आमच्या नेहमीच्या वहिवाटीस विरुद्ध असून त्यास राज्यकारभाराचा अनुभव नाहीं, शहाणपण नाही, व पुरते लिहितां वाचतांही येत नाहीं, या करितां तुमच्या म्हणण्या प्रमाणें करितां येत नाही असें लिहिलें. बेगमच्या या जबाबावरून सर लेपेल यांस राग आला. पण बेगम कोणत्याप्रकारची स्त्री आहे याची त्यास पूर्ण माहिती नसल्यामुळें पुनः लिहावें म्हणजे होईल असें वाटून त्याणी ४ मार्च १८८९ रोजी पुनः एक पत्र पाठवून तुम्ही कलकत्याहून परत आल्याबरोबर मुख्यप्रधानकीचा जागा जावयास द्यावी असें लिहिलें, पण बेगमेनें या पत्रासही नकाराचाच जबाब दिला. हें इतकें झाल्यावर हे पोलिटिकल कामदार आपले हेतू सिद्धीस नेण्याकरितां अनेक उपाय करूं लागले. आणि शेवटी बेगम व तिचा नवरा यांस पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें एकमेकांपासून दूर केलें, तरी बेगमेच्या मनावर स्त्री धर्माचा पगडा जास्त असून तो एकदम उठून कलकत्यास जाऊन आपली सर्व हकीकत सांगून तिणें नवऱ्यास आपल्या जवळ राहण्याची परवानगी मिळविली.

१ अम्लपित्तावर— अंबाड्याची कोंवळीं फळ आणून त्यांचा रस काढून एक तोळाभर रसांत ४ तोळे खडी साखर व चार गुंजा मिरपूड घालून द्यावें. हें औषध ७ दि० दुवक्तां घ्यावें पथ्य करावें.

२ आग्या धणसाच्या विषावर— अंबाड्याच्या झाडाची साल ३ भाग, कुणकाची साल २ भाग खुरचांफ्याची साल १ भाग घेऊन त्यांचा रस काढावा. त्यांत धणसरीचे पाळ उगाळून जनावरास प्रत्येक वेळीं आच्छेर पासून एक शेर पर्यंत शक्ती प्रमाणें द्यावें हें औषध विषाचा जोर कमी होईपर्यंत दोन तीन वेळ द्यावें. मनुष्यास उतार तूपभात.

१ पित्तांशावर— तांबड्या ( तांबड्यां ) त्रिलायती अंबाडीची आमसुलें पाण्यांत शिजवून त्या पाण्यांत मिरपूड, हिंग व गूळ घालून तें प्यावें.

२— खवड्यावर अंबाडीच्या पाल्याच्या रसांत आंवळसरा नवक खलून लावावा.

३ हातास जळवात असल्यास— अंबाडीच्या पाल्यांत मीठ घालून त्याचा चाकरा द्यावा, व गरम आहे तोंच हातावर ७ दिवस बांधावा.

४ तेलापासून झालेल्या अजीर्णावर—अंबाडीची भाजी तांदुळाच्या कण्या घालून शिजवावी आणि ती खावी.

५ गुरांस दूध जास्त सुटण्यास— अंबाड्या भरडून शिजवाव्या व त्यांत तेल घालून दुभत्या गुरांस खाऊं घालाव्या ह्म० त्यांस दूध जास्त सुटतें.

१ अकूवर— आंबटीच्या पानांचा रस द्यावा.

२ पित्तानें मस्तक जड होतें त्यावर— आंबटीचीं झाडें बारीक वांटून ती गोळी थंड पाण्यांत कालवून उकळी येईपर्यंत कढवावी. नंतर त्यांत थोडा पांढऱ्या कांद्याचा रस घालावा. थंड झाल्यावर मस्तकास लेप द्यावा, व हेंच औषध थोडें टाळेवर चोळावें. यानें इतका त्वरित गुण येतो कीं, लावलेला लेप सुकतांच मस्तकाचें जडत्व उतरतें.

३ शीतपित्त ह्म० अंगावर पित्ताचे लाल चेंद्ट उठतात त्यावर— आंबटीच्या पाल्याचा रस काढून त्यांत मिरपूड आणि पातळ केलेले तूप घालून आंगास लावावें.

४ दाहावर— आंबटीच्या पाल्याच्या रसाचा अंगास लेप करावा-

अंबोली—कोराटी प्रमाणेंच हें झाड असतें. हें झाड हात दीडहात उंच वाढतें. यांस तांबडीं किंवा पिवळीं फुलें बारमाही येतात. हीं फुलें लहान असतात. यांस वास अगदीं नसतो.

१ पांढऱ्या धुपणीवर— हिची मुळी १ तोळा घेऊन ती दुधांत शिजवून तें दूध सुमारें छटांक घ्यावें. ठों० अ०

बेंगाल ब्यांकेंत ५,५१,३२,४०० रुपये, मुंबई ब्यांकेंत २,८६,३९,८०० रुपये व मद्रास ब्यांकेंत १;७६,३३,००० रुपये लोकांचें ठेवी दाखल होते.

सेंट पिटसबर्ग येथील मास्को ग्याझेटांत महाराज धुलिपसिंगाचे हक्का संबंधानें फार कळवळा दाखविला आहे व खचित खचित रशियन लोक हिंदुस्थानवासी प्रजेस इंग्रजांचे जाचांतून लवकरच मुक्त करतील असें लिहिलें आहे.

लाहोर— ता० २१ सप्टेंबर—ता० १९ रोजीं गुलाम हैदरखान व गिलझाई लोकांची मोठी लढाई होऊन २ हजार गिलझाई मारले गेले व पुष्कळ जखमी झाले. कैद केलेल्या पैकीं ५०० नायका त्यांच्या मुलाबुळां काबुलास पाठविल्या आहेत. पांजदह व नाकवारा या शहरांतील लोकांना तुह्मी आपली एथलीं घरें सोडून सुर्खी प्रांतात रहाण्यास जा ह्मणून रशियन अधिकाऱ्यांनीं हुकूम आहे. ६ हजार लोक पाठीशीं बिऱ्हाड घेऊन तेथून निघून गेले. १५० रशियन लोक व दहशान येथें आले ही बातमी अमिरास कळतांच त्यांस हाकून देण्याबद्दल तेथील गव्हरनरास त्यानें तावडतोब हुकूम केला. काबूलचे अमिरानें जलालाबाद गव्हरनरास असा हुकूम केला आहे कीं, जर कोणा काबली अगर पेशावरी इसमानें काबुलास जाऊं ह्मटलें तर त्याजकडून एक हजार रुपयांचा जामीन घेतल्याविना त्यास जाण्याची परवानगी देऊं नये.

भूगत खेडें—काश्मीरच्या ब्युरामूला सेक्शनच्या गाडीचा रस्ता खोदीत असतां अवघ्या सहा सात फूट खोलीवर पुरून गेल्या गांवांचा भाग दृष्टीस पडला. त्यांत आब्लांग आकाराचीं कांहीं नाणी सांपडलीं. त्यावर मुरलीचा छाप आहे या शिवाय कांहीं धातुंचीं भांडीं व अलंकार सांपडले. राजतरंगणीमध्यें ब्युरामूला ह्मणून जें वारंवार येतें तेंच हें असावें. येथें आणखी खोदणी केली तर विशेष चमत्कार दृष्टीस पडण्याचा संभव आहे.

ठराव— युरोपियन मिलिटरी पेन्शनर यांनीं सरकारांत एखादी सिव्हिल खात्यांतील नोकरी पत्करली असतां अशी नोकरी करित असें तोंपर्यंत त्याच्या कुटुंबास फुकट दवा देऊं नये. असा ठराव झाला. न्या. सिं.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही " ३ " ८
साल अखेर " ७ " १०१८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.........०१

Per annum in advance ...
Six monthly ........... 3 " 8 as.
Single copy ........................... 4 as.

Advertisements.
Below 10 lines... 2r
Per line over 10... 4a
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL. XXI. AKOLA MONDAY 10 OCTOBER 1887. NO. 40

वर्ष २१ अकोला सोमवार तारीख १० माहे अक्टोंबर सन १८८७ इ० अंक ४०

## नोटीस.

मे० आफजलखा वल्द हजरखा कलाली पोट मक्तेदार सरकल फत्तेखेड तालुके मेहेकर जि० बुलढाणें यांस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्याचें कारण कीं आम्ही तालुके मेहेकर येथील कलाली मक्ता सन १८८७—८८ इसवी सालचा केला त्या प्रमाणें तुम्ही आम्हांपासून सरकल फत्तेखेड एथील पोट मक्ता रक्कम २६०१ रुपयांस कबूल करून घेतलात, व त्याजबद्दल रीती प्रमाणें कबुलायत आम्हांस देऊन आमचें सहीचें लायसन्स घ्यावें. असें रीतीप्रमाणें तुम्ही आम्हांस कबुलायत लिहून देण्यासाठीं मे० रामचंद्र रामकृष्ण गाढवे व शिवराम वल्द नारायण कलाल यांस सांगितले वरून उभयतांनीं तुमची कबुलायत छाप कागदावर लिहून तुमचें नांवचें लायसन्स आमचें सहीचें घेऊन कबुलायतीवर तुमची सही घेऊन पाठवून देऊं असें म्हणाल्यावरून लायसन्स व कबुलायत त्यांचे बरोबर पाठवण्यांत आलीं. तुम्ही आमचें सहीचें लायसन्स घेऊन कबुलायतीवर आपली सही वे साक्ष करून अद्याप पर्यंत पाठविलीं नाहींत. सरासरी सहा महिने झाले आमचे घरांत बिमारी सक्तीची असल्यामुळें तिकडे आम्ही कोणी आलो नाहीं परंतु दोन चार पत्रें कबुलायत पाठविण्या साठीं लिहिलें परंतु जबाब सुद्धां नाहीं. हलीं आठ दिवसांत कबुलायतीवर सही व साक्ष करून अम्हाकडे पाठवावी न पाठविल्यास रीतीप्रमाणें योग्य तजवीज केली जाईल. अशी दगाबाजी तुमच्या सारख्यांनीं करावी हें बरोबर नाहीं. कळावें तारीख ८ माहे आक्टोबर सन १८८७ इसवी.

( सही ) बारस ख्यामतखा
वल्द बिलनखा मक्तेदार दस्तुर खुद्द.

## नोटीस.

रा. रा. चुनिपाडाकर साहेब तेल्हारे. यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, आमचे दुकानांत तुम्हीं राहत आहां त्यास आम्हीं तुम्हांस दोन महीन्या पूर्वीं सांगितले होतें कीं आमचें दुकान खालीं करून द्यावें तर तुम्हीं खालीं करून देण्याची मुदत २ महीन्याची मागितली ते दोन महिनें मुदतीचे झाले परंतु तुम्हीं दुकान अद्याप पर्यंत खालीं केलें नाहीं त्यास आजपर्यंतचें भाडें चुकून देणें व नोटीस पावल्यापासून १५ पंधरा दिवसाचे आंत दुकान खाली करून द्यावें अगर तुम्हीं दुकान न खाली करून द्याल तर दरमाहा भाडें एक दुकानाचे रुपये २५ प्रमाणें देणें पडेल व ह्या नोटीसीचे खर्ची सुद्धा फीर्याद केली जाईल कळावें. तारीख ७ माहे अक्टोबर सन १८८७ इसवी.

सही
रामवृत कीसन दयाल दुकान अकोट
दस्तुर रघुपती आत्माराम
गुमास्ते खुद्द.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

उमरावती तारीख ७ माहे आक्टोबर सन १८८७.

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्र कर्ते यांसः—

वि. वि. आपण आपल्या गेल्या अंकांत या शहरांतील घाणेरडे पाणी काढून टाकण्या करितां ड्रेनज ची कांहीं तरी सोय केली पाहीजे या विषया संबंधानें इंग्रजींत लिहीलें आहें तें वाचुन फार अनंद झाला. उमरावती सारख्या शहरांत या विषयाबद्दल मुनशीपालीटीनें अशी अनास्था दाखवावी हें मोठेंच चमत्कारिक आहे. आपण मोरीच्या पाण्या विषयीं जें लिहीलें आहे तें अक्षरशः खरें आहे. एडीटर साहेब तुम्हाला काय सांगू या पाण्यापासून आह्मा गांवांत राहणाऱ्या लोकानां असा कांहीं त्रास होतो कीं विचारूचनका. पाहीजे त्या रस्त्यानें जा हा त्रास कांहीं चुकत नाहीं. पायखान्याच्या मोऱ्या व घरांतील इतर मोऱ्या यातुन पाणी जाण्याला दुसरा मार्गचनाहीं. तें खुशाल रस्त्याच्या दोहों बाजूनें सादर असतें व कधीं कधीं तर सडकेवरूनही पसरतें. त्याची ती घाण व किळस पाहुन फार वाईट वाटतें. एखादा परका मनुष्य जर येथें आला तर त्याला असें वाटेल कीं हे काय? इतकें मोठें शहर सर्व प्रांताचें सदर स्टेशन असून त्यांत अशीघाण. येथें मुनशीपालीटीच नाहीं की काय; असो. आपण हा विषय हाती घेतला आहे तेव्हां तो आतां योग्य अधीकाऱ्यांच्या कानांवर जाईलच याबद्दल आह्मी उमरावतीकर आपले फार आभारी आहोंत. लोकां जवळून निरनिराळ्या तऱ्हेनें पैसा घेउन त्याचा मोबदला आमची मुनशीपालिटी आह्मांस जर देत नाहीं, उलट त्रास भोगण्यास लावितें तर त्या मुनसीपालीटीचा उपयोग तरी काय?

सध्यां आपल्या वऱ्हाडांत परीक्षेची साथ आली आहे असें ह्मणण्यास हरकतनाहीं. अकोल्यास मुनसरीम व क्लासर लोकांच्या परीक्षा झाल्या व त्याप्रमाणेंच हायस्कुले व ट्रेनींग कालेज्यांच्या ही परीक्षा झाल्या. येथें पोलीसची परीक्षा झाली व पुढल्या आठवड्यांत रेव्हेन्यु खात्यांतील अधीकाऱ्यांच्या परीक्षा होणार. या परीक्षे करितां ठिकठिकाणांहून मंडळी जमत चालली आहे. अकोल्यास मुनसरीम व क्लासर लोकांची परीक्षा झाली तिला ६०–६०, ७०–७० प्रश्न विचारिले होते असें मी ऐकतों. खरें काहों? खरें असल्यास ही एक मजाच समजावयाची. तसेंच क्लासर लोकांची परीक्षा फार कठीण झाली व मुनसरीम लोकांना शाळेतील मुलां प्रमाणें त्रयराशिक पंचराशिक भांजणी, विविध गुणाकार इत्यादि प्रश्न विचारले होते! गरीब बिचारें लोक हे विषय शिकुन त्यास २०–२० २५–२५ वर्षे झाली असतील. असो. ही एक यंदा नवीनच टूम निघाली.

आपल्या कमिशनर साहेबांचे नुकतेच नेमलेले सुपरींटेंडेंट मि० जोन्स हे आपल्या जुडिशिअल क० च्या कचेरींतील जागेवर पुनः परत जाणार यांत आतां शंकाच राहिली नाहीं. परंतु हे परंत गेल्यानें दुसऱ्या किती तरी लोकांचे नुकसान होणार आहे इकडे कोणी तरी लक्ष देतों कां? त्या जागेवर रेसिडेन्सी सेक्रेटरीएट मधील मि० वेड नांवाचे कोणी गृहस्थ येत आहेत ह्मणून लोक म्हणतात. आमच्या वऱ्हाडांत दुसरें या जागेला लायक कोणीच नव्हतें का? कांहीं असो बिचारा मि० मरे. याला मात्र आतां फार नुकसान सोसावें लागणार आहे. मि० वेड यांच्या जागीं हैद्राबादेस तरी यांची नेमणूक होती तर बरें होतें कळावें लोभ असावा ही विनंति.

आपला
उमरावतीकर.

## स्त्री शिक्षा.

( लिहून आलेला मजकूर. )

आपल्या लोकांचें पाऊल दिवसें दिवस सुधारणेच्या कामांत पुढें पडत चाललें आहे. प्रत्येक गोष्टींत कांहीं तरी सुधारणा करण्याकडे आमच्या लोकांचें लक्ष हळूं हळूं लागूं लागलें आहे. आपली राजकीय व सामाजिक स्थिति इतर देशांच्या स्थितीशीं ताडून पाहिली असतां आपण अद्याप त्यांच्या पुष्कळ मागें आहों असें आपल्यास कळूं लागलें आहे व ज्या गोष्टी आपल्यांत सुधारण्या सारख्या आहेत त्यांत सुधारणा करण्याचा जिकडे तिकडे लोक प्रयत्न करीत आहेत. या सर्व गोष्टी मोठ्या अभिनंदनीय आहेत. परंतु एखादा परदेशीय गृहस्थ आपल्या पुढें एऊन त्यानें "तुह्मी आपली राजकीय व सामाजिक स्थिति सुधारण्या करितां इतके श्रम करितां आहां पण हा वेळ पावेतों तुह्मीं आपल्या स्त्रियां करितां काय केलें आहे?" असा प्रश्न जर केला तर त्यांचें उत्तर काय द्यावें याची आपल्यास मोठी पंचाईत पडणार आहे. आपल्याला जें उत्तर द्यावें लागणार त्याची खरोखर मोठी लाज वाटेल हिंदुस्थानांतील प्रत्येक गृहस्थानें हा प्रश्न आपल्याला करावा व त्याचें उत्तर काय देतां येतें याचा ही विचार करावा. पार्लमेंट सभेंत जागा मिळणें, कायदेकानु करणाऱ्या काउन्सिलांत सुधारणा करणें, इत्यादि राजकीय गोष्टीकडे आमचे लोकांचें लक्ष अगोदर जावें व आपल्या स्त्री समाजाच्या शिक्षणा सारखा अति महत्वाचा विषय आपल्या सुधारकांना गौण वाटावा हो मोठी दुःखाची गोष्ट आहे. सामाजिक गोष्टींपैकीं कांहीं कांहीं गोष्टी गेल्या १०—५ वर्षांत आपल्या लोकांपुढें बऱ्याच आल्या व त्यांचा निकाल ही आपल्या सुधारकांनीं कसा तरी करून टाकला. गेल्या २–४ वर्षांत तर आपल्या सामाजिक स्थितींतील व्यंग्याकडे आपल्या लोकांचें पुष्कळ लक्ष जाऊन त्याविषयीं पुष्कळच चळवळ झाली व खुद्द सरकारला ही त्या गोष्टींत लक्ष घालण्याची जरूर पडली. त्यांत ध्यानांत ठेवण्या जोगी गोष्ट ही आहे कीं या गोष्टी बाहेर जगापुढें आल्या त्या आपल्याच लोकांकडून आल्या नाहींत. एका परदेशीय व परधर्मी गृहस्थाच्या उद्योगानें आल्या. बालविवाह व असंमत वैधव्य, वैवाहिक हक्क इत्यादि सामाजिक विषयाचा गेल्या २—१ वर्षांत जिकडे तिकडे जारीनें उहापोह झाला व हलीं होत आहे. आतां येथें असा प्रश्न सहज उत्पन्न होईल कीं देशाची उन्नति करण्या करितां आपण राजकीय गोष्टींकडे अगोदर लक्ष द्यावें कीं सामाजिक गोष्टीकडे द्यावें? या प्रश्नाला उत्तर देणें फारसें कठीण नाहीं. राज्य व्यवस्थेंत ह्मणा किंवा त्याच संबंधाच्या दुसऱ्या कोणत्या ही गोष्टींत म्हणा परदेशीयां कडून अन्याय झाल्या सारखा वाटला म्हणजे आपण त्याबद्दल कुरकुर करितों व ती अन्यायाची रीति बंद करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे राजकीय गोष्टींत हात घालण्या सारखें आहे; आपण या रीतीनें राजकीय गोष्टीकडे लक्ष देऊं लागलों म्हणजे परदेशीय लोक आपल्यास असा दोष देतात कीं तुमच्या सामाजिक स्थितींत अद्याप पुष्कळ गोष्टी सुधारण्या जोग्या आहेत त्या गोष्टी तुम्ही प्रथम सुधारा; व [illegible] राजकीय गोष्टींत हात घाला. तुमची सामाजिक स्थिती अगदीं निर्दोष झाल्या शिवाय राजकीय विषयांत हात घालण्याचा तुम्हाला कांहीं हक्क नाहीं. वरील कोटी क्रम चुकीचा आहे हें जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या इतिहासा वरून सिद्ध आहे. यद्यपि सामाजिक स्थितीकडे अगोदर लक्ष ग[illegible] पाहिजे तथापि तींतील सर्व दोष नाहींसे हो[illegible] ईतर्यंत राजकीय गोष्टींत आम्हीं मुळींच ल[illegible] देऊं नये असें कधींही म्हणतां येणार नाहीं या दोन्ही रीतीच्या सुधारणा बरोबर झा[illegible] पाहिजेत.

मी हें जें वर कांहींनें विषयांतर कर[illegible] लिहिलें आहे त्याचा उद्देश [illegible] गोष्टीकडे म[illegible]ऱ्या लोकांनीं के[illegible]

ठक्ष देतां उपयोगीं नाहीं. सामाजिक स्थितीची सुधारणाही त्या बरोबरच झाली पाहिजे.

आमच्या सामाजिक स्थितींत हल्लीं सुधारणा करण्या जोग्या ज्या कांहीं गोष्टी आहेत यांत आपल्या स्त्री जातीची सांप्रतची स्थिती या सारखी महत्वाची गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. बालविवाह, असंमत वैधव्य वैवाहिक हक्क या संबंधाच्या आपल्या चाली लोकांना मोठ्या महत्वाच्या वाटतात खऱ्या परंतु माझ्या मतें त्यांना इतकें महत्व नाहीं. आपल्या स्त्रियांची स्थिती हल्लीं आहे त्यांत इष्ट सुधारणा झाली तर या चाली खरोखर अपोआप नाहींशा होतील. त्या नाहींशा करण्या करितां निराळे प्रयत्न करण्यास नकोत. जोंपर्यंत आपल्या स्त्रियांच्या नेत्रांवर अज्ञान तिमिराचें पटल हल्लीं प्रमाणें आहे तों पर्यंत त्यांची सामाजिक स्थिती सुधारण्याचा आपण किती ही प्रयत्न केला तरी तो निष्फळ आहे. आपल्या प्रत्येक सामाजिक गोष्टींत स्त्रियांचा कांहीं तरी संबंध आहेच; तेव्हां समाज सुधारणा करूं इच्छिणाऱ्या गृहस्थानें पहिलें काम स्त्रीसमाजाच्या स्थितींत सुधारणा करणें हेंच केलें पाहिजे. जगांत स्त्री जातीची वास्तविक योग्यता कोती आहे हें पाहूं गेलें. असतां सर्व गोष्टींत पुरुषां प्रमाणें त्यांस मानमिळाला पाहिजे ही गोष्ट रास्त दिसते; व हिला अनुसरून च हालींच्या काळांत इंग्लंडा सारखीं सुधारलेलीं जीं राष्ट्रें आहेत त्यांत स्त्री जातीला अतोनात मान दिला जात आहे. स्त्रियांनां वाजवी पेक्षां फाजील स्वातंत्र्य देणें श्रेयस्कर आहे. कीं नाहीं याचा विचार करित बसणें म्हणजे विषयांतर होणार आहे करीतां आपल्या सध्यांच्या कालमानास अनुसरून स्त्रियांस शिक्षा कोणत्या प्रकारची दिली पाहिजे हें प्रथम सांगून नंतर व्यवहारांत त्यांची योग्यता कशा प्रकारची ठेविली पाहिजे याचा आपण विचार करूं.

( पुढें चालूं. )

वऱ्हाडसमाचार.

मित्ती आश्वीन वद्य ८ शके १८०९

## विनंति.

आह्मी सालाबाद प्रमाणें आमच्या कारखान्यांतिल मंडळीला दिपवाळी नीमीत सुट्टी देणार आहे याकरीतां आमचा पुढील अंक नीघणार नाहीं. आमचे प्रिय आश्रय दाते याबद्दल आम्हाला क्षमा करीतीलच.

## शाळाखात्याचा वार्षिक रिपोर्ट. सन १८८६-८७.

गत मागील अंकावरून पुढें चालूं.

...ंच्या फीचें उत्पन्न ३८,७१२ रुपये होतें तें या वर्षीं ५११६९ झालें. तसेंच मुलांच्या हजेरीचें प्रमाणही दोन हजारांनीं वाढलें. गेल्यां वर्षीं ३८८३९२ रु. खर्च झाला होता तो या वर्षीं ४०२७८२ रुपये झाला. तसेंच उत्पन्न गेल्या वर्षीं ३७९९५९ होतें तें या वर्षीं ४०६१७५ रुपये झालें आणि इतकें होऊन गेल्या वर्षीं प्रत्येक विद्यार्थ्याकरीतां २०१२०१ खर्च झाला होता तो या वर्षीं २०९०१ झाला. ४३६६१ विद्यार्थ्यां पैकीं ३६८८६ विद्यार्थी सरकारी व म्युनिसिप्यालिटीच्या शाळेतून अभ्यास करीत होते व बाकीचे खानगी शाळेतून अभ्यास करीत असत. या १६८८६ विद्यार्थ्यांत स्कूलफी देणाऱ्यांच्या मुलांचीसंख्या १६७८४ होती. सरकारी नौकरांची २७३५, व्यापाऱ्यांची ४५२१, शेतकऱ्यांची ५२६५, व इतर ७५८१ मुलें होतीं. ज्यांचें वर्षाचें उत्पन्न ५ हजार किंवा त्याहून अधिक अशा लोकांची मुलें ५०० किंवा शेंकडा १ पेक्षां अधिक इतकीं अभ्यास करीत होतीं. ५ हजारापेक्षां कमी परंतु २०० पेक्षां अधिक ज्यांचे वर्षाचें उत्पन्न अशा लोकांचीं ९९१६ ९९१६ किंवा शेकडा २५ पेक्षां कांहीं अधिक मुलें अभ्यास करीत होतीं. आणि ज्यांचें उत्पन्न २०० पेक्षां कमी अशा लोकांचीं मुलें २५४७० किंवा शेकडा ७१ पेक्षां अधिक इतकीं मुलें अभ्यास करीत असत, असें दिसतें. हायस्कुलांतून अभ्यास करणारीं मुलें शेकडा ७४ ब्राह्मण आहेत. शेकडा ८ कुणबी आहेत. शेकडा ११ इतर हिंदु आहेत. शेकडा ४ मुसलमान आहेत आणि युरोपियन मुलगा फक्त एक आहे. व नीच जातीचा मुलगाही एकच आहे. मध्यम प्रतीचे शिक्षणात शेकडा ३९ ब्राह्मण आहेत. शेकडा ११ कुणबी आहेत, शेकडा २ नीच जातीचे आहेत. जवळ जवळ शेकडा ४० इतर हिंदु आहेत. शेकडा ६ मुसलमान आहेत. या शिवाय पारशी लोकांचीं १० व युरोपियनांचीं ८ मुलें या मध्यम शिक्षणांत आहेत. आद्य शिक्षणांत ब्राह्मणांचीं मुलें शेकडा १० आहेत. कुणबी शेकडा २८ आहेत, नीचजातीचे शेकडा ४ आहेत, इतर हिंदु शेकडा ४२ आहेत व मुसलमान शेकडा १५ आहेत. या शिक्षणांत युरोपियनांचीं ८ मुलें व इतर २० मुलें आहेत. पारशी मुळींच नाहींत. म्युनिसिप्यालिटीच्या ताब्यांतील शाळेंतूनही प्रकार हाच दिसून येतो. तशा शाळांतून एकंदर २११३ मुलें आद्य शिक्षणांत आहेत त्यांत ब्राह्मण शेकडा १६ कुणबी शेकडा ५ नीच जातीचे शेकडा ३ अन्य जातीचे हिंदु शेकडा ४४ आणि मुसलमान शेकडा ३० आहेत. या शाळांतुन युरोपियनांचीं ५ मुलें, व पारशी १ मुलगा विद्याभ्यास करीत आहे.

वरील माहिती वरून शाळाखात्यांत गत सालीं उत्तम काम झालें हें दिसून येईल. आमच्या प्रांतांतील मुनसिपालिट्या शिक्षणाकडे आतांशा फार लक्ष देऊं लागल्या आहेत हें त्यांस भूषण आहे. अकोला व खामगांव एथील मुनसि० नीं या कामीं बरीच कळकळ दाखविली आहे. निरनिराळ्या ठिकाणच्या शाळा कमिट्यांनीं मात्र आपलें काम बजवावें तसें बजावलें नाहीं. फक्त इलिचपूर जिल्ह्यांत या कमिटीच्या लोकांनीं शाळांची तपासणी वारंवार केली आहे. ही गोष्ट तेथील डे० क० कर्नल मेकंझी यांस खरोखर भूषणार्ह आहे. वास्तविक पहातां या कमिट्यांना आपापल्या गांवच्या शाळा चांगल्या चालत असल्याबद्दल भूषण वाटलें पाहिजे, व त्यांची स्थिती चांगली व्हावी या करितां त्यांनीं मनोभावानें झटलें पाहिजे. पुढील रिपोर्टांत या लोकांच्या संबंधानें चांगलें लिहिण्याचा प्रसंग येवो असें आह्मी इच्छितों.

यंदा दुसरी वाईट वाटण्या जोगी गोष्ट ही दृष्टीस पडते कीं रेव्हेन्यु खात्यांतील कामगार लोकांनीं शिक्षणाच्या कामांत हावी तशी कळकळ दाखविली नाहीं. डे. कमिशनेर, असिस्टंट कमिशनरस, एकस्ट्रा अ. कमिशनरस वगैरे कामगारांनी शाळा वारंवार पाहिल्या आहेत परंतु तहसिलदारांच्या हातून हें काम चांगलें झालें नाहीं. आमच्या तहसिलदारांची शिक्षणाच्या कामांत ही अनास्था पाहून आह्मांस फार वाईट वाटतें. त्यांनीं आपल्या तालुक्यांतील इतर कामा प्रमाणेंच हें काम समजलें पाहिजे. अलीशान रेसिडेंट साहेबांनीं या संबंधानें तहसिलदारांस बराच दोष दिला आहे व तो योग्य आहे. तहसिलदारां सारख्या तालुक्याच्या अमलदारांनीं या कामीं आस्था दाखवल्यास शाळा खात्याचें खरोखर पुष्कळ हित होणार आहे. पुढील वर्षीं आमचे तहसिलदार आपलें हें कर्तव्य कर्म कसें बजावितात पहावें.

( पुढें चालू )

## √ भोपाळची बेगम व पोलिटिकल अधिकारी.

एतद्देशीय वर्तमानपत्रांविरुद्ध कायदा करून त्यांचीं तोंडें बंद करून टाकण्याचा जे कोणी आंग्लो इंडियन्स नेहमीं प्रयत्न करीत असतात त्यांच्या हातून कधीं कधीं ज्या अन्यायाच्या गोष्टी घडतात त्या ऐकिल्या असतां त्यांच्या या प्रयत्नांची क्षुद्रता व अपमतलबीपणा यांचें चांगलें स्वरूप ध्यानांत येतें. अशा गोष्टी सरकारच्या कानांवर जाण्यास सध्यां आम्हाला मुख्य साधन वर्तमानपत्रें आहेत; त्यांचीं तोंडेंच अजिबात बंद करून टाकलीं म्हणजे सर्व गुपचिप राहील असें मानणें म्हणजे हा केवळ नीचपणा आहे. असो. यूरोपियन अंमलदारांचा अन्याय व त्यांचीं दुष्कृत्यें उजेडांत आणण्याचें कामीं आमचें बंगदेशीय बंधु अमृतबझार पत्रकर्ते यांची मोठी आस्था आहे व हें काम ते नेहमीं मोठ्या आस्थेनें करीत असतात. थोड्याच दिवसां मागें झालेलें प्रसिद्ध बीम्स प्रकरण या पत्राच्याच उद्योगानें बाहेर आलें. याच्या तावडींत हल्लीं एक मोठा पोलिटिकल आफिसर सांपडला आहे व त्यावर आपल्या लेखाचें चांगलें तडाके मारण्याचें काम या पत्रानें आज कितीक दिवस चालूं ठेविलें आहे. हा आफिसर कोण हें आमच्या वाचकांस अगोदरच कळलें आहे. विलायतेला जाण्या करितां ज्यानें होळकर सरकारची बळेंच भेट बांधिली, व तिकडे असमान झाल्या मुळें ते एकदम रागावून निघाले असतां ज्यानें वरांतील कोणी आप्त फार आजारी असल्या कारणानें होळकर सरकार घाईनें जात आहेत असें, प्रत्यक्ष होळकर साहेब ही गोष्ट नाकबूल करीत असतां जिकडे तिकडे प्रसिद्ध केलें तो ही स्वारी सर लेपेल ग्रीफीन होय. या स्वारीला आपल्या तडाक्यांत आणण्याचें कारण त्यांची भोपाळच्या बेगम साहेबांशीं दांडगेपणाची व अश्लाव्य वर्तणूक होय. आमच्या बंधूनें या साहेबांवर मुख्य हे आरोप आणिले आहेत: ( १ ) बेगम साहेबांच्या इच्छे विरुद्ध संस्थानांत मोठमोठ्या जागीं आपले आवडते कामगार नेमिलें व या नेमणुका त्यांना पसंत करावयास लाविलें; ( २ ) बेगम साहेबांशीं राजनिष्ठेनें व प्रामाणिकपणानें वागणारे जे जुने कारभारी होते त्यांना बळानें हाकलून दिलें; ( ३ ) नीच व हलके असे लोक जुलमानें दरबारांत आणिलें; ( ४ ) जे लोक बेगम साहेबांशीं शत्रुत्वानें वागत असत त्यांस दरबारांत मोठालीं कामें देण्यास लाविलीं; ( ४ ) कांहीं अधिकार नसतां इंग्रज सरकारच्या रागाची धास्ती घालून बेगम साहेबांस त्यांच्या पती पासून निराळें रहाण्यास लाविलें. ( ४ ) बेगम साहेबांच्या कन्येशीं बेकायदेशीर व संशयात्मक असें वर्तन व संघटण ठेविलें. इ०

प्रसंग आला असतां या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. हें सिद्ध करून दाखविण्यास आमचे बंधु तयार आहेत असें म्हणतात, आणि त्याबद्दल आम्हाला खात्री ही आहे. कारण या कामांत आमचे बंधु जरी नेहमीं पुढें असतात तथापि हातांत चांगला पुरावा असल्या शिवाय एवढें मोठें धारिष्टाचें काम त्यांनीं कधींच हातांत घेतलें नसतें. एकंदरींत ग्रीफीन साहेब विलायतेहून इकडे परत आल्यावर त्यांस ही एक उत्तम मेजवानीच मिळणार आहे. हें प्रकरण बरेंच चालेल असा सुमार दिसत आहे. अलीकडे अशा पोलिटिकल कामगारांच्या हातून असलीं कामें झाल्यांचीं उदाहरणें बरींच बाहेर येत आहेत. एतद्देशीय संस्थानांत इतक्या मोठ्या अधिकाऱ्याच्या व दर्ज्याच्या कामावर नेमिलेल्या गृहस्थां बद्दल नुसतें असलें संशय येणें देखील फार वाईट आहे मग प्रत्यक्ष आरोप येणें ह्मणजे तर फारच शोचनीय गोष्ट आहे— यद्यपि एतद्देशीय संस्थानक ब्रिटिश सरकारचे अंकित ह्मणवितात तथापि जर खुद्द राणी सरकार त्यांना आपले स्नेही समजत आहेत तर त्यांच्याशीं आदबीनें व रीतीनें रहाणें हें ब्रिटिश सरकारनें आपल्या वतीनें नेमिलेल्या गृहस्थांचें काम आहे. हे लोक बहुत करून आमच्या राजे रजवाड्यांस शुद्र बाहुल्या प्रमाणेंच त्यांच्याशीं वर्तन ठेवीत असतत. असो लार्ड डफरीन साहेब न्यायी म्हणवीत आहेत तेव्हां ते या प्रकरणाचा चांगला विचार करतीलच.

मुंढव्याच्या पेपर मिलाला सुरवात तारीख ५ रोजीं नामदार लार्ड रे साहेब, मुंबईचे गव्हरनर यांनीं केली. या पूर्वींच तिच्या मधून निघालेले कागद मासल्या करितां बाहेर आलेलें होते. ज्ञानप्रकाश, केसरी, ज्ञानचक्षु, इत्यादि तेथील पत्राचे कांहीं अंकही याच कागदांवर निघालेलें होते. आह्मी कागद पाहिला. फार उत्तम व सुरेख आहे. विलायती डेमी कागदा पेक्षां याच्या आंगीं सुबकपणा आह्मांस जास्ती दिसून आला. या भील

मध्यें पहिल्या प्रयत्नालाच असा सुंदर कागद निंवू लागला तर हा कारखाना आपल्या देशाला एक भूषणच होणार अहे. याचा पुढें असाच उत्कर्ष होऊन याला चांगलें स्वरूप येवो असें आह्मी मनोभावापासून इच्छितों. स्वदेशाभिमाना विषयीं घमेंड बाळगणारे आमचे लोक या स्तुत्य उद्योगास आपला उदार आश्रय देतील अशी आमची पूर्ण आशा आहे. आह्मी लवकरच या कागदाचा उपयोग करण्यास लागणार आहों व आमचे इतर बंधूही या कारखान्याला आपला आश्रय देतीलच.


# The Berar Samachar

MONDAY OCTOBER 10
1887.


## OURSELVES

As our office will be closed, as usual, for the Diwali Holidays we beg our con stituents will kindly allow us the indulgence of a holiday next week

## NECESSITY OF A DRAINAGE FOR AMRAOTI.

(concluded from our last)

There is the President of the local Municipality, Colonel Bullock, who has seen the evil the Commissioner has probably seen it too; but has any of these officers done anything to remedy the evil?

There is an old pacca stone and mor tar drain in the town which is an underground ore. The roads have been raised year after year on account of Moorum being Ghut on the roads and the level of the drains is now far below the ground. The underground sewer age system has not stood the test of experience; the subsoil drainage always contains noxious gases and is a perpetual source of typhoid or other virulent types of fever. Light cannot enter in those drains, and its wholesome influence of being able to reach the destructive gases harboured within they issue forth through chinks and crevices and pollute the atmosphere. The Bombay experience of underground sewerage has shown that the thing is dangerous and should be avoided if possible. It is to be seen whether the particular advantages which the Bomday municipality is trying to avail itself of, of getting the underground drainage flushed by the ingress of sea-water at one end and its egresg at the other, will eventually succeed. There is no chance of any kind of flushing being had here; and consequently with the evils of the underground drainage so apparent, that kind of drainage is out of the quesion here.

After acknowledging the evil however, there will be the great obstacle to all schemes of improvement:—viz, the want-of-funds obstaile. The Committee might say we know practically that the evil exists but how can it be remedied? Where are the funds where with to con struct a drainage for a town like Amraoti. The estimated cost for a comprehensive drainage scheme for the whole town would amount to something like a lakh of rupees. Now where is this one lakh to come from? It might be very well to speak of a drainage system but where is the money to construct it. And again, the Committee having lately incurred a heavy responsibility with regard to the water supply of the town and having to pay annual instalments of about 7000 or so, they are not in a position to incur any further liability so soon. These are the practical objections to the scheme—at any rate the Municipality might consider them to be so. It will appear however, on a little reflection, that the necessity for a drainage system is so very great that all such considerations are necessarily outweighed by the urgency of the measure and that the system must be undertaken at any cost. The water supply of the town is now a *fait accompli* but such objections existed in the case of that scheme too. If all such objections were considered as of no con sequence and a water supply for the town deemed to be a thing of importance, can it not be urged that the drainage system is a still greater necessity Under hot climes drainage is a prime necessity for obvious reasons. If the water supply was brought into existence with an additional burden on the citizens in the shape of a fresh house tax, the drainage scheme will certainly be far more acceptable to the people, if it can be pointed out that a drainage can be made *without* any further addition on the people's purses. We propose that a loan of a lakh of rupees should be started by the committee. If the Government guarantee it, which is can very safely, the loan can easily be raised at the 4 per cent rate. There was a time when Goaernment used to raise up loans on its own responsibility and advance sums out of them to the local Municipalities. The practice was a very good one and had a wholesome effect on the financial conditions of the Municipalities; for the latter were thus enabled to raise works of permanent utility with monies at the very moderate rate of 4 per cent. But the practice having ceased Government should certainly go so far as to guarantee the repayment of the loan. In the case of the water-supply, the Government saw its way to advance to the Municipality a sum of 75000 gratis, and another 75000 repayable by instalments with interest. The money was all advanced out of the balance of Jaglia collections. The Government might very properly be asked to advance a sum on such conditions as it think fit for the construction of a drainage system. But even if there be a simple Government guarantee for the loan and no actual advance from Government itself, the amount of interest every year will be something like 4000 a year. This sum of 4000 can be met *without* any additional tax being imposed on the people. Something like 6000 is spent every year on the conservancy department of the Committee including the expenditure for Mori water carts. If four thousand out of this sum is deducted every year for interest of a lakh of rupees, a little more from the general funds to supplement the remaining 200 will suffice to meet the other expense for conservancy. Drainage for a town like Amraoti is a thing that is needed as well in the interest of generations yet unborn as in those of the existing generation and consequently the sum of 4000 a year will be only a legitimate charge on the revenues of the Committee. The Committee might, in course of time as its revenues increase, pay off portions of the principal or create something like a sinking fund which will see the one lakh repaid in some years to come. This is all within the range of practical Municipal action and it only requires the courage to deal systematically with a very pressing need. So much for the objection regardin want of funds. As to the other objection that no attention can be paid to drainage so long as the water scheme debt is to be paid off is absurd on the very face of it. It is not pretended that drainage is less important than a scheme of fresh water supply or that the former can very well be left over until such time as the Committee find funds for doing it. And yet we have been informed that such an objection has been already embodied in a resolution of the General Committee of Amraoti. The wonder is, that the higher authorities feel satisfied with such explanations given by the Committee. We can only ask the question is not the want of drainage for Amraoti a crying evil and if so must it not be remedied? We must pause here and await the answer.

## TECHNICAL EDUCATION

(continued from our last issue)

It leaves one no incentive to work in the fulness of your abilities as promotion in service does not necessarily depend upon personal merit and ability; the pay is secure even if one works ordinarily, It is also bad because one is pitied against the interests of the public representing the Government as one is bound to do while one is in service. The very position as government servant precludes the possiblity of attending thoroughly to popular intersts and makes you more or less tool of oppression in the the hands of foreign officials. Thirdly, service engenders a habit of servility and cycophancy which is perilous to self-esteem and patriotism—virtues of which we stand in great need at present. The case of many eminent persons who are in Government service will realize the truth of the above remarks. All these evils of service are likely to be done away with if we take to independent professions involving manual labour. That we shall improve physically by taking to Technical Education goes without saying. We know that the artizan classes keep, generally speaking exemplary health; for they get their bread by the Sweat of their brow. This will also improve health of our children and complaints of evils of infant marriage will rarely be heard. From the aspect of the question then Technical Education will be a distinct advantage.

Again the moral tone of the lower classes in India will be raised by Technical Education. Every person exercising an independent calling must necessarily get competence and as poverty is well known to be a source of so many misdeeds it will not be unreasonable to suppose that people rising to a certain social, status and getting their bread independently should have their moral tone raised also.

But the most important result will be the acquisition of the habit of depending upon one's own exertions and the independence of character which is so essential to make a good nation. The working classes are a mighty power in England and their importance is daily rising. They are daily feeling their independence and are an intelligent following to their English leaders. The gentlemen of England won the Magna Charta for England but the working classes in England are sure to wield the future destinies of England. There they form the great backbone of the present structure. Here in India we have to *create* a following; and this is very important, for what are leaders worth if people cannot and are not prepared to follow them intelligently The hearts of our leaders often fail them here because they are conscious it is a risky thing to undertake anything of public importance. In England the plaudits of the multitude have been enough to keep up the spirit of public men fighting for public liberties; and we know as a matter of fact that the plaudits of masses have been bitter warning to princes on their thrones. Here in India the public men whoever they are hardly get as much sympathy as is necessary to keep them up & inspire them with courage. We have fat Government service and self-interest seeking promotion on the one hand and the dreary prospect of official displeasure, loss of personal benefits and the lack of public sympathy on the other. It does not require a philosopher to see what a person will do under such conflicting circumstances, if option be. Technical Education will create a following. It will create independence of thought & action. It will make the masses what a system of good Government ought to make them-a healthy moral, and independence loving people. What better results are wanted.

## वऱ्हाड

येथें तारीख २५ पासून ता० ३१ आक्टोंबर पर्यंत गुराचें प्रदर्शन व घोड्याच्या शर्यती निमित्त वऱ्हाडांतील सर्व यूरोपियन लोक व नागपूर व मुंबई कडील बरेंच युरोपियन अधिकारी जमणार अहित. तहसिलदार मार्फत सरबराइची गडबड जारीनें सुरू अहि.

मि० मुबारकअली तहसिलदार अकोट हे रजेवरून परत येऊन त्यांनीं आपलें कामाच चार्ज घेतली व मि० गोविंद गंगाधर दामले यांस मेहकरास तीन माहेन अ० तहसिलदार नेमून त्यांस सेकंड क्लास माजिस्ट्रेटचे अधिकार दिलें.

मि० केशवराव जैकृष्ण ए० अ० क० एलिचपूर पहिलावर्ग माजिस्त्रेठ यांस क्रि० प्रो० कलम ११०-१३३-१८६-१९१ व कलम ५२४ प्रमाणें ज्यास्त अधिकार देण्यांत अाले.

मि० ए. ए. डी जोन्स हे आपले पूर्वीचे ज्यु० क० चे सुप्रिंडेंटचे जागेवर लवकरच परत येणार असे समजतें रेव्हिन्यु क० चे सुप्रिंडेंटचे जागेवर हैद्राबाद सेक्रेटरी आंफिसातील क्लार्क मि० जे वेड. यांस नेमणार मि०जोन्स यांची नेमणुक हैद्राबादेस रेसीडेंट साहेबांच्या वऱ्हाडच्या हापीसांत ३०० रुपयांवर झाली.

बुलठाणें येथील डे० क० चे इंग्रजी आफिसांतील सेकंड क्लार्क मि० स्काट यांस देवाज्ञा झाली असें समजतें.

मुसनरीम व क्लासर लोकांची परीक्षा अटोपली एकंदर उमेदवार ६२ मुनसरीम व २० क्लासर मिळून ८२ होते. या लोकांस परिक्षेचे विषय ही अगाऊ कळविले नव्हते मुनसरीम लोकांचे प्रश्न बहुतेक त्यांचे वहिवाटीस सोडून बरेच होते. क्लासर लोकांची परीक्षा बरीच कठीण झाली. क्लासर लोकांपैकी बहुतेक मंडळी नापास झाली आहे. या लोकांवर हें एक गंडांतरच आलें ह्मणून समजावें.

हायस्कूलच्या परीक्षा यंदा बऱ्या झाल्या इतिहास भुगोलाचे प्रश्न मात्र जरा अवघड होते. नव्वया किंवा दहाव्या इयत्तेला १[illegible]व्या किंवा १५ व्या शतकांतील लोकांच्या रितीभाती, खेळ यांची माहिती विचारणें ह्मणजे जरा बिलण दिसतें.

वर्तमान[illegible]

मि० ओब्रीअन यांना तीन तीन महिन्यानें मुदतीच्या दोन शिक्षा लागोपाठ झाल्या आहेत. पहिल्या तीन महिन्यांच्या शिक्षेवर अपील केलें आहे. त्याचा निकाल होई पर्यंत त्यांना जामीनावर सोडलें आहे.

अपघात.– बंगल्यांत कोणी एक बाबू आगगाडींत टर्पेटाईन् तलानें भरलेला उघड डबा घेऊन गाडींत बसला असतां त्यांतील तेल हिसकून शेजारचें लोकांचे अंगावर जाऊं लागलें ह्मणून पहाण्या करितां त्या गृहस्थानें काडी ओढिली. त्या बरोबर तेलानें पेट घेऊन डबा पेटला व त्या बांदलीं कांहीं लोकांनीं बाहेर उड्या घातल्या त्यांपकीं दोवे असामी मेले-

नामदार गव्हरनर जनरल साहेब यांणीं जगन्नाथ पिलग्रीम फंडाला १७० रुपये दिले.

ग्लासगो येथें होणाऱ्या प्रदर्शनासाठीं मद्रास सरकार ५०,००० चिरुट पाठाविणार आहेत.

मद्रास इलाख्यांत रेलवे करितां नव्वद लक्ष रुपये देण्याचें सरकारानें ठरविलें आहे बेलोर पासन विलापुरम पर्यंत १३५ मैल लांबीच्या रस्त्याचे कामाची सुरवात पहिल्यानें होणार आहे.

ऐलंदांत योहल येथें रेलवेचे रूळ उपटले व तारा तोडल्या असें समजतें.

व्हाइसराय साहेब व कमांडर इनचिफ साहेब सरहद्दीवर जाणार आहेत. ते वेळीं त्यांच्या पत्न्या त्यांज बरोबर जाणार आहेत.

फ्रांको जर्मन सरहद्दीवर जी दुःखकारक गोष्ट घडली त्याबद्दल फार वाईट वाटतें. व जंगलावरील अधिकाऱ्यांनीं फ्रेंच सरकारचा अपराध केला तो त्यांच्यावर शाबीत झाला तर जर्मन सरकार त्यांचा चांगला बंदोबस्त करील असें प्रिन्स बिस्मार्क यांणीं फ्रेंच सरकारचे फॉरिन मिनिस्टर ( परराष्ट्र संबंधी मंत्री ) एम. फ्लॅरन्स यांस कळविलें आहे.

पंडिता रमाबाई पुणें मुक्कामीं बालविधवांकरितां एक गृह बांधणार आहेत व त्या इमारती करितां लागणारा खर्च व दरसाल शाळेच्या खर्चांची व्यवस्था अमेरिका इंग्लंड व हिंदुस्थान येथील फंडांतून करणार आहेत. इमारतीच्या खर्चाचा अजमास ५०,००० रु०, दरसालच्या खर्चाचा अजमास १२,००० रु० आहे.

हिंदुस्थानांतून जाणाऱ्या मालावर काबूलचे अमिरानें जकातीचा दर जबर ठेविल्यामुळें काबुल व बुखारा यांमधील व्यापार मंद पडला असें म्हणतात. त्या बद्दल सरकारची चौकशी चालू आहे.

मुंबइ इलाख्यांत मि. जौस या नांवाचा एक डच तंबाखूचा व्यापारी आहे. त्यानें भूगत द्रव्य काढण्याचे एयें विजेचे यंत्र नवीन तयार केलें आहे. त्याचा उपयोग करण्याकरितां त्यानें सरकारची परवानगी मागितली परंतु सरकारानें दिली नाहीं. त्याचा उपयोग प्रथम खानगी जागेंत करून पाहिल्यावर परवानगी देण्याचें पाहूं असें त्यास सांगितलें.

विलायती मालाचें ऐवजीं देशी मालाचा फुकारी हकिमांतून उपयोग होऊं लागल्या रु. खर्च १८८६–८७ सालांत २१,०४२ या झाली ५,७२ रुपया मागील सालापेक्षां [illegible] सरकारचा नास्त फायदा झाला.

एका गृहस्थानें पांचशें रुपयांच्या डुकल्या खाल्या. त्या अशा. लिलावाचे जागीं हे गृहस्थ एका खुर्चीवर बसले. बसतां बसतां लिलाववाल्याचे ओरडण्यानें ह्या गृहस्थाचा डोळा लागला व लिलावदारानें किंमत पुकारण्यास व याना डुलकी येण्यास एक गांठ पडावी. असें कांहीं वेळां झालें. लिलाव आटोपल्यावर ही स्वारी जागी झाली व मुकाट्यानें घरीं गेली. दुसरें दिवशीं सकाळीं पाहतात तों त्या लिलावदाराकडून कांहीं जिनसांच्या किमतीचे पांचशे रुपयांचे बिल आलें. झोंपेंत मान हलली ती त्यानें माल लिलवाचे किमतीला पतकरल्या बद्दलची खूण केली; असें तो लिलावदार समजला. सु० प०

इराणच्या हद्दींतून अयुबखान पळाला. आणि त्यामुळें इराणच्या शहा जरी बाह्यात्कारी दुःख दाखवीत आहे, तरी अंतर्यामीं त्यास मुळींच दुःख वाटत नाहीं.

गजभक्षक लोकः— नागा प्रदेशामध्यें सपगुटिंग टेकडीवर दगड नेण्या करितां कांहीं हत्ती कामाला लाविलें होतें, त्यांपैकीं जवानपासरी नांवाचा एक हत्ती पाठीवर दगड घेऊन टेकडीवर चढत असतां टेकडीच्या अगदीं माथ्याजवळ जाऊन तेथून जो पडला, तो गडबडत येऊन पायथ्याशीं मृतप्राय होऊन पडला. महातानें त्यास उठविण्या बद्दल पुष्कळ प्रयत्न केले परंतु. व्यर्थ बापडा गज तेव्हांच यमसदनी गेलेला तो कसचा उटतो? एवढ्या जडदेही प्राण्याचे शरीर तेथून निघावें कसें? या विवंचनेंत तेथील लोक असतां त्या दिवशीं रात्रीं समगुटिंग खेड्यांतील पुरुष, बायका व मुलें मिळून सुमारें ५०० असामी हातांत मशाली व हिलाल घेऊन त्या उजेडानें हत्तीचे त्यांनीं तुकडे करून त्यांनीं सर्व मांस काढून घेऊन ते आपल्या खेड्यास परत आले. तेथें त्यांनीं त्या पर्वतप्राय प्राण्याच्या मांसाची मेजवानी करून कांहीं वेळां मध्यें ते सर्व मांस फस्त करून टाकिलें? हे लोक गजभक्षक नरसिंव्हच ह्मणावयाचे! ! ज० मि०

जर्मनी व फ्रान्स ह्या दोन देशांत क्षुल्लक कारणावरून एक लहानसा तंटा उत्पन्न झाला आहे. जर्मनींतील जंगलांत कोणी फ्रेंच शिकारीस गेला होता, त्यास जर्मन जंगलच्या अधिकाऱ्यांनीं गोळी घालून मारिलें ह्मणून फ्रेंच सरकारनें आपल्या वकिला मार्फत जर्मनींतील अधिकाऱ्यांस जंगल खात्यांतील लोकांनीं केलेल्या अपराधाची चौकशी करून अपराध्यास शासन करण्या विषयीं लिहून पाठविलें आहे. सारांश यूरोपांतील राष्ट्रांचीं मनें परस्पराविषयीं लिहून पाठविलें आहे. तेव्हां कोणत्या वेळीं काय होईल, ते सांगवत नाहीं.

इंग्लिश लोकां विषयीं ऐरिश लोकांची मनें पूर्वी पासूनच कलुशित आहेत. तशांत शेतकऱ्यांनीं नेमल्या वेळीं जमिनदारांस जमिनीवर बसविलेला सारा न दिल्यास त्यास बेदखल करण्या विषयींच कायदा अलिकडे ब्रिटिस सरकारानें तो कायद्याच्या जोरानें अमलांत आणण्याची तजवीज चालविल्या पासून ऐरिष लोक फारच खवळलें आहेत. जमिनदारांस वसूल देऊं नये असें रयतेस सांगणाऱ्या लोकांस सरकार शिक्षा करीत आहे. मि० आब्रियन नामक पार्लमेंट सभेच्या ऐरिशमेंबरांवर मुकद्दमा करून गाजिस्त्रेटानें त्यास कैदेची शिक्षा दिल्याचे नुकतेंच तारेंतून वर्तमान आहे. ह्या लोकांस शिक्षा दिल्यानें ते दबून हुकूम मान्य करतील असें सरकारास वाटतें. परंतु तो ह्या उपायांनीं सरकारचा उद्देश तडीस जाईल कीं नाहीं ह्याचा संशयच वाटतो. एक दोन ठिकाणीं ऐरिशांनीं आगगाड्यांच्या सडका मोडून टेलिग्राफच्या तारा तोडून टाकिल्या असें समजतें. न्या०सु०

गेल्या ब्रम्हो लढाईवर गेलेल्या शिपाई वगैरे सर्व लोकांस त्या लढाईचे बिल्ले देण्याचें ठरलें आहे.

शिकंदराबादचा कांटोनमेंट माजिस्ट्रेट फार विलक्षण तऱ्हेचा मनुष्य आहे असें खालील माहितीवरून कळेल. त्याच्या हापिसांतील एका हिंदु कारकुनास एका गृहस्थानें विचारलें कीं आज म्हणजे दसऱ्याच्या दिवशीं कितीवेळ सुटी मिळेल? त्यावर त्या कारकुनानें उत्तर दिलें कीं, आज २ वाजतांना आम्हास समुद्र किनाऱ्यावर देवाची भेट घेण्यास गेलें पाहिजे त्यावर त्या गृहस्थानें उत्तर दिलें कीं, दोन वाजतांच का इश्वरानें भेटण्याची वेळ ठरविली आहे? त्यावर त्या हूशार कारकुनानें सांगितलें कीं, इश्वरानें नाहीं पण आमच्या कांटोमेंट माजिस्ट्रेटास केवढा मोठा हा अधिकार दिला आहे.

हैद्राबादपांसूत मारवाडसंस्थानांत पंचभद्रापर्यंत एक रेल्वे करावी असें विलायतच्या लोकांचें म्हणणें आहे.

माजी गायकवाड मल्हारराव यांच्यावरील आरोपाच्या चवकशीच्यावेळीं त्यांच्या तर्फेने वकिलीचें काम करण्याकरतां डा. काव्हन नावाचे एक बारिष्टर झटत होते व मल्हारराव कैदेतपडल्यावर त्यांच्या सुटकेबद्दलही त्यांनी प्रयत्न केला होता हें सर्व प्रसिद्ध असून त्या मेहनतीबद्दल ते आतां हल्लींच्या गायकवाड सरकारावर दावा करणार आहेत असें सांगतात.

अफगाण संबंधानें इंग्लंड व प्रशिया यांच्या दरम्यान झालेल्या पत्रव्यवहार संबंधानें एक बुक झालें असून त्यांत रशियत वर्तमान पत्रांचा झोक हल्लीं चांगला होत चालला आहे आणि अयुबखानाचें पळून जाणें व धुलिपसिंग यांच्या बाबतीत त्यांचे म्हणणें योग्य असें पुढें येऊं लागलें आहे असें प्रसिद्ध झालें आहे.

वाळलेले अंजीर वगैरे काबुली लोक इकडे विकतात हें सर्वांस माहीत आहे. पण ते तसल्या जातीचे पदार्थ सिंध, पंजाब व पशिवनगर या वाटेनें दरसाल किती येतात याची कोणास कल्पनाही नसेल. गेल्या वर्षीं एकट्या पंजाबांत या असल्या जिनसा १६६०००० मण किंमत रुपये ११॥ लाखच्या आल्या असें प्रसिद्ध झालेल्या सरकारी माहिती वरून होतें. हिंदुस्थानांतून अफगाणिस्थानांत विशेष असा गहूं मात्र जातो व जाणाऱ्या गव्हांची गेल्या तीन वर्षांची रक्कम रु. ३९,६१७, व १, २७, ८८७ आणि २०, ७, ४, ६३ आहे. यावरून गहूं जाण्याचें प्रमाण वाढतें आहे असें जरी होतें तरी तिकडून येणाऱ्या पदार्थांच्या प्रमाणा इतकें तें वाढलें नाहीं असें होतें.

पंजाब प्रांत हा इतर इलाख्याच्या मानानें लहानसाच आहे तरी त्या प्रांतांत १८८६ साली स्टांपाचें उत्पन्न ३४, ९४,३९, रुपये झाले असें समजतें.

ब्रम्हदेश इंग्लिश राष्ट्राच्या हातीं येण्यापूर्वी कशा रीतीचा होता हे एका गृहस्थानें प्रसिद्ध केलें आहे तो म्हणतो की, ब्रम्हदेशा सारखी दुसऱ्या कोणत्याही देशांत वांटलेली संपति नाहीं, ब्रम्हदेशासारखी शेतकीचा भरभराट इतर कोणत्याही देशांत नाहीं, ब्रम्हदेशातील घरें फार उतमरीतीनें बांधलेलीं असून तेथील लोक सुखवस्तु, सदढ व चैनी असे आहेत शेतकीची तयारी करण्याकरितां .त्या लोकांस वर्षातून सुमारें ५ महिने तयारी करावी लागते. ज्या लोंकांचा भीक मागण्याचा धंदा असे लोक तेथें आढळत नाहीत. अशीच किंवा याहून चांगली स्थिति हा देश इंग्रजांच्या स्वाधीन होण्यापूर्वी होती, परंतु आमच्या कमनशिबानें म्हणा, किंवा "दुसऱ्या" कांहीं कारणामुळ म्हणा आमची स्थिति ब्रम्हदेशाच्या पासंगासही पुरावयाची नाहीं. आमची इश्वराशीं एवढीच प्रार्थना आहे कीं, आमच्याच प्रमाणें आमच्या ब्रम्हदेशांतील बंधूस अशी वाईट स्तिति न येवो म्हणजे झालें.

दसरा व डोले यांच्या संबंधानें आग्रमीरास मुसलमान व हिंदु यांच्यामध्यें फार मोठा दंगा झाला व त्यांत दोन दोन मुसलमान ठार होऊन आठ घायाळ झाले आहेत या तंट्याची हकीकत अशी आहे कीं तेथील मुसलमानानी आपल्या ताज्याच्यापुढें कापडाचा मांडव घालण्याचा तेथील सिटी माजि. मि. मथुराप्रसाद यांच्या पासून सालाबाद प्रमाणें परवानगी घेतली पण ता. २५ रोजी हिंदूचा अष्टमी पूजनाचा एक मोटा मेळा तासे वाजवीत त्या रस्त्यानें जाऊं लागला व त्याच्याबरोबर ते सिटी माजि. व दुसरे कामदार हो होते. त्यांणी आपल्या रिती प्रमाणें ताज्यांच्यापुढें दारू फेकली. दारू ही आमच्या धर्माविरुद्ध आहे अशी मुसलमानी तक्रार केली तरी माजि. व दुसरें कामदार याणीं मुसलमानांस धमकाऊन या मेळ्यास जाऊं द्या असें सांगून निकाल केला. यावरून मुसुलमानाची मनें बिघडून त्यांणी लागलीच ताबुताच्या संबंधानें करावयाचीं कृत्यें बंद केलीं आणि याचा सूड उगवून घेण्याकरतां तयार झाले. ता. २६ रोजीं दसऱ्याची स्वारी चालली असतां त्या स्वारीवर मुसुलमानांनी हल्ला केला आणि पालखींतून जात असलेल्या मूर्तीस खालीं पाडलें आणि त्या तंट्यांत पुष्कळ हिंदूही जखमी झाले. मार्केट वगैरे बंद असून लोकची मनें अजून शांत झालीं नाहीत. आणखीं एखादा सामना होईल अशी भीती आहे.

हिंदुस्थान व इंग्लंड या दोन्ही देशांतील कमि सरियत खात्यांची चांगली व्यवस्था नाहीं अशी कित्येकांची ओरड आहे.

लंडन शहरांत तापाची साथ आली आहे असें म्हणतात

मेरिकेच्या हद्दीत गुलामांचा व्यापार अद्याप चालू आहे असें सांगतात. ठा. अ.

---

हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाचा आगाऊ रु० ५ डाकहशील ०।२
साहामाही " ३ " ०८
साल अखेर " ७ " १०।८
किरकोळ अंकास ....................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस.........०१

Per annum in advance 5 Postages 13 as.
Per annum in arrears 7 " 1R. 8 as.
Six monthly ........... 3 " 8 as.
Single copy .............................. 4 as.

Advertisements.
Below 10 lines... 2s
Per line over 10...4a
Repetition per line 3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL. XXI. AKOLA MONDAY 24 OCTOBER 1887. NO. 41

वर्ष २१ अकोला सोमवार तारीख २४ माहे अक्टोबर सन १८८७ इ० अंक ४१


वऱ्हाडसमाचार.

मिती कार्तिक शुद्ध ८ शके १८०९

## शाबास मच्छ देशीय बंधूनों!

आजपर्यंत सुधारणेच्या प्रत्येक कामांत बंगाल इलाख्याचा नंबर पहिला, त्याच्या मागें मुंबई व सर्वांच्या खालीं मद्रास असा आमचा समज असे; परंतु आलीकडे ४-५ वर्षांत आमच्या मच्छ देशीय बंधूनीं या कामीं जी उचल दाखविली आहे त्यावरून आमचा हा समज खोटा ठरून मद्रास इलाख्याला पहिलें पद दिल्या वांचून आमच्यानें राहवत नाहीं. जों पर्यंत ग्रांटडफ साहेब तिकडे इलाखाधीपति होते तों पर्यंत आमच्या बंधूच्या सर्व शक्ति स्तब्ध झाल्या सारख्या होत्या परंतु हल्लींचे गव्हरनर साहेब लार्ड बूर्क हे आल्या पासून या शक्तींना प्रोत्साहन मिळाल्या कारणानें आमचे तिकडील बंधु हल्लीं आपल्या देश बांधवांच्या उन्नती करितां जीवा भावानें परिश्रम करित आहेत. देशांतील लोकांची बरी वाईट स्थिती पुष्कळ अंशीं त्या देशावर अम्मल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कशी अवलंबून असते ह्याचें उत्कृष्ठ उदाहरण मद्रास इलाखा आहे हल्लीं जे गृहस्थ तिकडे या कामी पुढारी म्हणून गाजत आहेत तेच गृहस्थ पूर्वीच्या गव्हरनर साहेबांच्या कारकीर्दींत होते, परंतु त्यावेळीं त्यांच्या उद्योगाला साहेब बाहादुरां कडून अनेक प्रकारचे अडथळे अल्याकारणानें त्यांना स्वस्थ बसावें लागले होते. लार्ड बूर्क साहेबांचें आगमन झाल्या पासून राजकीय व सामाजिक सुधारणेच्या एक एक गोष्टी झपाट्यानें बाहेर निघून लोकांचें त्यापासून कल्याण होत आहे. आमच्या इकडे औद्योगिक शिक्षण, व्हालंटीयर कोअर, इत्यादि अतिमहत्वाच्या गोष्टी करितां लोक कित्येक दिवस एक सारखे हाका मारीत आहेत. सार्वजनीक मंडळ्या व वर्तमानपत्रें यांतून या विषयाची एक सारखी चर्चा चालली आहे पण म्हणण्या सारखें अद्याप कांहीच निष्पन्न झालें नाहीं. पण आमच्या मच्छ देशीय बंधुना यागोष्टींत बरेंच यश आलें आहे. तिकडे उद्योग शाळा स्थापन झाल्या आहेत व त्यांत कृषिकर्म, यंत्र शास्त्र, शिल्प शास्त्र वगैरे महत्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांना शिक्षण मिळत आहे. सरटी माधवराव यांचीं व्हालंटीयर कोअरमध्यें एका मोठ्या अधिकारावर नेमणूक झाली आहे. याच प्रमाणें सामाजिक गोष्टी मध्यें हो आमचे तिकडील बंधु आमच्या पुष्कळ पुढें गेले आहेत. जेथें दिवाण बाहाद्दुर रघुनाथरावा सारखे सुधारक व सरटी माधवरावा सारखे देश हितेच्छु विचारक लोकांचे अध्वर्यु होऊन आपलें तनमन धन देश शेवेला अर्पण करण्यास सारखे आहेत तेथें अशा गोष्टी कां बरे होणार नाहीत ? असो.

आज हाविषय पुढें येण्यास कारण आमच्या मद्रास इलाख्यातील बंधूंनीं सभेकरितां जी कडेकोट तयारी चालविली आहे ती होय. या संबंधांची तिकडील पत्रांतून जी माहिती मिळत आहे ती पहातां आमच्या तिकडील बंधूचीं स्तुति करावी तेवढी थोडीच आहे. ही सभा स्थापन होऊन हें तिसरें वर्ष आहे. गुदस्त सालीं आमच्या वंग देशीय बंधूंनीं या सभेकरितां बरीच खटपट केली होती व मुंबईस भरलेल्या पहिल्या सभे पेक्षां त्या सभेचा थाट पुष्कळ चांगला उतरला परंतु यंदा मद्रासेंत भरणाऱ्या सभे करितां तिकडील आमचे बंधु येव्हां पासून जी तयारी करित आहेत ती वरून गुदस्त सालाच्या थाटावरही यंदा कडी होणार आहे. राष्ट्रीय सभा म्हणजे काय तिचे उद्देश अशा सभा असल्या पासून राष्ट्राला फायदे काय होतात त्या संबंधानें आपलें कर्तव्यकर्म काय इत्यादि गोष्टी लहाना पासून थोरा पर्यंत सर्व लोकांना कळाव्या या साठीं या माहितीचें एक पुस्तक अगोदरच तिकडे देशभाषेंत प्रसिद्ध झालें आहे. साधारण किंवा अशिक्षित लोकांना या गोष्टींची माहिती करून देण्याचा हा प्रयत्न किती स्तुत्य व हितावह आहे हें सांगणें नकोच. या प्रमाणें सर्व लोकांना ही मामाहिती करून दिल्यावर सभेच्या कामाला पैशाची मदत व्हावी याकरितां तिकडील मोठ मोठाले लोक मोठ मोठाल्या रकमा वर्गणी दाखल देत आहेत. प्रसिद्ध सरटी माधवराव यांनीं २५००० रुपये दिले व दुसरे एक मुसलमान गृहस्थ मिर कमायुन यांनीं ५००० रुपये दिले म्हणून समजतें. याच प्रमाणें दुसऱ्या पुष्कळ लोकांचे मोठाले आकडे पडले आहेत.

यंदा विषेश आनंद मानण्या सारखी दुसरीं गोष्ट ही आहे कीं तिकडील मुसलमान हिंदु वगैरे सर्व जातीचे लोक या कामा करितां सारखे झटत आहेत. गुदस्त सालीं बंगाल्यांतील कांहीं मुसलमानांनीं या कामीं जो क्षुद्रपणा दाखविला त्यावरून इंग्लंशमन पायोनियर वगैरे अंग्लो इंडियन वर्तमानपत्रें या सभे विषयीं भलत्या भलत्या गोष्टी सांगून कुत्सित पणानें तिला " हिंदूकांग्रेस " वगैरे नांवें देत होते. यंदाचि मद्रास कडील लोकांचें वर्तन पाहून या पत्रांनीं अतां मानाच खालीं घातल्या पाहिजेत. ही सभा खरोखर हिंदु लोकांचीच आहे किंवा हिंदुस्थानातील सर्व जातीच्या लोकांची सर्व साधारण आहे या विषयी त्यांची यंदा खात्रीच होईल. आमच्या देशांतील इतर ठिकाणच्या आमच्या मुसलमान बंधूंना आमची आतां हीच विनंती आहे कीं त्यांनीं मद्रासेकडील त्यांच्याच जाति बंधूनीं घालून दिलेल्या उदाहरणाचें अनुकरण करावें, व ज्या देशांत हल्लीं ते राहत आहेत त्याची उन्नति होण्याकरीतां आपल्या इतर बंधु प्रमाणें त्यांनीं मनापासून प्रयत्न करावा यांत सर्वां बरोबर त्यांचेही कल्याण होणार आहे.

## स्त्री शिक्षण.

( लिहून आलेला मजकूर. )

मागील अंकावरून पुढें चालू.

आपल्या स्त्रियांच्या सांप्रतच्या स्थितींत सुधारणा करण्या जोग्या पुष्कळ गोष्टी आहेत ही गोष्ट कोणीही विचारी मनुष्य कबूल करील. काव्येतिहासादि पुरातन काळचे ग्रंथ पाहिले असतां ही स्थिती अर्वाच असेल असें वाटत नाहीं. त्या वेळीं आपल्या स्त्रियांना हल्लींच्या सुधारलेल्या देशा प्रमाणें पुरुषां बरोबर सर्व गोष्टींत मान मिळत असे. विद्या शास्त्रें, कला या सर्व गोष्टिस त्यांना अवगत असत. गार्गी आत्रेयी यांनीं तर याज्ञवल्क्या सारख्यांशो वेदांतासारख्या गहन विषयांवर प्रश्नोत्तरानें वादविवाद केलेले आढळून येतें. हें सर्व मन्वंतर आपल्या देशांतलि इतर गोष्टीं प्रमाणें सध्यां फिरलें आहे. अतीत गत गोष्टिंचा शोक करणें चांगलें नाहीं तथापि जोंपर्यंत आपले गत वैभव प्रयत्न साध्य आहे तों पर्यंत तें पुनः मिळविण्या विषयीं आपण प्रयत्न केला पाहिजे.

व्यवहार दृष्टया पुरुष व स्त्रिया यांची योग्यता संसारात सारखी आहे. पुरुष एकटा संसारांतील सर्व गोष्टी करुं म्हटलें तर ते असाध्य आहे. फार कशाला पुरुषाच्या येहिक सुखाच्या जेवढ्या म्हणून गोष्टी आहेत त्या सर्व स्त्रियांच्या बऱ्या वाईट स्थितीवर अवलंबून आहेत परमेश्वरानें स्त्रीजाति उत्पन्न केली तिफक्त कित्येक अप्रबुद्ध पुरुष मानित असतात त्या प्रमाणें पुरुषाच्या इंद्रिय सुखाच्या तृप्ती करितांच केली नाहीं. स्त्री जातीची रचना पुरुषजातीची जी त्यानें निरानराळी केली आहे तिवरून पहातां संसारसंबंधाचीं घराबाहेरील सर्व कामें पुरुषानें करावीत व घरांतलि सर्व कामें स्त्रियांनीं करावीत असा त्याचा संकेत दिसतो. शिवाय गृहणी, कुटुंब इत्यादि नांवें जी स्त्री जातीला दिलीं आहेत त्यांवरून व्यवहार दृष्टया देखलि हा संकेत खरा आहे असें सिद्ध होतें. हल्लीं स्त्रियांशी आपला जो साधारण वर्तन क्रम आहे त्याच्या योगानें सर्व कामें आपल्यालाच पहावीं लागतात. बाहेरून पैसे मिळवून आणावे आपणच; त्यांची व्यवस्था पहावी आपणच; मुलांबाळांची व्यवस्था. ठेवावी आपणच; नाहीं म्हणतां एक स्वयंपाकांचें व त्याच्याच सारखीं कांहीं बारीक सारिक कामें मात्र आपल्याला पहावीं लागत नाहींत. मी म्हणतों असें कां असावें? सर्व गोष्टींचा बोजा पुरुषानेंच आपल्या शिरावर कां घ्यावा? स्त्री अर्धांगी, पुरुषांच्या सर्व कामांत वांटे करी असे जर शास्त्रें सांगत आहेत तर गृहसंबंधीं कामांत त्यांना वांटे करी कां करूनये; कादंबऱ्या, नाटकें, पुराणें यांत संसाराची जीं कल्पनीक परंतु स्पृहणीय चित्रें उतरलेलीं असतात त्यांचा अनुभव आपण यथाशक्ति कां घेऊं नये ?

वरील प्रश्न प्रत्येक गृहस्थ आपआपल्या मनांत करीत असेल; परंतु आमच्या लोकांत पुरातन चालीला मान देण्याचें जें वेड मानून गेलेलें आहे त्यामुळें प्रसंग विशेषीं स्त्रियांच्या आंगीं आपल्या सुखदुःखाच्या वाटेकरणी होण्याची योग्यता आणण्याचें त्यांच्या मनांत आलें तरी ते आतल्या आतच जिरून जातें. आजपर्यंत हाविचार पुष्कळांच्या मनांत आला असेल परंतु लोक रीतीकडे पाहून व जनापवादाला भिऊन त्यांना स्वस्थ बसावें लागलें आहे. अलीकडे मात्र १०-५, वर्षांत याविषयाकडे लोकांचें लक्ष्य जाऊं लागलें आहे. पश्चिमात्य विद्येचा लाभ पुरुष जातीनां यथेच्छ मिळूं लागल्या कारणानें व ज्ञान प्राप्ति करून घेण्याची व त्या ज्ञानाचा उपभोग आपल्या हिता करितां करण्याची गोष्ट आमच्या लोकांना अलीकडे लागत चालल्या कारणानें आपल्या सामाजिक स्थितीतील व्यंग्यें त्यांच्या नजेर पुढें ठळक ठळक दिसूं लागत आहेत. इतर गोष्टी बरोबर आपल्या स्त्रियांची शोचनीय स्थिती ही त्यांच्या लक्ष्यांत येऊन चुकली आहे व ती सुधारण्या करितां कांहीं तरी प्रयत्न केले पाहिजेत असें त्यांस आतां वाटूं लागलें आहे. नेत्रा वरील अज्ञान पटल दूर झाल्या कारणानें स्त्री शिक्षणा संबंधानें ज्या वेडगळ समजुती आमच्या लोकांत होत्या त्या आतां नाहींशा होत आहेत. जागो जाग मुलींच्या शाळा स्थापन होऊन निरनिराळ्या इलाख्यांतील डायरेक्टरस ऑफ पब्लीक इन्स्ट्रक्शन यांच्या वार्षिक रीपोर्टांवरून शिकणाऱ्या मुलींची संख्या प्रति वर्षी वाढत चालला आहे असें दिसून येत आहे. अलीकडे रूपगूण वय इत्यादींका बरोबर नवऱ्या मुलीला लिहितां वाचतां येणें ही एक शिफारशीचीच गोष्ट झाल्या कारणानें मुलींचे आईबाप ही आपल्या मुलींना हौसेनें शाळेंत पाठऊं लागले आहेत. सारांश स्त्रीशिक्षणा कडे आमच्या लोकांचें लक्ष्य आतां बरेंच जाऊं लागलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु देशांतलि एकंदर स्त्रियांच्या संख्येशीं लिहितां वाचतां येतें आहे अशी स्त्रियांच्या संख्येची तुलन

केली असतां हल्लीं ख्रिशीक्षणाचा गाडा फारच सावकाशीनें चालत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याच प्रमाणें आपल्या मुलींना हल्लीं ज्या रीतीचें शीक्षण माळतें आहे त्या रीतीचा विचार केला असतां ही या शीक्षणा पासून स्त्री शीक्षणाचा खरा उद्देश सिद्धीस जाईल कींवा नाहीं याचा संशयच वाटत आहे. या करीतां हल्लीं स्त्रियांना शाळां मधून कोणत्यातऱ्हेचें शीक्षण मीळत आहे व वास्तवीक त्यांना कोणत्या प्रकारचें शीक्षण मिळालें पाहीजे आह याचा आपण विचार करूं.

( पुढें चालूं. )

मुंबईच्या प्रसिडेन्सी असोशिएशननें यंदाच्या राष्टीय सभेंत विचार करण्या करितां खाली लिहिलेले मुद्दे पाठविले आहेत असें कळतें (१) या देशांतील कायदे काउन्सिलांत प्रजेच्या समतीनें नेमले जाणाऱ्या सभासदांच्या संबंधांची मागणी; (२) लष्करी भात्यांचा खच कमी करण्या विषयीं सुचना; (३) विद्या खात्याचा खर्च कमी करण्याकडे आमच्या सरकारचें लक्ष अगोदर जातें या करीतां तो खर्च कमी न करण्या बद्दल विनंती; (४) अबकारीच्या सक्त ठरावां मुळें लोकांचें हीत असलेलें नुकसान या बद्दल विचार; (५) चालुं असलेलें कोर्टफीचे नियम सुगम रितीनें मिळेल अशी व्यवस्था; (६) हिंदुस्थानचें बजेट पार्लमेंट सभेंत अगदीं अखेरीस वाचलें जात असतें तें जून किंवा जुलई महिन्यांत वाचलें जावें अशीपार्लमेंटास विनंती.

हे सर्व मुद्दे खरोखर विचार करण्या सारखे आहेत. यापैकीं बहुतेक मुद्यासंबंधानें चर्चा काटकसरीचें कमिशन नेमलें गेलें त्यावेळीं वर्तमान पत्रांतून वगैरे बरीच चर्चा झाली आहे शेवटल्या मुद्याचा प्रत्यक्ष दाखला यंदाचें बजेट पार्लमेंटांत वांचणें झालें त्याची जी हकिगत आली तिवरून सर्वांच्या ध्यानांत येईल. पार्लमेंटचे दोन्ही पक्षाचे लोक मिळून येकंदर संख्या ७०० आहे परंतु बजेटावाचणीच्या वेळेस हजर कायते २९; व यांत शेवट पर्यंत टीकले किती तर अवघे १६!! बजेटावर टिका करणारे निघाले कायते दोनच तेव्हां येकंदर सर्व थट्टाच कीं नाहीं ही. आमची राष्ट्रीय सभा या गोष्टीचा यंदा विचार करीलच.

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER 24 1887

The Times of India takes to task the Ripon Memorial Fund Committee for not doing anything with the Fund in their hands. The scheme of technical education, it says, appears to have fallen flat. We don't know what grounds the paper has for saying that the scheme is not likely to be successful except perhaps the delay that has taken place in the starting of the institution. The undertaking is one which requires a great amount of money and unless the funds of the Committee are sufficiently full they cannot begin the technical school. What we think is that over all others the necessity Civil technical education is very pressing and we would certainly not desire the Ripon Memorial Fund to be spent in the way suggested by the Times of India. And Museum is good in its own way, we admit, but it cannot take a higher place than that of technical education. We would suggest to the Committee that if they cannot start an institution on a scale as grand as they desire they should cut their coat according to their cloth and should think of a humbler scheme. But the money should go in the direction of teaching the younger generation some art or profession. It is in this way that the name of Lord Ripon ought to be commemorated. It requires no argument to show that educated people and uneducated are lying idle and unless some sphere has beend formed for their energies, they wouln have to remain starved. The attentioe of the people has been directed tc th. matter but there are not institutions within easy reach of the people. When the attraction once begins to rule we are sure we would see the schools crowded to the full. The religious ebjections and the influence of custom are sinking down but they must sink down more rapidly; and if schools are established suited to the present condition of the people, they would not fail to rule them. There must be some outlet or other in which the zeal and energy of educated youth could run. They cannot remain idle and if proper means are placed within their reach they would take to them with pleasure We, therefore strongly suggest to the Ripon Committee to spend the money in some manner that would meet the present circumstances of the people and lead to their industrial advancement and development.

We give below an extract from this letter of the correspondent at Teheran of the Times of India. It is a short interesting story and is not at present devoid of interest —

Untill recently Ayub Khan and all his followers, to the number of about 200, were confined to the town of Teheran, where they were under the surveillance of the police and a nominal guard of Serbaz (infantry), Ayub Khan and his chief men being allowed to take exercise outside the walls whenever so inclined. Early in the summer' and on pretence of ill-health, the Russian Legation is understood to have obtained permission for Ayub Khan and a few of his principal followers to move out to a village about' nine miles from town, on the slopes of the Elburz, and near the summer quarters of the European Residents and Legations. I need hardly say that our Legation disapproved of this move, as did, I believe, the Shah himself, but Russian influence & the personal guarantee of the Minister for Foreign Affairs for the safe custody of the Afghans carried the day against the (as the result has shown) well-grounded fears of his Majesty and of Mr. Nicolson, our able Charged' Affaires.

All seemed to go well up to the 17th August, when it became known that four days before, TajMahommed and Mir-Bacha (two of Ayub's chiefs) and some thirteen others had fled towards Herat, cutting the Teheran-Mesoed telegraph line daily as they advanced. Mr. Nicholson at once made strong representations to the Persian Government, when he was assured that every means would be taken to intercept the fugitives that they had gone without Ayub's knowledge or permission, that Ayub himself was in safe keeping, being, in fact, ill and confined to his private room for some days, in proof of which were adduced sundry letters and messages from him, Mr. Nicholson did not, however. relax his enquiries, and he soon discovered that Ayub Khan was himself amongst the fugitives, that he got away about the 14th instant, that the letters and messages were prepared beforehand and sent out daily as blinds, and that, in fact, the whole affair so scarcely planned that only two of those who remained behind were privy to it.

## THE PARSEE HIGH PRIEST OF THE DECCAN.

Sirdar Khan Bahadur Doctor Dustoor Hosung Jamasjee, the High Priest of the Deccan and Malwa. &,and Dustoor Bymanjee Jamasjee, C. I. E., who has come to Akola for the approaching Races and cattle Exibition, were warmly received by the whole Parsee community and the leading native bankers of Akola. They are the guests ot Mr. B. D. Banajee.

This evening will be a grand party at the Bungalow of Mr.B. D. Banajee inhonor of the High Priest of the Parsees of the Deccan, Malwa and Berar. To this party, we understand' are invited all the nobility and gentry of akola and also the Commissioner of the Province and other high officials of Berar and Nagpur who have assembled here for the approaching races and exhibition. Preparation for the party are going on on a very grand scale.

The Nizam's Dominions.— Last week a meeting of his Highnesses officials was held at the residence ef the Revenue Muin-ul-Maham—the Chota Sahib—to consider a proposition of Nawab Intisar Jung the Subhadar of the Eastern Division, to introduce the Zemindar system into Telingana, as the best and most speedy way of repopulating thet once fertile region of his Highness,s territories. The meeting, we learn, came to no decision. We trust, for the sake of the present and future generation. no decision except a cecided negative will ever be accorded to a proposition of this kind. The experience gained in Bengal ought to be a sufficient deterrent to even the introduction of the proposal.—Deccan Times.

## NOTICE

### LADY DUFFERIAN'S FUND BERAR BRANCH AMRAOTI

Dated the 20th October 1887

Members of the Berar Branch Committee, Countess of Dufferin's Fund, are hereby informed, under authority of the Resident, that the next Annual Meeting of the Berar Provincial Committee will be held at Akola on Tuesday the 25th instant at 8. A. M. at the Circuit House. Members are particularly requested to attend this the most important Meeting of the year, and Akola, it may be explained, has been fixed as the best locality on account of the forth coming gathering there.

President

Leslie. S. Saunders Esqr B. C. S. Commissioner H. A. D.
1Col. R. Bullock Dy. Commissioner Amraoti.
1 Col,F. W. Grant——Do. ———Akola
1MajorJ Morris ———Do— Ellichpur
1H. B. Knowlys Esqr Dy. Commissioner Bassim
1H. S. Nicholetts Esqr. Dy- Do. Buldana
1Surgeon Majir C Little M.D. Sanitary Commissioner H. A. D.
1Col. C. T. Lane Inspector General of Police H. A. D. (Honorary auditor )
1Surgeon J. Hume M. D. Civil Surgeon Amraoti.
1Shriram Bhikaji Jatar B. A. Director of Public Instruction H. A. D. Akola.
1Fred D. Straunch Esqr. (Honorary Treasure) Agent Bank of Bombay at Amraoti.
1G.S. Khaparde Esqr B. A. L.L.B (Honorary Auditor)
Extra A. Commissioner Budnera
131 1R. N. Mudholkar Esqr.B. A, L.L.B. Life Member Pleader Berar Amraoti
1 Deorao Vinayak Esqr Life Member, Pleader Berar Akola
1 Ramrao Govind Esqr Retired E. A. C. Amraoti
1 Shett Babhootmal Banker Amraoti
1 Shaik Abdul Gani' Banker Kholapur
1 Mir Kasim Sahib Jahagirdar of Takli
I Rasool Khan Sahib, Banker, Talegaum Dashasar
1 Tukaram Padmaji Deshmukh Jarood
I Madhuorao Laxman, Vakil, Morsif
1 Shet Deokaram Manikchand Banker of Savergeon in Jalgaon Talook
Akola District

Subjects for disposal

1 To pass the audit Balance Sheet struck up to 16th October 1887 by the Committee's Houorary Auditors, as per annexure A

11 To confirm the necessity of subscriptions towards the National Association being continued in Berar "ad infinium." The Auditors Audit Sheet shows the following aggregates for each District

| Name of District | On a account of Lady Dufferin Fund | | | On account of Judilee Cards | | | Total. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Rs | As | Ps | Rs | As | Ps | Rs. As. Ps |
| 1 Akola | 14366 | 2 | 3 | 1278 | | | 15644-2-3 |
| 2 Amraoti | 7788 | 4 | | 810 | 6 | | 8598-8-9 |
| 3 Bassim | 1891 | | 9 | 1010 | | | 2901-0-9 |
| 4 Buldana | 4419 | 4 | | 188 | 12 | | 4508-0-0 |
| 5 Ellichpur | 8643 | 8 | | 962 | 4 | | 9605-12-0 |
| 5 Wun | 4687 | 7 | 3 | 103 | 1 | | 4790-8-3 |
| Total receipts up to 16 10 87 | 41795 | 10 | 3 | 4353 | 5 | | 46147-5-3 |

111 To consider that as to maintain, through years to come the establishments and institutions necessary to giving even appreciable silent effect to Her Excellency the Countess scheme, the present funds are clearly inadequate, at this General Meeting it be discussed and decided in clear terms the amount of aid District officers will afford annually through their authority as regards their Local Funds, and by their influence and advice as regards Municipal Boards (this item of business is Vide 9 copies of Mr. Home Secretary Mac Donnells letter addressed to all Local Governments and administrations fordwarded to this Committee by Majir Harry Cooper A. D. L. the Honorary Secretary to the Central Committee at Simla

and to a Copy of the said letter supplied by the Commissioner H. A. D. as received through the Resident at Hydrabad)

IV To consider the Presidents Minute Dated the 26 th September 1887 concerning the great usefulness to the pub lic, which would accrue from the erection of suitable female wards at a cost approx- mating Rs. 10000 each at Amraoti and at Akola.

V To decide about the advisability of obtaining the assent of Public works officers to serve on the Provincial nd District Committees of the National Association in Berar.

VI To note the Honorary Secretary's concurrence in the proposal to ledge all uninvested funds in the Post office Saving's Bank at Amraoti aud to thank him for the favour promised by him of effecting the necessary deposit.

V11 To discuss the advisability of making a lump sum grant of Rs. 4000 to wards permanently scurin accomodation for two students at theCama Hospital at Bomb a y (vde Mr Phipsms letter Dated tho 14th current.)

V111 To decide as to the remittance of this Committees due of 2 p. c, equal Rs. 400 to the central committee at Simla.

1X To decide as to the advisability or otherwise of soliciting Agra Medical Sceool authorities to favour this Commi ttee by endeavouring to obtain a suitable candidate in their vicinity, who will accept he Scholarship founded there by the Cen tral Committee subject to the condition of her services being at the disposal of this Committee on completion of her education.

(Note This expedient has been ren dered necessity by Local and District fail ure, up to the present, to procure an ele gible Beraree)

X To enlarge the scope of the operations of the special sub committee the appointed to procure and pass candidates, by an ex tension of time, i. e. until the next meeting of this Committee.

X1 To decide the points raised by the Lady Superintendent of the Poona Female Training College concerning the Students negotiated for between that Lady Superintendent Mrs. Davis, and Dire ctor of Public Instructson Berar. The points raised are briefly as under.

[A] To increase the salaries offered both while under tuition and afterwards.

(B) To increase the term of ser- vice after completion of Education. — (Vide letter No. 62 Dated 29 -9-87 from Mrs, L. Davis the Lady Superintendent of the Female Training College at Poona.)

X11 To vote a Bonus of Rs. 100 to those who did the clerical work con- nected with the Countess of Dufferin's Fund, Berar Branch during the past two years approximately without re- compense.

X111 To decide on aud lay down the lines on which this committees Annual Report shortly to become due to the Central Committee is to be drawn up, with especial reference to what nece- ssary annexures should receive submiss- ion with it.

X1V To decide on the Local authority at Amraoti to whom the re- port when prepared shall be submitted to be passed.

Purushottamrao.

Honorary Secretary. (20...10 87)

---

## वऱ्हाड.

हवामानः—- हवेंत अद्याप किंचित उष्ण ता आहेच. हिवतापाचा आजार चहुंकडे आ- हे. हवेचा उपद्रव ही तुरळक आहे.

येथें गेले आठवड्यांत फटाके करण्याचें काम चाललें असतां दारूनें पेट घेतल्या मुळें ६ माणसें बरीच भाजलीं गेलीं. त्यांतून एक मेला. बाकीचे अद्याप अजारी आहेत.

आजपासून जनावरांचे प्रदर्शनास आरंभ होईल. ह्या प्रदर्शना करितां वऱ्हाडांतील बहु- तेक थोर कामगार व मुंबई इलाख्यांतून व नागपूर प्रांतांतूनही बरेच युरोपियन व नेटिव लोक येणार आहेत.

मि० सी० एच० प्राईस ए० अ० क० यांस ७० दिवसांची हक्काची रजा मिळाली.

यंदाचे वकिलीचे परीक्षेंत लोअर स्टंडर्ड मध्यें रा. रा. महादेव गंगाधर दामले, गोवि द विश्वनाथ देशपांडे, व वासुदेव नारायण जोग हे तीन उमेदवार पास झाले.

पंडित सुरज नारायण असिस्टंट कमिश- नर वाशिम यांस पहिल्या वर्गाचे माजिस्ट्रेट नेमलें.

अकोलें व उमरावती येथील स्पेशल अ- सिस्टंट कमिशनर यांची कोर्टें ६ व्या ग्रेड- ची केली व अकोलें येथील कोर्टानें खामगांव तालुका खेरीज करून सारे अकोलें जिल्हा- तील व वाशिम जिल्ह्यातील वाशिम व मंग- रूळ तालुक्यातील पहिल्या, दुसऱ्या, तिस- ऱ्या व चवथ्या ग्रेडच्या कोर्टांनी केलेल्या अवल ठरावावर अपिलें घेऊन त्याचा निकाल करावा; तशीच उमरावती येथील कोर्टानें उमरावती जिल्ह्यातील उमरावती, चांदुर, मोर्शी आणि मोर्तिजापूर तालुक्यांतील, इलि- चपूर जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील, व वणी जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यातील सद- हुं ग्रेडच्या कोर्टांनी केलेल्या अवल ठरावावर झालेले अपिलांचा निकाल करावा—-या प्रमा- णें शेवटी ह्या कोर्टांचे अधिकार गेले रेसिडे- न्सि आडरमध्यें प्रसिद्ध झाले आहेत.

सन १८८२ चा आक्ट १० कलम १२ प्रमाणें मि० आर आवर्ड बी. ए. सि. एस. स्पेशल असिस्टंट कमिशनर यांस खामगांव तालुका खेरीज करून सारे अकोले जिल्ह्याचे व वाशिम जिल्ह्यातील वाशिम व मंगरूळ तालुक्याचे पहिल्या वर्गांचे माजिस्ट्रेट नेमले.

रा० रा० पुरुषोत्तमराव ए० अ० क० व आफि० स्पे० अ० क० यास उमरावती जिल्ह्यांतील उमरावती, मोर्शी, आणि मोर्तिजापूर तालुक्याचे व इलिचपूर जिल्ह्यांतील दर्यापूर व वणी जिल्ह्यांतील व दारव्हा या तालुक्याचे पहिल्या वर्गांचे माजिस्ट्रेट नेमिलें.

ले० क० के०ज० एल०मेकंजी डे० क० इलिचपूर यांनीं आपली रजा २० नवेंबर १८८७ पर्यंत वाढविली.

मि० जे० क्रेग ए० इं० यांस १५ म- हिन्याची फर्लो रजा मिळाली. व ते युरोपात जाणार .

मि० जे० एच० ह्यांडले अ० इं. पश्चिम वऱ्हाड यांची पूर्व वऱ्हाडांत बदली झाली.

मि. एच. व्हाईट सुपिरिटेंडिंग इंजि. थर्ड क्लास हैद्राबाद यांस सेकंड क्लास नेमले.

सरदारखान बाहादूर डाक्टर दस्तूर हुसंग जामासजी डेकन, माळवा आणि वऱ्हा- डचे पारसी लोकांचे हाय प्रिस्ट आणि दस्तुर बहिमंजी जामासजी सी. आय. इ. वऱ्हाडां- तलि माजी अ० क० हे येथें घोड्याच्या शर्य- ती करिता व गुरांच्या प्रदर्शना करितां आलें आहेत. यांच्या सन्मानार्थ येथील सारी पार- शी मंडळी व पुढारी सावकार लोक स्टेशनावर गेले होते. हे थोर पाहुणे येथील आईलमिल कंपनीचे लोकप्रिय व वजनदार एजंट मि. बी. डी. बनाजी यांचे येथें उतरले आहेत.

येथें आलेले डेकन, माळवा आणि वऱ्हा- चे हायप्रिस्ट यांचे सन्मानार्थ आज संध्या काळीं मि. बी. डी. बनाजी आईलमिल कंप- नीचे एजेंट यांचे येथें मोठी पार्टी होणार आ- हे. या पार्टीला गांवांतील बडे व संभावीत व प्रांताचे कमिशनर व दुसरे मोठे मोठे व- ऱ्हाडातील अधिकारी यांस ही बोलाविलें आ- हे. पार्टी करितां फार मोठी तयारी चाललेी आहे.

निजाम सरकारचे राज्याच्या पूर्व भागाचे सुभेदार नबाब इतिजार जंग यांनीं तेलंगणांत अगदीं लवकर पुन्हा लोकवस्ती व्हावी या करितां तर्थें जमीनदारीची पद्धत सुरू करावी म्हणून सुचना केली तिचा विचार करण्या करितां रेव्हिन्यू मुइनूल महाम-छोटा साहेब याचे येथें निजाम सरकारच्या मोठ मोठा- ल्या कामदारांची सभा मागील आठवड्यांत भरली होती. सुचनेच्या संबंधानें आद्याप सभेंत कांहीं एक निकाल ठरला नाहीं. तथापि बंगा- ल प्रांतात ह्या जमीनदारी पद्धती संबंधानें जो अनुभव आला त्यावरून असें दिसतें कीं ही पद्धत निजामसरकार आपल्या प्रांतात सुरू करणार नाहींत.

---

मि. खाजा बदुद्दीन तहासिलदार जळगांव हे लवकरच पेनशन घेणार.

---

आकोल्यास ता.२४पासून गुरांचे प्रदर्शनास आरंभ होईल व ते तारीख १ नवंबर पर्यंत चालेल. व घोड्यांच्या युरोपियन लोकांच्या शर्यती तारीख २५ व २७ रोजी होतील किरकोळ शर्यती तारीख २८ रोजीं होतील. गुरांच्या प्रदर्शना करिता डायरेक्टर साहेबांचे आफिसामार्गें मोठी एक जागा तयार केली आहे- प्रत्येक जिल्ह्यातलि गुरां करितां निर- निराळी जागा केली आहे. शर्यती करितां नेह- मींप्रमाणें मलकापूर रस्त्यावर सुमारें दिडमैला- चा फेरा तयार केला आहे तेथें मंडळीस बसण्या करितां मांडव व घोड्यास बांधण्या करितां जागा तयार केली आहे.

---

हें प्रदर्शन व शर्यती या करितां येथें प्रां- तांतील सर्व अधिकारी व इतर लोक व त्या चप्रमाणें मुंबई इलाख्यातून व नागपूर प्रातातून ही बरेच लोक आले आहेत व येतील. प्रांता- तील बहुतेक सारे युरोपि- यन अधिकारी आले आहेत.

बाहेरून आलेलें युरोपियन लोकांचे सोयी- करितां सर्व प्रकारची चांगली तयारी केली आहे. येथील प्रत्येक आफिसराचे बंगल्याचे सभोवता दोनदोन तीनतीन तंबू दिलें आहेत. युरोपियन क्लब व त्याचे शेजारचा बंगला हे दोन्ही पाहुण्यांनीं अगदीं गजबजून गेले आहेत.

---

खाली लिहिलेले युरोपीयन येथें आले आहेत कीत्येक आपले कुटुंबातील माणसासह आले आहेत.

---

उमरावतीहून मि. सांडर्स, कर्नल स्प्या न्स्की, कर्नल बुलक, डाक्तर लिटल, मिसाकू- गोल, मि. कूप. खामगांवाहून. मि. क्लीकनट, मार्कॅटायर. येलिचपुराहून. क्यापटन मारिस, म. राइट, ले. वुइंटर, डा. जेम्स, मि. लि- हॅथर्प. बुलडाण्याहुन मि. निकोलेट्स, मि. काटग्रेव्ह, मि. अश, यॅवतमाळाहून कर्नल रेनिक, मि. होय, वाशिमाहून. मि. नोलिस, कमिटीहून. कर्नल ब्लेक, क्यापटन् सीव्हील, क्यापटन् ग्लिन, मि ल्क्युटन , मेजर वुइस्प- मस्, नागपुराहून, मि. लेसली, ले० माक् गिल, क्यापटन् शूट. औरंगाबादेहून जनरल बेल. भुसावळेहून. मि. ग्रेगरी, सागराहून मि. म्याकलिन.

---

अकोल्यास युरोपियन लोकांच्या मुलांक तां बरार्कीत शाळा फेथ मिशन कडून स्था- पन झाली आहे. हीस सरकारांतून ग्रांट दे- ण्याचे ठरलें आहे. शाळेंत सध्यां ८ मुलें आ हेत. व शिक्षकाचे जागीं दरमहा २० रुपया- वर मिसेस अर्स यांची योजना केली आहे.

---

मे. कर्नल मेकंजी हे आकोल्यास येऊन म. कर्नल ग्रांट हे उमरावतीस जाणार व मे. कर्नल बुलक हे एलिचपुरास जाणार अशी वदंता आहे.

---

उमरावतीचे स्पेशल असिस्टन्ट कमिशनर क्यापटन वारन् हेस्टिंग्ज हे एक महिना रजा वाढविणार असें कळतें.

---

कमिशनर आफिसचे नवीन सुपरिंटेन्डेन्ट मि. वेड यांनीं येऊन आपलें कामाचा चार्ज घेतला. व मि. जोन्स आपले हैद्राबादचे जा- गीं ता. १५ रोजीं जाऊन रुजूं झाले.

---

वऱ्हाड करितां रेव्हिन्यू म्यानुअल करण्या- चें काम रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे ए० अ. क. यांजकडे दिले आहे व ते लवकरच तयार होइल असें ह्मणतात.

---

ईलिचपुर येथील फारेस्ट आफिसचे हेड- क्लार्क रा. रा. रावजी रामचंद्र ह्याचे द्वितिय कुटुंब वय वर्षे १८ व तिची मातुश्री अशा ईलिचपुराहून दिपवाळी करितां मोरशीस जात होत्या. मार्गांत मान नदी लागते, ती गेल्या गुरुवारच्या पावसानें दुथडी भरून चाल- ली होती तींतून पार जात असतां ह्या दोघी मा- य लेकी वाहून गेल्या। दोन तीन दिवसांनीं रावजीच्या बायकोचें प्रेत माना येथें सांपड- लें, पण तिच्या मातोश्रीच्या प्रेताचा पत्ता नाहीं!

---

मि. रहिम तुल्ला यांस चांदूर येथें सें. ग्रे. नायब तहशिलदार नेमलें.

---

मेजर वारेन हेस्टिंग्स पूर्व वऱ्हाडचे जुडि. स्पेशल असि. हे आणखी जी आपली रजा वाढविणार त्या रजेंत रा. सा. पुरुषो- त्तमराव भट हेच त्यांचें काम पहाणार हें ऐ- कविण्यास संतोष वाटतो. रा सा. भट ह्याच्या कामाला सर्व रयत श्रीमंता पासून तो कंगाला पर्यंत अत्यंत संतुष्ट आहे हें पाहून आह्माला फार संतोष वाटतो.

---

## वर्तमानसार.

१ अंजीर शरीरांतील उष्णता निघून रक्तवृद्धि होण्यास—पिकलेला अंजिर रात्रीं सोलून खडीसाखरेच्या भुकींत ठेवावा व सकाळीं खावा. याप्रमाणें आठ पंधरा दिवस क्रम ठेवावा.

२ पुष्टतेस—सुक्या अंजिराचे तुकडे व बदामाचे गर ऊन्ह पाण्यांत भिजवून सालें काढून सुकविलेले, खडीसाखरेची पूड, वेलची दाण्यांची पूड, केशर, चारोळी, पिस्ते, बेदाणा, हे समभाग घेऊन गाईच्या तुपांत ८ दिवस भिजूं घालून मग नित्य सकाळीं तें मिश्रण २ तोळेपर्यंत घ्यावें आठ वर्षांवरील मुलांस व शक्तिक्षीपास चांगलें हित.वह करून धंडाई, धातुवृद्धि व रक्तवृद्धि करणारें हें उत्तम औषध आहे.

३ दम्यावर अंजिरांतून गोरख चिंचेचें दळ नित्य प्रातःकाळीं ६ मासे प्रमाणें समत सेवन करावें.

४ गळ्यांत व जिभेजवळ सूज आल्यास सुक्या अंजिराचा काढा करून त्याच्या गुळण्या कराव्या.

५ पोटीस—अंजीर चांगला भाजून अगर उकडून त्याचीं दोन शकलें करावीं व तीं ग. ळूं बंद इत्यादिकांवर बांधावीं

१ अननस अजीर्णावर—सुपक्क अननसाचे बारीक तुकडे करून त्यांवर मिरें व सैंधव यांची पुड घालून खावें-

२ जंतावर— अननस बराच खावा म्हणजे जंताचें पाणी होईल.

३ बहुमूत्ररोगावर—पक्क अननसाची साल व आंतील कठीण गाभा काढून टाकून बाकीच्या भागाचा रस काढावा. त्या रसांत अंबर, जायफळ, पिंपळी, पादेलोण याची पूड करून घालावी. अंबर कमी मानानें घालावा, हें शक्तीप्रयाणें द्यावें.

४ पोटांत केश गेल्यास—पक्क अननस खावा म्हणजे केशापासून होणारी पीडा दूर होते.

रंगूनची तार ब्रम्हदेशांतील बातमी सांगत्ये कीं, २०० दंगेखोरांस देहांत शासन करण्यांत आलें. विनांग्यन नांवाच्या ठिकाणावर जलमार्गानें व खुषकीनें फार तयारीचा असा एक हल्ला झाला आणि १०० घरें व फिन्ले कंपनीचीं तेलानें भरलेलीं १,७०,००० घेऊन जाणारी १३ गलबतें जाळून टाकलीं हा सर्व प्रकार भयप्रद व देशास नुकसानकारक असून अंगावर शहोर येण्यासारखा आहे यांत कांहीं शंका नाहीं, पण जे लोक आजपर्यंत स्वतंत्रपणानें कारभार करीत होते त्यांचा स्वतंत्रपणा अन्यायानें हिराऊन घ्यावयाचा आणि मग त्यांस दंगेखोर म्हणावयाचें व त्यांस फांशीं द्यावयाचें हें जगाच्या इन्साफाच्या दिवशीं कसें न्यायाचें ठरेल याची मोटी शंका वाटते- त्याचप्रमाणें त स्वतंत्र लोक आजपर्यंत आमल्या देशांतील खनिज तेल व इतर पदार्थ आणि जंगली लांकूड यांचा स्वतंत्रपणें व्यापार करून आपली संपत्ति वाढवीत असतां त्या फायद्याच्या अभिलाषानें तो व्यापार त्यांच्या हातून हिसकून घेऊन मग त्यांस लुटारू म्हणणें व त्याच्या अशा कृत्यानें आमचें नुकसान झालें अशी ओरड करणें हा प्रकार जगाचा इन्साफ करणाऱ्या ईश्वरास कसा पसंत पडेल याची शंकाच वाटत्ये.

सरदार वली महमदखान याचा मुलगा नूरमहमदखान हा बंगाल लोकांत दंगा करण्याकरतां गेला आहे असें सांगतात.

गिलझे व वजिरी या लोकांच्या लढाया सुरू असून त्यांत ३०० लोक मेले असें लाहोरची बातमी सांगते.

संगमनेरचे सब जज्ज रावसा. रामचंद्र दाजी नगरकर व अंमळनेरचे सब रावसा. विष्णु विनायक करंदीकर यांची नवीन नियमाप्रमाणें गुजराथी भाषेंत हायर स्टांडरची परीक्षा पास झाली व मेसर्स गोविंद नारायण केळकर आणि केशव गोविंद आंजर्लेकर यांची कानडींत परीक्षा पास झाली.

चालू सरकारी सालाच्या पाच महिन्यांत १,३३,००० मण मीठ विकण्यांत आलें व त्यांचें उत्पन्न सरकारास २,३७,६३,००० रुपये झालें.

ब्रह्मदेश खालसा करण्याकरतां जी रकम इस्टिमेट करून बजेटांत घालण्यांत आली होती त्यापेक्षां ती रकम २ कोटींनी जास्त वाढली आहे. ह्या ब्रह्मदेशाचें वार्षिक उत्पन्न सारें ४० लाख आहे. ह्या चाळीस लाखांचा चुराडा फक्त त्या देशांतील पोलिसाकडेच होता याशिवाय लष्करीलोक, अम्मलदार, सिव्हीलियन्स, ज्युडिशियल आफिसर अणि त्याचप्रमाणें दुसरे इतर कामगार यांचा खर्च निराळाच या शिवाय ब्रह्मदेशांत रेल्वे तयार करण्याचें काम चालूच आहे. तेव्हां या रेल्वे करतां रकम आणावी कोठून अर्थात हिंदुस्थानांतून ती रक्कम आणावयाची हें तर सिद्धच आहे पण हिंदुस्थानचें उत्पन्न हिंदुस्थानच्या बादशाही कारभारास पुरत नाहीं तेव्हां आतां करावें काय? हा पडला प्रश्न. त्यावरून स्टेटसेक्रेटरानीं ठरविलें कीं हिंदुस्थानांतील हल्लींचें रेल्वेचें काम बंद ठेऊन तो सर्व पैसा ब्रह्मदेशांत खर्च करावा.

केटा व व कंदाहार येथें पटकीचा वाखा सुरू झाला आहे.

गिलझे लोकांचें वर्चस्व न व्हावें ह्मणून अमीर टोकक प्रांतांत फार बंदोबस्त करीत आहे.

इंग्रजाशीं वाकून वागणारा धुलिपसिंग व त्याचा साथी जमालुद्दीन या दोघांनीं मिळून पारिस येथें एक जाहिरनामा छापून तयार केला आहे, व त्याच्या प्रती हिंदुस्थानांत प्रसिद्ध करण्याचा त्यांचा इरादा आहे. हिंदुस्थानांतील नेटीव लोकांनीं इंग्रजी राज्यास हाकलून देण्याकरतां उठावें अशा प्रकारचा त्यांत उल्लेख आहे असें पारिसची ता. ११ ची तार सांगते.

निझामानें जी वेळींच पैशाची मदत सरकारास केली त्याबद्दल हिंदुस्थान सरकारानें फार आभार मानले. ह्या देणगीबद्दल राणी सरकारासही फार आनंद झाला आहे.

नेपाळच्या हल्लींच्या कारभारी मंडळीविरुद्ध खटपटी करणारा आणि त्याकरतां फौजेंत फंद फितूर करणारा एक मनुष्य नुकताच इंग्रजी हद्दींत पकडला असून त्यांस आता देहांत शिक्षा होणार आहे असें सांगतात.

ब्रह्मदेश खालसा करण्याबद्दल लष्करास एक पदक देण्यांत येणार आहे.

सरकारच्या खजिन्यांत यासालीं १०७८९१००० रु. शिलक अहित.

ठा० अ०

अयुबखान गिझनी येथें असल्याबद्दल इनवालिडेरूसें या पत्रास कळल्याचें समजतें.

आक्टोबर ता. १० पर्यंत इंपिरियल इनस्टिटयूटकरितां ४०,००,००० रु. जमलें असें समजतें.

अबिसिनियापैकीं कांहीं भाग इटलीच्या मनांत घ्यावयाच्या आहे सबब तिकडे फौज पाठविण्याच्या तयारींत ते आहेत.

जपानांत एकंदर २००० वर्तमानपत्रें आहेत असें म्हणतात.

म्हैसूरच्या सरकाराला गेल्या वर्षी त्यांच्या सोन्याच्या खाणींपासून एकंदर ५१,००० रु० उत्पन्न झाले.

ब्रम्हदेशांत मू नदीच्या आसपासच्या प्रदेशांत रलवे करण्याकरितां तेथील चीफ कमिशनरांनीं शिफारस केल्याचें कळतें. प्रत्येक मैलास ६०,००० रु- खर्च येईल असा अदमास आहे.

डोवर येथें एक मनुष्य ६ फूट उंच असून त्यांचें वजन ७ मण आहे. त्याच्या कंबरेचा घेर ८० इंच आहे.

जमेकामध्यें नारळाच्या काथ्याचा उपयोग बुटांचा टांचा व जोडे तयार करण्याचे कामीं करितात. त्या जोड्यांतून आंत पाण्याचा ओलावा येत नाहीं व टिकण्याच्या बाबतींत कातड्याच्या जोड्याप्रमाणेंच ते मजबूत असतात.

बनारस येथें गंगेवरील पूल तयार झाला. तो बांधून तयार होण्यास सहा वर्षे लागलीं. त्यास साठ लक्ष रु० वर खर्च आला. त्याची लांबी ३,५२३ फूट आहे. तो पूल जाण्या येण्यास चालूं करण्याचा समारंभ येत्या डिसेंबरमध्यें वैसराय साहेब यांच्या हातानीं होणार असें समजतें.

आगकाड्यांची कल्पना शोधून काढणारा कायमरर नांवाचा जर्मन मनुष्य होता त्याणें सन १८३३ साली तुरूंगांत असतांनां ही कल्पना बरोबर बसविली. त्या मनुष्यास या कामापासून पैशाची किंवा किताब वगैरे अब्रूची प्राप्ति न होतां तो सन १८५८ त मरण पावला असें एका जर्मन पत्रावरून समजतें. मु.प.

पारिस येथें एक जादूगार आला आहे. खेळांत तो मनुष्यांचीं सजीव मुंडकीं दाखवितो. त्यांचेंच पुनः फुलांचे झुबके करतो व असेच अनेक चमत्कार करून दाखवितो.

म्हैसुर कडे अतिपर्जन्य वृष्टि झाल्यामुळें कित्येक मैल आगगाडीचा रस्ता वाहून गेला आहे.

कलकत्ता येथें भर पोलीस कोर्टांत एका साहेबानें तेथें आलेल्या एका तरुण अर्जदार बाईस, मी तुझें काम मुफत करतों असें सांगून तिला दुसऱ्यामजल्यावर नेऊन तिच्यावर बलात्कार केला.

मोठा मगर— फियूम बंदरावर एक मोटा मगर सांपडला आहे. त्याची लांबी १२ फूट आणि वजन ३२१२ पौंड होतें.

शास्त्रीय शोध— अमेरिकेंतील कांहीं घड्याळाच्या कंपन्या आपल्या स्प्रिंगला विद्युल्लतेनें पाणी देऊं लागल्या आहेत. या युक्तीनें काम जलदी व्हावयास लागलें आहे.

गुराखी कंपनी— अमेरिकेंत स्त्रियांनीं नवीन धंदा काढला आहे. तेथें एक स्त्रियांची मोठी कंपनी झाली असून तिचा धंदा गुरें चारणें हा आहे. त्याचा फंड ३०० डालर्सचा असून प्रत्येक शेराची किंमत ५०० डालर्स आहे. त्याज जवळ हल्लीं ६००० गुरें असून कुरण जमीन २ कोटी एकर आहे. कमाल आहे खरी ! !

आजवर कोणती ही परभाषा शिकून पास होणाऱ्या सिव्हिलियनांस सरकार १०० रुपये बक्षीस देत असे. चालूं सालीं नवीन ठराव बाहेर पडला तो असा कीं, रशियन, तुर्की अगर अरबी भाषा शिकून पास होणाऱ्यां सिव्हिलियनांस २०० रुपये बक्षीस मिळणार.

सहावा जज्ज— पंजाब चीफ कोर्टामध्यें सहावा जज्ज नेमण्याचें सांक्शन मिळालें.

काबूल आणि बुखारा यांच्या दरम्यानचा व्यापार बंद होत चालला आहे. त्याचें कारण अमिरानें कर फार बसविला आहे. या विषयीं सरकार शोध करीत आहे. न्या० सिं०

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं खालीं लिहिलेले त्रिवर्ग इसमास भिकाजी वल्लद तानबा पाटील जात कुणबी आडनांव पडखे राहणार मौजे वीरखेड परगणें तळेगांव दशासर हाल्लीं राहणार मौजे मुस्तबाद परगणें वेणी तालुकें यवतमाळ जिल्हा वणी यानें मौजे वीरखेड परगणें तळेगांव दशासर तालुके यवतमाळ जिल्हा वणी येथील शेत सरव्हे नंबर १ निजबत मारूतीचे एकर गुंठे आकार रुपये ६॥ व सरव्हे नंबर ५ पैकीं निजबत आंब्याचे एकर गुंठे ८ ०२८ आकार रुपये ९ व यांत आंब्याचें झाडें गुमारें ८ हा स्थावर माल आमच्या त्रिवर्गांचा व भिकाजी याच्या वडीलोपार्जित मिळविलेला असोन आमच्या त्रिवर्गांचा आठ आणे व भिकाजी याचा आठ आणे असें हक्कदार आहोत या माला बद्दल तारीख २४ माहे आगष्ट सन १८८५ रोजीं दस्ताऐवज (वाटणी पत्र ) झाल्यांत सरव्हे नंबर १ आणि ५ या शेताचा उपभोग भिकाजी यानें आपण जिवमान पावेतों सालीम शेताचा उपभोग घ्यावा आणि अमराई पैकीं आठ आणीक या हक्काचा जिवमान पावेतों उपभोग घेऊन भिकाजी याचे हयाती नंतर सदर्हु शेताचा व अमराईचा सर्व हक्काचा उपभोग आम्हीं त्रिवर्गांनीं घ्यावा म्हणोन दस्ताऐवज लिहुन देऊन रजिष्टर करून दिला हाल्लींसदर्हु इस्टेट भिकाजी यानें विकण्या करितां काढली आहे म्हणोन सर्व लोकांस आम्हांस लिहून दिलेल्या दस्ताऐवजाची प्रसिद्धी होण्या करितां ही जाहिरात दिली आहे करितां सदर्हु इस्टेट भिकाजी याज पासून विक्री बक्षीस किंवा इतर दुसऱ्या रीतीनें घेऊं नये. कळावे तारिख १२ माहे अक्टोंबर सन १८८७ इसवी.

( सह्या )

(सही) गणपत वल्लद दलदुजी पडखे
दतुर खुद्द मौजे बाबी
(सही) बळवंत वल्लद विठोबा पडखे
दस्तुर खुद्द मौजे बाबी
सहचिी निशाणी सिताराम नरोबा याची हातची असें
गणपत दलदुजी

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांकहशील ०१३
साहामाही " ३ " ०८
साल अखेर " ७ " १०१८
किरकोळ अंकास ....................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.........०१

Rs.
Per annum in advance 5 Postages 13 as
Per annum in arrears 7 „ 1R. 8 a
Six monthly ............ 3 „ 8 as
Single copy ................................ 4 as

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...4a
Repetition per line 3a


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL. XXI. AKOLA MONDAY 31 OCTOBER 1887. NO 42

वर्ष २१ अकोला सोमवार तारीख ३१ माहे अक्टोबर सन १८८७ इ० अंक ४२


## जाहिरात.

वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचा पंधरावा समारंभ सन १८८७ इसवी.

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यां येतें कीं, शहर उमरावती येथें या सभेचा चालूं सालचा समारंभ ता० २३ माहे डिसेंबर रोज शुक्रवारपासून सुरू होणार आहे. समारंभाची जागा या पुढें कळविली जाईल.

चालू सालीं भाषणकीरतां तीन विषय नेमिले आहेत ते असेः—

विषय १ ला—जुनें असो कीं नवें असो, जें उपयुक्त व न्याय्य तें सर्व चांगलें व ग्राह्यआणि जें अनुपयुक्त व अन्याय्य तेंसर्व वाईट व त्याज्य हा सिद्धांत पाश्चिमात्य लोकांचे मनांत बहूत वर्षांपासून बिंबल्यामुळें त्यांचा एकसारखा उत्कर्ष होतगेला व तो सिद्धांत आपल्या लोकांच्या मनात तसा पूर्ण पणें न बिंबल्यामुळें आपणांस उत्तरोत्तर निकृष्टस्थिति येतचालली आहे या विषयांवर उपपत्तीसह एतिहासिक प्रसिद्ध दृष्टांत घेऊन भाषण करणें.

विषय २ रा—हिंदुस्थानांत जातीभेद उत्पन्न होण्याचीं संयुक्तिक कारणें कोणतीं असावित, या जातिव्यवस्थेपासून लोकांचे हिताहित कोणतें झाले आहे, हा जातिभेद आमच्या हल्लींच्या स्थितिमुळें कसा बदलत चालला आहे, त्याचे बरेवाईट परिणाम कोणतें होतआहेत व त्यापासून जितके अधिक हित होईल तितकें साधण्यास त्याला कोणतें स्वरूप आले पाहिजे.

विषय ३ रा—हिंदुलोकांच्या हल्लींच्या सामाजिक स्थितीमध्यें मुलाच्या किंवा मुलीच्या विवाहाची वटवटना चालूं झाल्यापासून सर्व लग्नसोहळा संपेपर्यंत फाजील खर्चाच्या व इतर अव्यवस्थित चालीच्या संबंधानें सांप्रत कसें नुकसान व गैरसोयी सोसाव्या लागत आहेत त्यांचें समग्र निरूपण करावें व त्यांच्या निवारणार्थ साध्य उपाय सुचवावें.

बक्षिस—पहिल्या विषयाला एक बक्षीस रुपये ३० चें ठेविलें आहे; परंतु या विषयावर भाषण करणाऱ्या उमेदवारांचें भाषण परीक्षकांस फारच चांगलें वाटल्यास सदरहु बक्षिसची रकम ४० रुपये पर्यंत वाढविलीं जाईल.

दुसऱ्या विषयाला एकच बक्षीस रुपये २५ चें ठेविलें आहे.

तिसऱ्या विषयास पहिलें बक्षीस रुपये२० चें व दुसरें रुपये १० चें. अशीं दोन बक्षिसें ठेविलीं आहेत.

उमेदवारांस लागूं असणारे नियम.

(१)उमदवाराचें वय १८ वर्षां पेक्षां कमी नसावें.

(२) उमेदवारांनें उभे राहुन भाषण करावें व जवळ लेखी टिपण बोलते वेळीं ठेवूं नये.

(३) प्रत्येक उमेदवारानें अर्ध्यां तासावर भाषण करूं नये. परंतु योग्य वाटल्यास अर्ध्या तासापूर्वींच भाषण बंद करण्याचा किंवा एक तासपर्यंत मुदत अधिक वाढविण्याचा अधिकार परीक्षकांस आहे.

(४)कोणीही व्यक्तीस अनुलक्षून लावून भाषण करील किंवा सरकारच्या विरुद्ध भाषण करील किंवा बिभित्स शब्द भाषणांत आणील तर त्याचें भाषण बंद करण्यांत येईल.

(५) भाषणाच्या पूर्ण गुणांच्या एक तृतीयांशाहून अधिक गुण ज्या उमेदवारांस मिळाले आहेत त्यांपैकीं ज्यांचीं भाषणें परीक्षकांस पसंत पडतील त्यांसच बक्षिसें दिलीं जातील.

(६) ज्या उमेदवारांस सभेकडून बक्षिसें देण्याचें ठरलें त्यांनीं आपल्या भाषणाचा लेखी सारांश सभेच्या सेक्रेटरीजवळ आणून दिल्याशिवाय त्यांना बक्षिसें दिली जाणार नाहींत..

(७) ज्या उमेदवारांस या सभेकडून तीन बक्षिसें मिळालीं असतील त्यांस पुनः बक्षीस मिळणार नाहीं.

(८)नेमलेल्या तीन विषयांपैकीं कोणत्याहीएकाच विषयावर भाषण करण्यास उमेदवारांस परवानगी आहे,

(९) परीक्षेस येणाऱ्या उमेदवारांनीं आपले अर्ज ता० २० डिसेंबरच्या आंत सेक्रेटरीकडे पाठवावे व समारंभाच्या पूर्व दिवशीं त्यांस भेटावें.

नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर सन्मानार्थ भाषण करण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यांस सवडीप्रमाणें परवानगी देतां येईल.

ह्या सभेच्या समारंभाच्या वेळीं श्रोत्यांची समारंभाच्या ठिकाणीं बसण्याची योग्य व्यवस्था व्हावी या साठीं सालाबाद प्रमाणें यंदा ही पास टिकिटें काढण्याचें ठरलें आहे.

या सभेचे वर्गणीदार सभासद यांस टिकिटें घ्यावीं लागणार नाहींत त्यांस पास देण्यांत येतील. विशेषः— दोन रुपये किंवा दोन रुपय हूत अधिक वर्गणी देणाऱ्या वर्गणी दारांस त्यांचा स्वतःचा पास देऊन त्या शिवाय दोन आण्याच, एक "फ्री" पास दिला जाईल.

वर्गणीदारांशिवाय इतर गृहस्थांकरितां दोन प्रतीची टिकिटें काढलीं आहेत.

प्रत पहिली— (४) चार आणे
प्रत दुसरी— (२) दोन आणे

या शिवाय शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां (१) एक आण्याची टिकिटें काढली आहेत.

चार आण्याहून जास्ती किंमतीचीही टिकिटें मिळतील.

टिकिटें समारंभाच्या पूर्वीं सभेच्या सेक्रेटरीकडे मिळतील अणि समारंभाच्या वेळीं त्या ठिकाणीं मिळतील.

पास किंवा टिकिटें एकदां घेतली म्हणजे तीं चालूं सालच्या समारंभाच्या सर्व रात्रीं उपयोगीं पडतील. प्रत्येक रात्रीं नवीन पास किंवा टिकिटें घेण्याचे कारण नाहीं. परंतु पास अगर टिकिटें प्रत्येक रात्रीं सभागृहाच्या दरवाज्यावर दाखविले पाहिजेत. त्या खेरीज आंत जाण्याला परवानगी नाहीं.

कुलीन स्त्रियांना बसण्याकरितां पडदपोशीच्या जाग्याची व्यवस्था केली आहे.

ज्या उमेदवारांचे कोणत्याही विषयावर बक्षिसाकरितां बोलण्याचे लेखी अर्ज आले असतील किंवा ज्या गृहस्थांच्या सन्मानार्थ बोलावयाचे असेल त्यांस टिकिटें घेण्याची गरज नाहीं. सेक्रेटरीकडून त्यांस पास दिले जातील.

या शिवाय सेक्रेटरीस किंवा त्या कामीं योजलेल्या व्यवस्थापकांस वाटल्यास कोणत्याही गृहस्थास "फ्री" पास फुकट देण्याचा त्यांना अधिकार आहे.

| | |
|---|---|
| उमरावती ता. १८ माहे आक्टोबर सन १८८७ इसवी. | नारायण गोविंद केतकर<br>सखाराम चिमणाजी गोळे<br>वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचे सेक्रेटरी |

---

वऱ्हाडसमाचार.

मिती कार्तिक शुद्ध १५ शके १८०९

## आकोलें येथील घोड्यांच्या शर्यती व गुरांचें प्रदर्शन.

गेल्या आठवड्यांत आकोल्यास चोहोंकडे गडबड उडून गेली होती. युरोपियन लोकांनीं या आठवड्यांत एकत्र जमून बहुतेक वेळ चैनींत म्हणजे नाना प्रकारचे खेळ व नाचरंग याजमध्यें घालविला. परंतु एकंदर काळे लोक व गोरे लोक या उभयतांस ही साधारण गोष्टी म्हटल्या म्हणजे घोड्यांच्या शर्यती व गुरांचें प्रदर्शन. तारीख २४ रोजीं गुरांचें प्रदर्शन सुरूं होणार होतें परंतु त्याप्रमाणें मुळींच सुरवात झाली नाहीं. गुरांचें प्रदर्शनाची कल्पना मुळची कूपर साहेब यांची आहे; मि. कूपर हे वऱ्हाडांतील गुरांची स्थिति सुधारण्या करितां जे नवीन खातें उत्पन्न केलें आहे त्याचे मुख्य अधिकारी आहेत. गुरांची प्रदर्शनें इंग्लंड व इतर देशांत करतात; मुंबई इलाख्यांतही चिंचवड येथें गुरांचें प्रदर्शन झालें होतें; त्याच धोरणावर वऱ्हाडांतही गुरांचें प्रदर्शन व्हावें असें मनांत आणून कूपर साहेबांनीं या प्रदर्शनाची योजना केली असावी. गुरांचें प्रदर्शना पासून अर्थातच पुष्कळ फायदे आहेत त्या पैकीं ठिकठिकाणची गुरें एकत्र झाल्या मुळें दुसरें ठिकाणचे लोकांस त्या पासून आपलें गुरांचें संबंधानें फायदा करून घेतां येतो. हल्लीचें प्रदर्शनाचा समारंभ हा प्रथमच असल्यामुळें अर्थातच यांत पुष्कळ गोष्टींची उणिव होती. अगोदर वऱ्हाडांतील सर्व जिल्ह्यांचीं गुरें आलीं नाहींत. उमरावती व एलिचपूर यवतमाळ जिल्ह्यांतुन गुरें आलीं नाहींत असें समजतें. यामुळें वऱ्हाडांतील सर्व ठिकाणचीं गुरें पहाण्यास लोकांस सांपडलीं नाहींत. दुसरी गोष्ट अशी कीं जीं गुरें आणलीं होतीं त्यांत बैल व घोडीं इतकींच दोन तऱ्हेचीं बहुत करून म्हटलें म्हणजे शेतीच्या उपयोगीं पडणारीं जनावरें यांत असणें अगदीं अवश्य होतीं शेतीचें बैल हल्लीं आलेल्या बैलांत फारच थोडे होते. ज्या जोड्या आणल्या होत्या त्या बहुतेक गाडीस जोडण्याच्या योग्यतेच्या शृंगारलेल्या आणून उभ्या केल्या होत्या. वखरास जे बैल जोडलें जातात किंवा नेहमीं ज्याचा शेतकामांत व उपयोग होतो असे बैल क्वचितच दिसण्यांत आलें.तिसरी गोष्ट हल्लीचा वेळ प्रदर्शन करण्याला अगदीं योग्य नव्हता. यावेळीं जिकडे तिकडे लोक आपापलीं शेतें रब्बीच्या पिका साठीं तयार करण्यांत गुंतले असल्यामुळें त्यांस प्रदर्शनासाठीं फुरसत करून येण्यास अडचण. तालुक्यांतुन तहसिलदार मार्फत पाटील लोकांस समन्सें गेलीं होतीं. त्यांनीं कुळांचे बैल व घोडे नाखुषीनें गांवांतून काढून प्रदर्शनासाठीं रवाना केलें. जे लोक येथें आले त्यांचेसाठीं किंवा त्यांचे गुरासाठीं विशेष प्रकारची तजवीज मुळींच केलेली नसोन सर्व प्रकारचीं त्यांची गैरसोय होती. यामुळें फार लोक नाराज झाले. लोकांनीं इतकें लांबून श्रम घेऊन गु[रें] आकोल्या सारख्या ठिकाणीं प्रदर्शनासाठीं आणण्याची त्यांची कांहीं तरी विशेष सोय करणें अगदीं जरूरी होती. वेळ गैरशिस्त असल्या मुळें शेतीचें बैल वगैरे ही लोकांस आणतां आलें नाहींत. चवथी गोष्ट; गुरांचें प्रदर्शन 'जुबिली पार्क' या नांवचे चांकांत झालें परंतु तेथें व्यवस्थेचा लेशाही दिसत न व्हता. जिकडे तिकडे लोकांची गरदी व गुरें ही अस्ताव्यस्त तऱ्हेनें उभीं केलेलीं दृष्टीस पडत होती. एका जिल्ह्याचीं गुरें एकीकडे अशी व्यवस्था मुळींच ठेविली नव्हती असें वाटतें. या खेरीज आणीक पुष्कळ उणेपणाच्या गोष्टी होत्या. परंतु असल्या प्रकारचा समारंभ पहिलाच असल्यामुळें यासंबंधानें

कुपर साहेबास जितका अनुमव असावा तितका नव्हता. पुढें असा समारंभ होण्याची वेळ आली तर या सर्व गोष्टी घ्यानांत राहून त्यादूर करण्या विषयीं तजवीज व्हावी अशी आमची इच्छा आहे. बक्षिसेंही फारच लहान ठेविलीं होतीं. दुरून येणाऱ्या लोकांस त्याचा स्वतःचा व गुरांचा खावटीचा खर्च तरी मिळाला पाहिजे. असें जर न होईल तर प्रदर्शनास लोक फार कमी येतील. व बक्षिसें याहून बरीशीं पाहिजेत. कारण खटपट करून बैल किंवा घोडे तयार करून आणण्यास खर्च थोडा लागत नाहीं. बक्षिसांचें प्रमाण ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणून बसविलें पाहिजे. त्यांखेरीज लोकांस अशीं गुरें प्रदर्शनास आणण्यास उत्तेजन येणार नाहीं. घोड्यांच्या शर्यती तारीख २९ रोजीं सायंकाळीं सुरू झाल्या. घोडीं शर्यतीसाठीं लांबलांबचीं आलीं होतीं. शर्यतींचे 'स्टीवर्ड' ह्मणजे व्यवथापक यांचे हुकुमानें शर्यतींची व्यवस्था झाली होती. या शर्यती संबधानें घोडे शर्यती सार्वे आणणारांची इच्छा असल्यास त्यानें काय करावें वगैरे बद्दल प्रसिद्धि पत्रक निघावें तसें निघाल्याचें आढळत नाहीं. या मुळें ठिकठिकाणचे पाटील वगैरे जमीदार मंडळींनीं आपापले घोडे आणले असून त्यांस असें कळविण्यांत आलें की २० तारखेच्या आंत तुमचे घोडे शर्यतीस येणार अशाबद्दल सूचना केली नाहीं सबबत घेतले जात नाहींत. तालुक्यांतून जी समज पाठविण्यांत आली होती त्यांत अमुक तारखेचे आंत शर्यतीसाठीं घोडा येणार असें कळवावें असे नव्हतें व ज्या भरंवशानें लोक आपापलीं घोडीं घेऊन आले होते तो नाहींसा होऊन त्यांचा विरस होऊन ते गांवाकडे निघून गेले. शर्यती सुमारें तीन वाजतां संध्याकाळीं सुरूं झाल्या. युरोपियन लोकांसाठीं व काळे लोकांसाठीं बैठक शर्यतीच्या जागीं केली होती बैठक पताका वगैरे लावून शुशोभित केली होती; पोलिसांची व्यवस्था बरी होती. परंतु शर्यतीचे जागेभोंवतालीं काम्या अगर तारा मारल्या असत्या तर बरें होतें व कदाचित् थोडीशी सोय पाहणारे लोकांसाठीं केली असतो तर उत्पन्न पुष्कळ झालें असतें. दूरदूरचे लोक येऊन त्यांस उन्हांत उभे रहावें लागलें. कित्येकांस तर बैठकीचे जागीं ५ रुपये देऊन टिकिटें मिळतात ही सुद्धां माहिती नव्हती. जागें भोंवतीं तारा वगैरे नसल्यानें पोलिसांकडून लोकांस बराच त्रास झाला परंतु कित्येक ठिकाणीं तसें केल्या शिवाय व्यवस्था होण्यास मार्ग नव्हता. शर्यती पुन्हा २७ रोजीं सायंकाळीं व २९ रोजीं सायंकाळीं झाल्या.

---

साही जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर गेल्या आठवड्यांत येथें जमले होते. व ठिकठिकाणचे युरोपियन लोकही पुष्कळ आले होते. क्रिकेट, फ्यान्सीबाल, लानटेनिस वगैरे आनंदाच्या गोष्टींत त्यांचा वेळ गेला; दुपारी अकरा वाजल्यापासून दोन तीन तासपर्यंत कांहीं सरकारी कामांचा विचार कमिशनर व डेपुटी कमिशनर मिळून होत असे. टाऊन फंड ह्मणजे पोलिसपट्टी, अबकारी व वऱ्हाडांतील मुलकी कायदा, पाटील पटवारी वगैरे लोकांचीं कामें, म्युनिसिपाल कमिटीचे कायद्या संबंधीं नियम वगैरे पुष्कळ गोष्टी संबंधानें विचार झाला. अर्थात् या प्रसंगीं कोणत्याही एका गोष्टीचा पूरतेपणीं विचार होण्याचा बेतच नव्हता परंतु साधारण विचार होऊन एकंदर सर्वांस नापसंत नाहींत अशा सर्व साधारण कांहीं गोष्टी ठरविण्यांत आल्या. म्युनिसिपल कमेटीच्या कायद्याच्या नियमा संबंधानें ठिकठिकाणच्या कमेट्यांतून दोन दोन नेटिव्ह मेंबर बोलाविले होते परंतु त्यांचे येणें न येणें बहुतेक सारखेंच होतें. कमिशनर साहेबांनीं दोन दोन इसम कमेट्यांतून येण्याची सूचना केलेली पाहून लोकांस बरीच उमेद होती कीं नेटिव्ह लोकांचे या संबधांत म्हणणें बरेंच ऐकण्यांत येईल; परंतु वास्तविक तसा प्रकार घडून न येतां त्यांची हाजरी मात्र तेथें लागली. आतां एवढी एक सुखाची गोष्ट आहे कीं हे नियम पुन्हा कमेट्याकडे परत जाणार आहेत त्या वेळीं यांचा पुन्हा विचार करण्यास अवकाश सांपडेल. या नियमाचे संबंधानें आम्ही पुढें लिहिणार आहों. जीं दुसरीं कामें झालीं त्याविषयीं विशेष लिहिण्या सारखें नाहीं.

युरोपियन लोकांच्या खानगी तऱ्हेच्या कर्मणुकीच्या गोष्टी झाल्या त्या संबंधानें आम्हास कांहीं जुन्या गोष्टींची आठवण झाली. युरोपियन व नेटिव्ह येचां येक ठिकाणीं जमून दळण वळण पडणें ही गोष्ट इष्ट आहे. येकमेकांचे हाल्लीं जे संबंध आहेत त्याहून भिन्न तऱ्हेचे संबंध होण्यास व येकमेकांचे आचार विचार येकमेकांस बारकाईनें कळून येण्यास युरोपियन व नेटिव्ह यांचा खानगी रीतिनें मेळ झाला पाहिजे. हाल्लींचे प्रसंगीं तशी गोष्ट होण्यासारखी होती निदान कांहीं नेटिव लोकांना बोलावणें केलें असतें तर बरेच लोक खुषेनें गेले असते परंतु असा प्रसंग येण्यास कदाचित् पुष्कळ दिवस लागतील. युरोपियन लोक नेटिव्ह लोकांच्या नशिबाचे चुकतात असें तर नाहींच मग लांब लांब राहून निरंतरचा भिन्नभाव राहूं देण्यांत तरी लाभ कोणता. युरोपियन लोकांस आपली जरूर नाहीं हें खरें; त्यांचे खेळारंगात व ख्याली खुशालींत आपले लोकांनीं मिसळावें असें त्यांस हल्लीं वाटण्याचें कांहींच कारण नाहीं; तथापि जर त्यांचा आपला निकट संबंध व्हावा हें इष्ट असेल तर आपण होऊनच त्या संबंधानें प्रयत्न केला पाहिजे. त्यांचे आमचे संबधा पासून दुसरा एक चमत्कारिक फायदा होणार आहे तो असा कीं आमच्या लोकांची हरएक गोष्टी संबधानें पसंती किंवा नापसंती त्यांस सहज कळून येईल व नेटिव लोक आपणास बरें वाईट म्हणतात याविषयीं त्यांचें मनांत दर्प राहून एक प्रकारची जबाबदारी त्यास वाटणार आहे. म्हणजे हल्लीं युरोपियन लोकांत जी आपापसांत लोक मताची चहा आहे त्या प्रमाणें नेटिव्ह लोकांचें मतास वजनदारी येणार आहे. हल्लीं आमच्या बऱ्या वाईट मताचा त्या लोकांवर परिणाम मानासिकच आहे. ज्या प्रमाणें वर्तमान पत्रांतील मजकुरांचे त्यांस चाबूक बसतात तसेंच सामाजिक तऱ्हेनें देखील त्यांजवर चांगला परिणाम होण्याचा संभव आहे. हा उद्देश मनांत आणून व आपला कोणत्याही तऱ्हेनें उणेपणा होईल असें मनांत न आणतां आपल्या लोकांनीं युरोपियन समाजांत मिसळण्याचा प्रयत्न करावा हें चांगलें.

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER 31 1887

### A PROTEST

A joint protest to the Government of India seems eminently needed against the rule lately made applicable to the native commissioned officers in the Berar Commission, as to their getting two thirds only of the pay which European officers of equal rank would draw. A first class native Assistant Commissioner would under the new rule be only entitled to six hundred rupees per mensum, while a European officer would get 900. The posts of Assistant Commissioners were intended to be stepping—stones to Deputy Commissionerships; but we now understand, that the choice of a person to a vacant Deputy Commissionership would be limited to the special Assistant Commissioners or Judicial Assistants appointed under the new system; so that practically Assistant Commissioners would be left out to shiver in the cold, while they would see the Judicial assistant (who by the bye are to be Europeans) getting into snug berths. We are of course, assuming that the Judicial Assistantships are always to be conferred upon Europeans, and that they alone are to be promoted to the posts of Deputy Commissioners; all this we learn on reliable authority. If such really be the understanding of the Government of India the position of Assistant Commissioners, present and prospective, becomes very pitiable indeed, The difference at present, between an Extra Assistant and an Assistant Commissioner is the future prospect to the latter, of a Deputy Commissionership, and a substantial increase in the pay. A first class Extra Assistant gets 600, while a first class Assistant Commissioner gets 900 Rs. According to the new understanding, however, the prospect of the responsible post of a District officer is a nullity and the pay also is cut down to 600. The officers that are to enter hereafter in the Commission have nothing to complain, as they may choose to get into the Commiseion with all those rules before them. They would, if at all, enter on a the ranks of the Commission, plain and distinct understandingas to the status; and if with their eyes open, they choose to enter into the ranks of the Commission they have to thank them selves. But as regards those that have already entered Government service as Attaches and Assistant Commissioners, it is hard lines to tell them that they should not expect more than 600 as the ultimatum in their pay, and should never presume to get a Deputy Commissionership; nay, we would be quite justified in saying that it is a breach of faith on the part of Government. Years before when people like Mr. Nizamuddin and Pandit Suraj Narayan entered the Berar Commission, they naturally and very reasonably believed that they would be one day raised to the post of a District officer. of course the Government have bound themselves by special covenants to these or any other gentlemen already in the Commission; but there is no doubt that it would be a grave injustice to treat these men, as it is understood, they are going to be treated. The claims of Natives to fill higher posts rests on a very firm basis, when the reason adduced for their appointments is that they have to be paid less than their European comrades. But nobody ever supposed that any new rules could be made applicable with retrospective effect, so as to damage very seriously the prospects of a highly useful class of officers in the Commission. Could such a rule have been made applicable to any considerable class of European officers, with propriety and and Justice?

Besides the patent evil of ruining the interests of the native officers in the Commission, the effect of the new rules will be a most pernicious one on the public service of the province. The Commission will hold a set of discontents officers without the consciousness of brave responsibilties beyond what is barely needed to keep them in office—of ficers having no incentive to turn out exemplary work as they will not and cannot put their heart and soul into the thing. All this of course, if the officers don't throw up their posts in sheer disgust and walk away to more favorable spheres of action. The service must thus in either way deteriorate; and although some really good people have entered Government service upon salaries so low as 250. the Government may not count upon always securing such people. If Government really means what it says, and if ever it has any ideas of appointing natives to high posts in this country, they must offer respectable salaries and better prospects. At any rate there is no justification in so mercilessly cutting the ground from off the feet of the officers already in the Commission, and we would advise them most strongly we mean such of them as are interested in moving the Government, to join together in represent ing their case. We doubt not that Goverument will consider their claims and give redress to their grievances. Unless it be with the very laudable view of better enabling H. H. the Nizam to offer a paltry sum of 60 lakhs of rupees or a similar sum to the British Government.

---

'Education in Berar' is the heading of an article in the issue of the Deccan Times of 18th current. The Educational Department of Berar was praised by the Resident in his review of the Director's Report for the last year to the evident annoyance of the writer. The article is consistent enough so far, that it takes to task all concerned with the education of the province from the Resident down to the Deputy Inspector. The writer is most evidently a person out of the province and the article is all altogether worthless production deserving to go to the region of oblivion with its comrades on the dusky shelves. It contains theories and conclusions based on no tangible data, it is criticism without point and a review without information. Would not people be surprised to to hear that education has not spread in a greater degree than what it was before the Moghuls came to India? As to the un—English character of the misuse of prepositions, it will be enough to say that words might be found used in that way in standard English authors. An utter want attention is shown in remarking that only 40 schools were examined in the Wun District out of 92; the figure 40 appears under the column of schools inspected *once* and the very next column shows the remaining schools as inspected *twice or more than twice* Now can anything be more inexcusable than this. One who is so careless about his facts and figures has no business to sit in Judgment on the progress of a department, controlled by a very able officer. The Resident whose scholarl

attainments are well known is the proper Judge of the Directors' work. May it be, that the Resident's belanding remarks have pnt a thorn in the side of the writer?

The sky races at Akola came off on the 25 th, 27th and 29th there were besides these some races for the horses of natives. there was a goodly gathering of European gentlemen from different places. The whole week was taken up in fancy balls, lawn tennis and cricket matches.The comming together to the six District officors was taken advantage of by the Commfssioner in holding consultations on various topics affecting the policy of government. The Cattle show cannot be altogether pronounced a success; we have elsewhere pointed out some defects regarding the cattle show. The whole week passed off in a very enjoyable way.

The Afghan Frontier

We give below a summary of part of an article contributed by Sir Joseph west Ridgway to the Nineteenth cenu ry— we have tried to use his words as far as possible and hope that the summary will enlighten the public on the Afghan Frontier question. The writer is wellversed in the subject about which he writes and his views are entitled to careful consideration at the hands of our readers. We recommend those who have time and the means to read the article in extenso. We may state that he meets some of the conclusions of Professor Vambery. The article is very ineresting and instructive reading. The words in the first person coming in the summary apply to the writer and not to ourselves.

Summary

The thoughtful critics cbject to the principle of demarcation, because by so doing our responsibilities have been defired. But that seems to me one of the chief merits of demarcation.We are now pinned down to a fixed policy. Her Majesty's Government in 1884 had no other alternative. Liberals and Conservatives have regarded Afghanistan as beyond the sphere of Russian influence; it is the principle which underlies the treaty of 1873 and admitted by Russia itself. When Mr. Gladstone's Government evacuated Candahar, they pledged themselves not to permit interference by any Foreign Power with the external or internal affairs of Afghanistan. A promise was also given to the Amir to protect him from Foreign invasion. Since that time (1881) Russian outposts advanced from 700 miles to 200 miles fosm Herat, till 1884. Merv was occupied and the Rail way which now joins Merv with the Caspian and the oxus and which will soon join Mero and Samarkand was being pushed on. But Russia still believed, she had not advanced to the Frontier of Afghanistan. The Amir called up on us to fulfil the pledges. The question was whether the responsibility undertaken should be that of Afghanistan of which the Frontier was unknown and disputed or of one of which the Frontier was admitted by Russia in a formal international undertaking. There was no doubt as to which choice to make.

Nor would the encroachments of Russia have been otherwise checked. She would have advanced to Herat by her gradual and almost unobserved adl vances. And England having guaranteed the integrity of Afghanistan war would have been the inevitable consequence of the ostrich like policy of evading to define the Frontier. It is said that Russia can now force a war upon us at any time But it must be admitted that Russia will not violate the Frontier until she is willing and ready to enter into war all over the world.

In the opinion of many there is little chance of Afghan Frontier being the cause of war; but if war breaks out for other reasons Afghan Frontier might be violated. In making this assumption Irely upon the good faith of the Emperoson and the foresight and sagacity of Russian statesmen. I have little doubt that Russia knows the true value of Herat and I do not believe that at this critical time, she will consider if worth the bones of a single Cossack recruit. The wisdom of Russian statesmen and their Military education will not allow them to dream of any Madcap scheme of invading India. If any Russian general relying on the weak and single line of Railways, attempts the invasion of India and crosses the difficult passes of Hindu Kush to be entangled in the barren mountain homes of the fanatical and treacherous Afghan he will be delivered into our hands, If the invasion is made by the Herat road, and the army arrives before Candahar, it will be cut off from supplies dy the Afghans wh will fight on its ranks and rear and on its front; it will have to fight a powerful enemy connected with all the resources of India. I think we may dismiss as purely chimerical the fear that Russia will vioiate the new frontier either to invade India or Afghnistan. If Russia violates the Frontier without any war with England in Europe, she will do so because the wails and lamentations of peosimist writers who advertise to the world our imaginary importance, lead her to believe that she can do so with out the fear of England resenting by war the violation of a solemn international agreement. Such gloomy predictions may do much harm and I would implore the writers to refrain from making them.

## वऱ्हाड.

हवामानः—किंचित् थंडी भासूं लागली आहे हिवतापाचा आजार आद्याप बरेच ठिकाणीं आहे.

कर्नल रेनिक साहेब डे. क. येवतमाळ हे परवांचेदिवशीं खाजगी कामाकरितां मुंबईस गेले.

नेटिवांच्या शर्यतींत येथील कित्येक राहिल्यांस बक्षिसें मिळाली त्यांच्या वाटणी बद्दल त्या लेकांत तंटे होऊन भयंकर मारामारी झाली. कित्येकांस फार मोठमोठ्या जखमा झाल्या.

ता. २६,२७, आणी२९ रोजीं युरोपियन लेकांच्या घोड्याच्या शर्यती झाल्या. नेटिवांच्या घोड्यांच्या शर्यती ता. २८ रोजीं झाल्या. शिवाय युरोपियन लेकांचे फॉन्सिबाल, क्रिकेट मॉच, लान् टेनिस, हे खेळ झाले.

लेफ० डब्ल्यु एच्. कानिंश, आफि० पोलिटिकल असिस्टंट, फस्ट क्लास, रेसिडेंट साहेबांचे सेकंड असिस्टंट व वऱ्हाडचे असिस्टंट सेक्रेटरी यांस पूर्वीं मिळलेल्या दोन महिन्याच्या रजेस लागून आणखी सात दिवसाची रजा मिळाली.

सन १८७९ चा अक्ट २१ (फारिन् जुरिसडिकशान आणि एकस्ट्रेडिशन आक्ट) कलम ६ प्रमाणें खाली लिहीलेले आफिसरास वऱ्हाडांत जस्टिस आफ पीस नेमलें.

लें०क० एच्. सी. ए. स्पान्स्की
,, के. जे. एल्. मेकंझी
,, जे. फिट् झरल्ड.
,, आर. बुलक.
मि. एच्. बी. नैालिस.
लें० क० एफ्. डब्ल्यु. ग्रांट्.
,, एच्. डीपी. रेनिक.
मि. आर. आबर्ड सि. एस्.
मि. एच्. एस्. निकोलेट्स्.
क्यापटन् जी. जे. मारिस.
मि० ए. इलियट्.
मि० सी. ए. डब्ल्यु. डेव्हिस.

सय्यद शमसुद्दीन अलीखां बाहादूर यांस आफि० फर्स्ट क्लास अ० कमिशनर नेमले त्यांच्या जागीं मौलवी महंमद निजामुद्दीन हसनखां, अ० क० थर्डक्लास यांस आफि. सेकंडक्लास नेमलें.

मि० एच्. एस. निकोलेटस्, फर्स्ट क्लास असि० कमिशनर हे फर्लो वरून परत अले त्यांस थर्डक्लास डेपुटी कमिशनर नेमलं; मि० आर आबर्ड हे या नेमनुणकी मुळें आपले स्पे० अ० क० चे जागीं परत आले व मि० सी. ए. डबल्यु. डेव्हिस, आफि० स्पे० अ० क० हे आपले आफि० फर्स्ट क्लास अ० क० च जागीं परत आले.

सरदार खान बहादूर डाक्टर दस्तूर हुसंग जामासजी, डेक्कन, माळवा आणि वऱ्हाड प्रांतांतील पारसी लोकांचे हायप्रीस्ट आणि दस्तुर बहिमंजी जामासजी, सी. आय. ई. वऱ्हाडांतील माजी अ. क. यांस गेले आठवड्यांत रा. रा. हणमंतराव यशवंतराव नाईक राजूरकर यांचे येथें पानसुपारी झाली. पानसुपारीचा थाट फार चांगला होता व उभयता दस्तुर साहेबांचा फार सन्मान झाला.

मागाऊन अलेली

नोटीस.

रा. रा. वासुदेव विष्णु दिक्षीत पाटणकर राहणार शेंदुरणीं तालुके जामनेर जिल्हा खानदेश यांस खाली सही करणार याजकडून कळविण्यात येतें कीं आमचे जाहगिरीचे हिश्या पैकीं मागिल येणें राहिलेली बाकी सन १८८४।८५ साला पर्यंत अजमासें रुपये पांचशे व त्यापुढील सन १८८५।८६ व सन १८८६।८७ या दोन सालचे पंचम हिश्यासह अजमासें रुपये चवदाशे असे एकंदर रुपये एकुणवीसशे हें सदरहू रुपये तुम्हीं सालचे साल वक्तशीर नदिल्यामुळें दरमाहादर शेकडा दीड रुपया प्रमाणें व्याजाचा आकार होईल तो व नोटीशीचे खर्ची सुद्धा आज तारखे पासून पंधरा दिवसाचे आंत रुपये द्यावेत असें नझाल्यास फिर्याद करून कोर्ट खर्चीसुद्धा रुपये भरून घेण्याची तजवीज केली जाईल. तारीख २९ माहे अक्टोंबर सन १८८७ इसवी.

(सही)

सदाशिव व दामोधर आणि श्रीधर हरीहर दिक्षित. जाहगिरदार. शेंदूरणी.

नोटीस.

रा. रा. दवलत रावजी फत्तेसिंग देशमुख राहाणार बाळापूर यास नोटीस देणार येशवंतराव भगवंतराव देशमुख सस्तीकर नोटीशीनें असें. कळविलें जातें कीं सरकारांतून तुम्हांस स्वतःबद्दल व आमचे साठी पैसा मिळत असतो त्या पैकीं आमचे लवाजमाचा पैसा आम्हांस बरोबर देत नाहीं हालीं खर्च कोणचेहि प्रकारचा करण्याचे कारण नसून तुम्हीं विनाकारण खर्च करीत आहा व तो खर्च आमचे पासून मजरा मागता तर आम्हीं खर्च वगैरे कोणच्या ही प्रकारचा देणार नाहीं व तो खर्च अम्हांस बीलकुल मान्य नाहीं व लवाजमा संबंधी खर्च वगैरे करणे तो तुम्हीं आपले जोखीमवर करावा तो अम्हांस मान्य नाहीं बनि खर्च रकम आमचें हातीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत देऊन आमची पावती घ्यावी असें नकेल्यास योग्य तजवीज करून तुमचे पासून भरून घेऊं कळावें. तारीख २९ माहे अक्टोबर सन १८८७ इसवी.

(सही)

येशवंतराव भगवंतराव देशमुख दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार.

गेल्या वर्षी जगामध्यें ६९६९ आगबोटी होत्या.

मि० शंकर पांडूरंग पंडित, मुंबई इलाख्यांतील ऑरिएंटल ट्रांन्स्लेटर ह्यांस कारवारचे डेप्युटी कलेक्टर नेमिलें म्हणून समजतें.

रावबहादूर वाय्. एम्. केळकर, मुंबई इलाख्यांतलि अकिंटग ओरिएंटल् ट्रान्स्लेटर, ह्यांस कोल्हापूरचे दिवाण करणार ह्मणून ऐकण्यांत अलें आहें. त्यांचे जागीं खानबहादूर नौरोजी दोराबजी खंडाळेवाला यांस नेमणार.

गव्हरमेंन्ट प्रेस चालू करून सरकार सर्व खात्याची कामें आज बरीच वर्षे त्यांत काढीत असत. आलीकडे त्या खात्याचे खर्चाकडे रिडक्शन खात्याचे लक्ष जाऊन नफा नुकसानीच्या रुजवाती जालू आहेत. आमची खात्री अहे कीं, सरकारानें ते खातें काढल्यापासून नफा तर झाला नसेलच, परंतु अतिशय नुकसान झालें असेल यांत संषय नाहीं. तथापी नवनि कमेटी त्या खात्यावर नेमली गेली तिनें नुकसान असल्याचे प्रदर्शित केलें नाहीं तोंच सरकारानें ठराव केला कीं, सदरहु खात्या वरील सुपरी० मि० किंगसमिल रजेवर आहेत ते परत येईपर्यंत कमेटीनें काम चालऊ नये. यावरून सदरहू खचाचा बोज्या सरकार सोसण्यास तयार असावे असें वाटतें.

अहमदनगर जिल्ह्यांत उत्तम पर्जन्य पडून यंदा पिकें चांगलीं आलीं आहेत.

मि० एडविन नावचे विलायती गृहस्थ महाराज धुलिपसिंगास मसलत देणार आहेत.

ह्मसूर राजधानीची शिलक पुढील सालीं १८,००,००० रुपये राहील असा अजमास निघाला अहे.

गोकाक येथील बवबन्याच्या साह्यानें एक सुताची गिरणी गेल्या पांचवें तारखेपासून तेथें सुरू झाली.

नवंबरच्या पहिल्या तारखेपासून भोर संस्थानचा सातारच्या पोलिटिकल एजन्सींतून पुण्यचे एजन्ट यांचेकडे वर्ग होणार.

येत्या नवंबर महिन्यांत इटालियन फौज अबिसिनियाला जाणार.

लार्ड री सांहेबांची स्वारी ता. १६ रोजीं अमदाबादेकडे जाईल असें म्हणतात.

पंजाब युनिवर्सिटेचे रजिस्ट्रार मि. लार्पेंट यांनवर चार्ज ठेवून त्यांचा जबाब मागवावा असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केल्याचें समजतें.

सरहद्दीवरील रशियन अंमलदारांस अफगाणाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवण्याबद्दल सक्त हुकूम झाला आहे.

बडोद्याच्या महाराजांची स्वारी नेपल्स येथें येऊन राहणार आहेत असें समजतें.

निजाम सरकारची देणगी हिंदुस्थान सरकार मान्य करणार नाहींत असें हैद्राबाद येथील बाजारांत लोक बोलत होते. हे पैसे घेण्याचें ठरल्यास हैद्राबादचे सावकार या देणगी विरुद्ध अर्ज करणार असें म्हणतात.

सर लेपेल ग्रिफिन हे लवकरच हिंदुस्थानांत येणार आहेत असें समजतें. व ते पुढच्या एप्रिलमध्यें पेन्शन घेणार असें कळतें.

कलकत्यामध्यें खोट्या नाण्याचा फार प्रसार झाला आहे असें म्हणतात.

बेळगांव येथें कालरा सुरूं असल्यांचे समजतें.

लंडन येथील साटर्डे रिव्ह्यूचे मालक मि. अलेक्झांडर जेम्स ब्रेसफर्ड होप हे लंडन येथें ता. २१ रोजीं वारलें.

डा० केन यांनीं लंडन युनिव्हर्सिटी कालेजा करितां ७५,००० पौंड दिल्याचें समजतें.

श्राद्धाच्या वेळीं ब्राम्हणास जेवावयास न घालतां त्यांस रोख पैसे द्यावेत. असा जोधपूरच्या महाराजांनीं आपल्या प्रजेस हुकूम केल्याचें समजतें.

रशियामध्यें प्रत्येक ६२२६ मनुष्यांस एक डाक्टर आहे; फ्रान्स व ग्रेटब्रिटनमध्यें १४०० मनुष्यांस एक; आस्ट्रिया, जर्मनी व नार्वे यांजमध्यें ३०० स एक अशा मानानें डाक्टर आहेत असें समजतें.

फ्रान्स देशांतील सर्व रेलवे याहुदी लोकांच्या हातांत आहेत व स्टेट रेलवेची व्यवस्था देखील तेच लोक पहातात असें कळतें.

सु. प.

हिंदुस्थान सरकारचे कायदे कौन्सिल इतक्यांत एक शिकारीचा कायदा पास करणार आहे. सरकारास वाटेल तेथें एक हद्द नेमून द्यावयाची व त्यांत सरकारच्या परवानगी वांचून कोणी शिकार करावयाची नाहीं असें ठरविण्याचा इरादा दिसतो. असले कायदे होणें हें नबाबी थाटाचें दर्शक आहे व यापासून लोकास फार त्रास होणार आहे.

सरहद्दीच्या संरक्षणा करितां दरसाल २० लाख प्रमाणें तीन वर्षें पर्यंत ६० लाख रुपये देण्याची निझामानें जी आपली इच्छा दर्शविली त्याबद्दल गव्हरनरजनरलानीं त्यांचे फार आभार मानले आणि यावरून निझामचा राजभक्तपणा उत्तम रीतीनें सिद्ध होतो असेंही त्यांस कळविलें असें सांगतात. अया सांगण्यावरून राजभक्तपणा दाखविण्यास पैसा कारण आहे असें जें मनांत येतें तें चमत्कारिक आहे. निझामाच्या या देणगी बद्दल गव्हरनरजनरल यांनीं जरी त्यांचे आभार मानले तरी निजामाची ती देणगी घेण्याचें इंग्रज सरकारानें कबूल केलें किंवा नाहीं हें अजून ठरावयाचेंच आहे आणि हें ठरणें अति महत्वाचें आहे. निझामानें ही देणगी देण्यास काढली हें एका अर्थानें जरी ठीक दिसेल तरी ती इंग्रजसरकारानें घेणें रास्त होईल किंवा नाहीं याची शंकाच वाटते. निझामानें ही देणगी कोणत्याही कारणानें काढली असली तरी किंवा त्या देणगीच्या मुळाशीं कांहींही असलें तरी देण्यास काढलेली ती देणगी इंग्रजांनीं घेणें ह्मणजे पैसा उकळण्याचा हा एक नवा मार्ग सुरू झाला असें होणार निझामाच्या देणगीचें अनुकरण करण्यास दुसरे स्थानिक आजच तयार झाले आहेत असें सांगण्यांत येतें या सर्वांच्या आपल्या देणग्या घेण्याची सुरुवात झाली ह्मणजे निजामापासून तो लहान शाइनामदारांपर्यंत ते संस्थानिक बडाओडेनें असल्या देणग्या देण्यास पुढें सरसावतील वयाच्या योगानें आह्मासारख्या गरीब दुबळ्या लोकांसही आपलीं आंगडी टोपडी गहाण ठेऊन कांहीं तरी पुढें करणें भाग पडेल आणि असें होणें हें नांवाजलेल्या इंग्रजी कारकीर्दीस शोभणार नाहीं.

सर सालरजंग यांचा एक लेख युरोपांतील दुसऱ्या प्रवासाबद्दल नाइटींथ सेंचुरी या नांवाच्या पुस्तकांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ते ह्मणतात कीं, हिंदुस्थानांत एकंदर ५ कोटी मुसलमान असून त्यांतील बहुतेक लोक मोठे शूर व लढवय्ये असें आहेत आणि १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं त्यांच्या मदतीच्या मुळेंच इंग्रजांचा बचाव झालेला आहे या करितां रशियन सरकारचें जे पुढें सरकणें चाललें आहे त्याबद्दल ही इंग्रजांनीं त्यांच्यावरच अवलंबून राहिलें पाहिजे. ५७ च्या वेळीं तुम्ही सर्व मुसलमान लोक इंग्रजांच्या पक्षाचे असा त्यांतच तुमचें कल्याण आहे असें टर्कींच्या सुलताना कडून हिंदुस्थानांतील मुसलमान लोकांस वारंवार सांगण्यांत आलें होतें व त्यामुळेंच हिंदुस्थानांत इंग्रजांचा त्या वेळीं बचाव झाला असें मला माझा बाप सांगत असे. हल्लीं आह्मी सर्व इंग्रजांच्या सौम्य राजछत्रा खालीं नांदत आहों या करितां रशियास पुढें न येऊं देणें हें आम्हां सर्वांचें कर्तव्य आहे ह्मणून इंग्रजांनीं व महमदाचा धर्म यांचें एकीकरण करून आपणास वागलें पाहिजे.

निझामाचे प्रसिद्ध माजी दिवाण सर सालरजंग यांचे चिरंजीव मुर्दतल दिवाणगिरी सोडलेले सर सालरजंग [illegible] महिनेपर्यंत हैद्राबादेस येऊंनये [illegible] निझामाने हुकूम केल्या वरून ते विलायतेस गेले व तिकडून आतां परत आले आहेत. ते हिंदुस्थानांत येत असतां निझामाच्या [illegible] दिवाणाशी एक तार [illegible] त्यांत तुम्ही सहा महिने [illegible] हैद्राबादेस येऊंनये [illegible] हिंदुस्थानांतही येऊंनये असें लिहिलें होतें [illegible] टेंतच थांबलों [illegible] आले. आतां काय होतें पहावें.

हैद्राबादचे माजी दिवाण सर सालरजंग हे इतक्यांत विलायतेहून परत येतील व लागलेच हैद्राबादेस जातील विलायतच्या प्रवासाची यांची ही दुसरी खेप असल्यामुळें हैद्राबादच्या राज्यकारभारांत, ते दिवाण नसले तरी बराच उपयोग होण्यासारखा आहे.

निजामचे प्रायव्हेट सेक्रेटरी कर्नल मार्शल हे कलकत्याहून परत आलें तेव्हां निझामाशी पुष्कल वेळपर्यंत एकांत चालला होता असें सांगतात.

टा० अ०

डांक वावली तारेच्या आलेल्या बातमी वरून समजतें कीं चालू महिन्याचे सोळावे तारखेस बेळगांवाहून धारवाडास डाकेचा तांगा येत असतां, अकस्मात् अतिरिक्त पाऊस पडल्य मुळें मधल्या एका ओढ्यास एकाएकी पूर येऊन त्यांत तो तांगा वाहत गेला. त्यांत डाकेची दोन पोतीं व दोन मनुष्यें एक घोडेवाला व एक गाडिवान वाहून गेलीं तपास केल्यावर दोन्हो मनुष्यांचीं प्रेतें सांपडलीं

इटाली, आस्ट्रिया आणि जर्मनी यांच्यात मेतकुट जमलें.

✓ हिंदुस्थानच्या लोकांनीं इंग्रजांविरुद्ध बंड करावें अशाबद्दल सर्व हिंदुस्थानभर प्रसिद्ध करण्यासाठी महाराज धुलिपसिंग यांणीं पारिस येथें जाहिरनामे छापून तयार केलें आहेत असें ता० ११ मिनहूनच्या पारीसच्या तारेवरून कळतें.

✓ भोपाळ संस्थानांतील प्रजेस कैद करण्याचा किंवा कोणत्याही प्रकारची शिक्षा करण्याचा अधिकार इंग्रज सरकारास त्या संस्थानच्या तहनाम्याप्रमाणें नसतां सरकारानें कांहीं लोकांस उचलून कैद केलें असल्यामुळें त्या संस्थानांतील प्रजा बरीच खवळली असल्याचें कळतें.

बेळगांवः—कोणी भिरजेकडील पार शेटी अडनांवाचा मनुष्य येथें येऊन आपणांस बऱ्याच रकमेचें कापड व धान्य खरेदी करावयाचें आहे असें सांगून व आपण मोठे श्रीमान आहों असें दाखविण्या करितां हातांत कांहीं सोन्याच्या वहय घेऊन येथें व शहापूरच्या व्यापाऱ्यांकडे कापड घेण्या करितां ह्मणून जात असे. व त्याप्रमाणें त्यानें शहापूर व बेळगांव येथील मारवाड्यांकडून तसेंच हल्लीं येथील शनिवारबाजारांत ज्या कांहीं कोटी लोकांनीं नवीन दुकानें लाविलीं आहेत त्यांजकडून असें एकंदर कापड धान्य मिळून अजमांस १५।१६ हजारांचा माल खरेदी करून पुढें रवाना करून दिला; परंतु तो कोठें रवाना केला हें समजत नाहीं. माल रवाना झाल्यानंतर मागाहून ५।६ दिवसांनीं व्यापारी लोकांस संशय आला व कुजबुज सुरू झाली. ही [illegible] पारशेटी यांचे कानीं पडतांच पारशेटी कोठें पार झाले इतकेंच नव्हे तर [illegible] पण थोडा हात [illegible] असें म्हणतात.

क० त०

[illegible] युनिव्हर्सिटीच्या नावाजलेल्या [illegible] कालेजांत शिकण्या करितां ज्या [illegible] मिळत असत [illegible] करण्याविषयींचा [illegible] परवानगी हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरींनी [illegible] सरकारास दिली आहे.

[illegible] जी एक जागा रिकामी [illegible] आ. के. टी. तेलंग व मि० बद्रदिन ह्या दोघा गृहस्थांतून एकाची योजना होणार ह्मणून समजतें. परंतु त्या जागीं मि० तेलंग ह्यांचीच नेमणूक होणार ह्मणून बोलवा आहे.

पब्लिक सर्व्हिस कमिशन पुन्हां अलाहाबादेस नोवेंबरच्या १ ल्या तारखेस जमणार.

न्या० सु०

नोटीस.

भवानी वलद गोपाळा सोनार राहणार किन्ही वासिम यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आमची कन्या तुझी बायको नामें तुळशी ही आज सुमारें तीन वर्षें बाळंत रोगानें आजारी आहे. व इजला मांदगी करितां औषधपाणी वगैरे देऊन तबेत बरी करून तुम्ही आपल्या बायकोस घेऊन जावें. अशा बद्दल आजपावेतो बहुत वेळां तुम्हांस सांगितलें परंतु तुम्हीं कांहींच केलें नाहीं. मी गरीब मनुष्य तुझे नांवावर बायकोच्या दवा पाण्या बद्दल आज तीन वर्षे कर्ज काढून चाललें आहे. व आतां कर्ज वगैरे कांहीं मिळत नाहीं व तुमचीतर तऱ्हा विलक्षण आहे याज करितां तुम्हांस असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत तुम्हीं आपले बायकोस तिचे मांदगीचे व पोटाचे वगैरे खर्चा बद्दल सर्व रुपये २०० दोनशें आम्हीं कर्ज काढिलेले आणून देऊन बायकोस घेऊन जावें असें न केल्यास मुलीचा वरठाव आमचे जाती प्रमाणें आम्हीं हीच आपली सोडचिट्टी समजून दुसरा करून देऊं व सदरील रुपये बद्दल कोर्टांत काम चालवून अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसान भरून घेतलें जाईल मुलीस घेऊन जाण्याचें असल्यास तिचें संगोपण वगैरे बद्दल चार जात भाईंची खातरी करून घेऊन जावें. कळावें.

(सही)

भवानी वलद नानवा सोनार
दस्तुर खुद.

---

नोटीस.

नोटिस बेरामी मि० कांगा [illegible] इंजिनियर राहणार अकोलें यासी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हीं जळगांव येथील आस्पिटलचें काम मला कंट्राक्टानें दिलें होतें तें काम मी जून १८८७ इसवी महिन्यांत पुरें केलें आहे. त्या कामा बद्दल माझे रुपये आपले कडेस घेणें अंदाजानें ४०० निघत आहेत. ते रुपये व त्या रुपयास दरमाहा दरसेंकडा रुपये २ प्रमाणें व्याज बद्दल रुपये ३२ येकून रुपये ४३२ ही नोटिस पावल्या तारखे पासून आठ दिवसांत आम्हास देऊन आमची पावती घ्यावी तसें न केल्यास आपलेवर फिर्याद करून नोटिशीचे खर्चा सुद्धां आपले पासून रुपये घेण्यांत येतील तारीख २७ माहे आक्टोबर सन १८८७.

(सही)

[illegible] राहणार
[illegible].

हें पत्र अकोला येथें कै० वा० [illegible] यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत [illegible] यांनी छापून प्रसिद्ध केलें.

नये. टिकट [illegible] उमरावती हे मि